साप्ताहिक

# माणूस

११ ऑगस्ट ८४ / २ रुपये

## स्वातंत्र्यदिन..

साध्या भोळ्या
गरीब कुमाउनी लोकांचा..

आणि आपला ?



'तुमचं आणि माझं राष्ट्र वेगळं आहे'
— मणिपूरची राणी

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे
अंक : अकरावा

¤

११ ऑगस्ट १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक
श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

¤

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

# सप्रेम नमस्कार...

¤ आपल्या दि. १४ जुलैच्या अंकातील 'अनवट' या स्तंभातील मराठवाडा वृत्तपत्र विद्याविभागाच्या निकालासंबंधी मजकूर वाचला नि धक्का बसला. कारण मी आपल्या 'माणूस' साप्ताहिकाचा एक नियमित वाचक, अगदी सुरुवातीपासूनचा. क्वचितच एखादा अंक माझ्या वाचनातून सुटला असेल! एक दर्जेदार अंक–वैचारिक लेखांनी परिपूर्ण! त्यातील सत्यता, परखडपणा याबद्दल माझ्या मनात आदर! पण 'माणूस' मध्येही वस्तुस्थितीला सोडून असे लिखाण येऊ शकते यावर माझा विश्वास नव्हता.

मीदेखील मराठवाडा वृत्तविद्याविभागाच्या ह्या वर्षीच्या बॅचचा विद्यार्थी! मी 'त्या' परीक्षेत गुणवत्तायादीत पाचवा आलो. विभागाच्या ह्या वर्षीच्या निकालासंबंधी जे 'वादंग' उठले त्यातील वस्तुस्थिती नेमकी काय आहे ती निदर्शनास आणावीशी वाटते.

सर्वप्रथम येण्याचे माझेही स्वप्न होतं; पण ते पूर्ण होऊ शकले नाही यात मीच कुठे तरी कमी पडलो असं समजून मी विभागाच्या निकालासबंधी 'गरळ' न ओकता अलिप्त राहिलो; पण 'माणूस'मधील तो मजकूर वाचून अस्वस्थ झालो. यातील नेमके सत्य वेगळेच आहे.

आपल्या लेखात लिहिलंय की, एका श्रीमंत दैनिकाच्या व्यवस्थापकाना सर्वप्रथम पदाचा मान दिला. दुसरा व तिसरा क्रमाक मिळविणारेही त्याच दैनिकातील कर्मचारी आहेत; पण हे खोटे आहे. दुसरा क्रमाक नि तिसरा क्रमांक मिळविणारे त्या दैनिकाचे कर्मचारी नसून दुसऱ्या क्रमांकाचा विद्यार्थी हा मेहनती व हुषार होता. त्यालाच प्रथम क्रमांक मिळणार असे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना वाटत होते. तो विद्यार्थी आता स्वतंत्रपणे स्वतःचे दैनिक काढणार आहे. तिसरा क्रमांक मिळविणारा विद्यार्थी एल. आय. सी. मध्ये नोकरी करतो, तोही हुषार विद्यार्थी होता. हे लिहिण्याचा माझा उद्देश त्यांचे अथवा वृत्तपत्रविभागाचे समर्थन करण्याचा नसून 'सत्य' काय ते सांगण्याचा आहे.

दुसरा एक कटु अनुभव. तो सांगावा की नाही याबद्दल माझ्या मनात संभ्रम पडला आहे. तो जर सांगितला तर विभागाची बदनामी होईल नि त्याबरोबर आमच्या भावी पत्रकारबंधूंची देखील! पण सत्य हे निर्भीडपणे सांगितलेच पाहिजे म्हणून नाइलाजाने लिहावे लागते.

परीक्षा चालू असताना काही (बोटांवर मोजण्याइतक्या) विद्यार्थ्यांचा अपवाद वगळता, ही मराठवाड्यातील भावी पत्रकारमंडळी चक्क 'कॉप्या' करीत होती. कॉपी केली अथवा नाही हे प्रत्येकालाच नव्हे तर सर्व वर्गालाच माहीत आहे अर्थात हे वाचून प्रत्येकालाच आपली बदनामी झाली असे वाटणारच! (पण स्वतःला हा प्रश्न विचारून पहावा प्रत्येकाने.) आपले दोष जगासमोर येऊ नयेत असं प्रत्येकास वाटते!

विद्यार्थी कॉप्या करत असल्याची तक्रार आम्ही काही जण विभागप्रमुखाकडे करणार होतो; पण वेळच नव्हता, लागोपाठ पेपर होते.

हल्ली कॉप्याचे प्रकार सर्रास होतात! त्याला कोण नि कसा आळा घालणार? पण भावी (होऊ पाहणाऱ्या) पत्रकारांनी कॉप्या कराव्यात हे मुळातच उद्वेगजनक, संताप आणणारे तसेच ढोंगीपणाचे आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते. (अर्थात मी कॉप्या करणाऱ्यांपैकी नव्हतो म्हणूनच हे लिहू शकतो)

एका 'चळवळ्या' व्यक्तीशेजारीच माझा क्रमांक होता. तिची सारखी कुजबुज चाललेली–शेजारच्या विद्यार्थ्याशी–'लवकर लिही, चिठ्ठी मला दे!' शेवटी ते असह्य झाल्यामुळे मी बाजूला दूर जाऊन बसलो.

नंतर याच चळवळ्यानी आपल्यावर अन्याय झाल्यासबंधी तक्रार करण्यासाठी विद्यार्थ्यांची बैठक बोलाविली, 'अनवट' सदर आपल्याकडे लिहिणाऱ्याला माहिती पुरवली याला काय म्हणावे?

१८ जुलै १९८४ रामकृष्ण पाथरीकर
औरंगाबाद

(कॉपी करणारांची बाजू घेण्याचा प्रश्न नाही; पण अनवट सदरातील माहिती अपुरी होती असे दिसते. वाइटातून चागले एवढेच की, मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्याविभागातील असंतोष व गोंधळ या निमित्ताने थोडा फार बाहेर आला.)

# मुंबापुरी....

## □ हायकमांडचा 'अॅप्रोच'

महाराष्ट्राच्या झुंजार नेत्यांना दिल्लीत कस वागवल जातं, याचं खुमासदार वर्णन एका थोर, तडफदार पुढाऱ्याकडून बऱ्याचदा ऐकायला मिळतं.

त्याच्या म्हणण्यानुसार हायकमांडचा एकूण 'अॅप्रोच' घाटावरच्या कुमारासारखा असतो. मिळेल ते मडकं शेकून काढायचं, अगदी खरपूस. कुणाची पत्रास ठेवायची नाही.

रावाच असो अथवा रकाच, अंतुल्याचं असो किंवा वसतदादाच—प्रत्येक मडक मन मानेस्तवर भाजून काढायच.

परवा कांग्रेसश्रेष्ठींनी महाराष्ट्रातल्या तमाम लाडक्या अन कर्तृत्ववान नेत्याना चागलं शेकून काढलं. त्यात आमचे हे थोर पुढारीमित्र देखील होते.

हायकमाड राज्यमत्रिमडळात वाढ करायला तयार आहे असं दिसताच ज्यानी त्यानी दिल्लीचा मार्ग सुधारला.

दोन तारखेला दादा आणि अंतुले एकाच विमानाने दिल्लीला जाणार अशी बातमी होती नंतर अतुले बारगळले. शनिवारी केसचं कामकाज सपल्यावरसुद्धा ते आबेतला गेले.

तिरपुडेंनी सगळयाना झेंडया लावून सगळयांच्या आधी दिल्लीकडे हनुमान उडी घेतली. अर्थात, त्यामुळे अनेकाच धाब दणाणलंय. महाराष्ट्र राज्य कांग्रेस पक्षात सगळा सावळा गोंधळ होत असताना माताजी मागल्या दाराने तिरपुडेंना महाराष्ट्र कांग्रेसचं अध्यक्ष करतील अशी कुणकुण आहे. कांबळे राज्यसभेवर निवडून गेल्यामुळे ही खादेपालट करावी लागेल असं बोललं जात. ते अर्थातच तितकस खरं नाही. येते दिवस निवडणुकीचे असल्याकारणाने कांबळयासारखा अध्यक्ष असणं फायद्याचं नाही असा हिशेबी मामला लक्षात ठेवून कदाचित तिरपुडेंच्या गळयात अध्यक्षपदाची माळ पडेल.

राहिला सवाल मत्रिमडळ वाढीचा तो अद्याप तरी खुटीवरच आहे. मुख्यमत्री, तिरपुडे, भोसले आणि असख्य कांग्रेस भगतगण सध्या तरी काळोखात चाचपडत आहेत.

नऊ ऑगस्टला विश्वनाथप्रतापसिंग परदेश दौऱ्यावरून परतल्यानतर सगळा प्रश्न सोडवला जाईल, अस गोलमाल उत्तर देऊन राजीव गांधींनी महाराष्ट्राच्या भवितव्याची गोची करून ठेवली आहे.

आता नऊ ऑगस्टला कांग्रेसजनाच वऱ्हाड पुन्हा दिल्लीला जाईल.' कुमार तयार असतीलच एकेकाला असे भाजून काढतील की...

## □ यू सेड इट ··· हं

रोज सकाळी चहाचा आणि कडुढाण बातम्याचा घोट घेताना जीवाची कोण तगमग होते याची इथे चर्चा नको. चर्चा त्या माणसाची करू या ज्याने छापील शब्दाच्या या चिखलवाड्यात मिष्किल विनोदाचं एक सुरेख कमळ रोजिंदा फुलवल. माणसातला विनोदाचा एक कोपरा सतत तेवत ठेवला.

आर. के लक्ष्मण याना यदाचं रेमन मॅग्सेसे अवॉर्ड मिळालय. मी मुद्दाम लक्ष्मणना विख्यात, सुप्रसिद्ध वगैरे विशेषणाची बिरुदं लावली नाहीयेत.

ज्याची अवलादी व्यंगचित्रं आठवडाभर आली नाहीत तर आम्हाला चहा मचूळ लागतो त्या माणसाला कसली आणखी महिरप काढणार ?

लक्ष्मणना भेटायला गेलो. तेव्हा ते रोजच्या सारखे कार्टून रेखाटण्यात दग होते. आधी थोडे त्रासलेच. पुन्हा फोटोग्राफर बघून तर, चेहऱ्यावरची वैताग–रेषा अधिक ठळक झाली. पण मला सगळ्यात भावला तो त्याचा फटकळ उत्तरं देण्याचा (नित्यनेमाचा) स्वभाव !

मॅग्सेसेसारख मातब्बर बक्षीस मिळाल म्हणून ते अजिबात मॉडेस्ट–बिडेस्ट वागले नाहीत.

सगळी उत्तरं कशी थोबाडीत फाटकन् शिलगावल्यासारखी. त्याच्या कार्टूनवरच्या कॅच–लाईनसारखी.

—'मला अर्थातच खूप आनंद झालाय.' असं काहीस पुटपुटून त्यांनी कुचला घेतला.

—ज्या सार्वजनिक झगमगाटाचा त्यांना तिटकारा वाटतो त्याचा त्याना आता पुन्हा उपद्रव नाही का होणार ?

—'नो. आय विल कंटिन्यू टू शन लाईमलाईट'

ज्या राजकारण्यांची त्यांनी मनसोक्त टर उडवली, त्यापैकी जर एखाद्याला लक्ष्मणच्या सत्काराला प्रमुख पाहुणे म्हणून बोलावलं तर...?

लक्ष्मण क्षणभर थांबले. अन् मग अजिबात थड सुरात उत्तरले. 'आय डोंट थिंक एनी पोलिटिशियन वुड लाईक टू फेलिसिटेट मी.'

—यू सेड इट हं लक्ष्मण !

## □ अतिरेक !..

गेले चोवीस दिवस चाललेला मार्डचा संप अजून मिटण्याची चिन्हे दिसत नाहीत. डॉक्टर लोकाना आम्ही सुचविलेले प्रिस्क्रिप्शन पसत पडलेले दिसत नाही. आता सरकारनेच शस्त्रक्रिया केल्याखेरीज हे दुखणे आटोक्यात येणार नाही.

संप हे लढ्यातल्या अनेक हत्यारापैकी एक हत्यार आहे. त्याचा योग्य प्रकारेच वापर केला गेला पाहिजे. मार्डचा सप आता जितका अधिक काळ रेंगाळेल तितकी लोकांची सहानुभूती कमी होत जाईल. आता हायकोर्टात त्यानी कॅपिटेशन फी घेणाऱ्या कॉलेजाविरुद्ध दाखल केलेला पिटिशन अॅडमिट झाला असल्याने कायद्यावर भिस्त ठेवून त्याना कामावर हजर होण्यास काहीच हरकत नाही. सरकारशी लढताना लोकाना किती काळ वेठीस धरावे यालाही काही मर्यादा आहेत.

गेल्या गुरुवारी जे. जे. हॉस्पिटलच्या दीडशे डॉक्टरानी आरोग्यखात्याचे राज्यमत्री भाई सावत याना घेराव घातला. सावत हॉस्पिटलमध्ये एक्स रे काढून घेण्यासाठी आले होते. रेडिओलॉजी डिपार्टमेंटमध्येच डॉक्टरानी त्याना अडविले. जे. जे हॉस्पिटलचे डीन डॉक्टर चंद्रकापुरे याच्या सागण्यावरून विद्यार्थ्यांनी सावताना डीनच्या खोलीत जाऊ दिले. दुपारी दीडला घेराव सुरू झाला. डॉक्टरानी खोलीचे दार आणि खिडक्या आतून बद करून घेतल्यामुळे पोलिसाना आत येणे शक्य झाले नाही

भाई सावंताना डीनच्या खुर्चीत बसवून डॉक्टरानी डीनच्या टेबलावर नाच केला, अर्वाच्य घोषणा दिल्या. हिंदी सिनेमाची गाणी म्हणली मार्डच्या डॉक्टराचा 'तीस हजाराचा तमाशा' आम्ही आधी पाहिला होता आता हा तमाशा पाहून आम्ही थक्क झालो. अशा रीतीने लढा चालवून आपल्याला यश मिळेल असे डॉक्टराना वाटते का?

पोलिसांना आत शिरणे अशक्य होते. त्यामुळे फायर ब्रिगेडला बोलाविण्यात आले. डीनच्या खोलीचे दार फोडण्याची तयारी सुरू झाली खोलीतल्या काचा आधीच फुटल्या होत्या. फायर ब्रिगेडच्या लोकानी दारावर धक्के द्यायला सुरुवात केली तेव्हा कोठे भाई सावताची सुटका झाली.

मार्डचे अध्यक्ष डॉक्टर लालमलानी आता रास्ता रोको, रेल रोको, दूध रोको वगैरे आंदोलन सुरू करणार आहेत. आतापासूनच के ई एम्.च्या डॉक्टरानी त्याला विरोध दर्शवायला सुरुवात केली आह आता ह्या अशा पातळीवर लढा आणून मार्डमध्ये फूट पडण्या अगोदरच डॉक्टरानी हे आंदोलन आटोपते घ्यायला हवे.

—विष्णू जयदेव

## ९ रेसकोर्स रोड, नवी दिल्ली

# ‘तुमचं आणि माझं राष्ट्र वेगळं आहे’ हे मणिपूरच्या राणीने दिलेले उत्तर सर्वांनाच विचार करायला लावणारे आहे ! ... बॅ. विठ्ठलराव गाडगीळ

मुलाखत । अविनाश भगवंत धर्माधिकारी

एखाद्या परिचिताला जरा सर्दीपडसं झालं आहे हे आपल्याला माहीत असावं. मग एखाद्या सकाळी सकाळी घाबऱ्या घाबऱ्या कोणी तरी आपल्या कानात 'येऊन सांगतो, 'कळलं का, तो गेला. हार्टअॅटक् !' जम्मू–काश्मीरमधल्या फारुक अब्दुल्ला सरकारचं असं झालं ‘माणूस’ प्रतिनिधीन प्रत्यक्ष ‘घटनास्थळा’ला भेट द्यावी हेही तेवढ्याच तडकाफडकी ठरल. सगळेच ग्रीन सिग्नल्स पटापट पडत गेले अन् आश्चर्य म्हणजे ‘झेलम’ वेळेवर सुटली, कंडक्टरन पूर्ण ‘निष्काम’ भावनेनं ‘थ्री टियर शयनयान’ मध्ये जागा देऊ केली...

... पहिला मुक्काम दिल्ली !

घाई होतेय जरा घाई होतेय. दिल्लीला पोचायला निवांत चोवीस तास आहेत. तेही झेलम त्या वेळेवर पोचली तर. तोवर जरा नीट पहिल्यापासून सांगतो तशी या झेलममध्ये आता गर्दी नाहीये काही दिवसांपूर्वी त्रिवेंद्रमला जायच होतं. गाडीत खच्चून गर्दी. कंडक्टरनं फक्त पन्नास रुपये घेऊन ‘बर्थं’ दिला. अखेर वत्सल कंडक्टरनं विचारलं, ‘त्रिवेंद्रमला काय काम काढल ?’ सांगितल की प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांनी तेथे पंजाबवर परिसंवाद योजला आहे, त्यासाठी चाललोय. खुश होऊन कंडक्टरनं समजावून दिल. तरुणांनीच देशकार्य करायला सरसावून पुढे येणं अत्यावश्यक आहे. शाबास ! आम्हालाही सावरकर, गुरुजीबद्दल खूप वाटतं. लहानपणी मी संघात जायचो; पण काय करणार ? पोट आहे ना ! या झेलमच्या कंडक्टरला आज अशी देशभक्ती करायची संधी दिसत नाहीये. कारण गाडीत फारशी गर्दी नाहीये. नाही तर कंपार्टमेंट्स्मधून फिरणारा टिसी आणि त्याच्यामागे लागलेल्या प्रवाशाची गर्दी पाहिली की, मला नेहमी थिएटरबाहेर ‘दो के पाच, दो के पाच’ करणाऱ्या पोऱ्यांची आठवण येते.

आधीच पजाब ३–४ जूनपासून पेटून राहिलेला. त्यात आता काश्मीरही धुमसू लागला. तसा तो धुमसत नव्हता कधी ?

पण ते सर्व सिंहासनाचे खेळ होते. तसे खेळ भारताच्या प्रत्येक प्रांतात सालाबादप्रमाणे भरतच असतात. काश्मीरच कलम ३७० न बहाल केलेलं वैशिष्टच असं आहे की, तिथल्या सिंहासनाच्या मागे, खाली देशद्रोही पाकिस्तानवादी वेताळ आपलं घर करू शकतात. भिवंडी–मुंबईतल्या दंगलीची श्रीनगरमध्ये हिंसक प्रतिक्रिया भडकली. पाठोपाठ बॉंबस्फोट, गाडी लुटणे, छुपे किरकोळ हल्ले असंही वाढत चाललं पंजाबमधल्या लष्करी कारवाईच्या प्रतिक्रियेनं तर काश्मीर-खोऱ्यात–विशेषतः श्रीनगरमध्ये–कहर माडला. पूंछमधली दंगल आवरता आवरता प्रशासन रक्तबंबाळ व्हायची पाळी आली, अशा बातम्या इथपर्यंत आल्या. मग प्रत्यक्षात किती घडल असेल ? सर्वांसोबत पडद्यामागे राजकीय हालचाली चालूच होत्या. अचानक दोन जुलैला पडद्यापुढन फारुक अब्दुल्लांना विंगेत खेचण्यात आल. पडद्यावर जी. एम. शाह अवतीर्ण झाले. सर्व विरोधी पक्षांनी एकमतानं या प्रकाराचा निषेध नोंदवला. या मुद्द्यावर ते एकत्र येऊ लागले. आता संसदेच्या निवडणका जवळ आल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक घडामोड निवडणुकाच्या लोलकातून परावर्तित होऊनच आपल्यापर्यंत पोचते नेमके त्यामुळे या घडामोडीचे सप्तरंग सुटे सुटे दिसू शकतात. काश्मीरमधल्या सिंहासनाधिष्ठित घडामोडीमध्येच देशविघातक काळेकुट्ट रग आणि विरोधी पक्षाच्या ऐक्यविषयक–हालचाली नसल्या तरी गेला बाजार बोलाचाली, भारत–पाक संबंध–त्या निमित्ताने एकूण परराष्ट्रनीती, अलिप्ततावाद, केंद्र–राज्यसंबंध पुनर्रचनेची मागणी, अध्यक्षीय लोकशाहीवर चालू असलेला ‘अखिल भारतीय परिसंवाद’ असे सर्व रंग भरभरून उधळलेले दिसत होते. लडाखमधल्या नुब्रा व्हॅलीमध्ये पाकिस्ताननं जोरदार हल्ला चढविला आणि तो भारतीय सैनिकानी परतवून लावला अशा बातम्यानी सगळ्याच मुद्द्यांना एक नवं परिमाण प्राप्त करून दिल. अखेर विमान पळवण्याच्या प्रकरणानं आणखी एक झटका दिला.

ते विमान लाहोरमध्ये पोचलं असेल तेव्हा ठरलं की, आपण दिल्ली आणि जम्मू–काश्मीरला जायचं. पंजाब आणि जम्मू काश्मीर अशात, असुरक्षित. त्यामुळे रेल्वेज् दिल्लीच्या पुढे जातच नव्हत्या. म्हणून ‘झेलम’ नेहमीप्रमाणे दुथडी भरून वाहात नव्हती. पंजाब-काश्मीरमध्ये ड्यूटीवर रुजू व्हायला चाललेले सैनिकच मोठ्या संख्येनं होते. मनमाडला आणखी जवान डब्यांमधनं शिरले म्हणजे घुसले. दारामध्ये काळ्या मोठ्या ट्रंकाचे मोर्चे उभे करून त्यामागे

ते तैनात झाले. आधी टिसीन तहाचा हात पुढं केला, तो सैनिकांनी धुडकावून लावला. मग रेल्वेचे अधिकारी आणि पोलीस यानी खबीर भूमिका घेतली, सैनिक गाडीतून उतरत नाहीत तोवर गाडी सोडणारच नाही. नका सोडू आम्ही बसतो इथेच. मिलिटरी पोलीस आले. भडकलेल्या सैनिकानी सागितले–ड्यूटीवर रुजू व्हायची आम्हाला तारीख. वेळ दिली आहे आणि अर्जंट बोलावणं आहे. इथे आमच्या प्रवासाची काही सोय नाही, गाड्या कॅन्सल होतात, लेट होतात. सकाळपासून आम्ही स्टेशनवर आहोत. आता आम्ही उतरणार नाही! काय करायचं ते करा! एकूण संवादातल्या सर्व 'देशी' रचना वगळून मी तुम्हाला आशय सांगितला. अखेर पाऊण–एकतास मनमाडहून उतीरा झेलम सुटल्यावर पंजाब–काश्मीरमध्ये ड्यूटीवर निघालेले जवान पाय पोटात घेऊन, काळ्या ट्रंकांआड मुटकुळं करून लवंडले!

पहाटे भुसावळला स्टेशनवर मेजरजनरल नातू आले होते. म्हणजे आमचे भाऊ, निवृत्त मेजरजनरल. जम्मू–काश्मीरला जायच निश्चित झाल्यावर त्याना चाळीसगावला तार पाठवून विनती केली होती की, भुसावळला भेटा. भाऊ खरच आले होते. तेही दाण्याचे लाडू आणि पुष्कळ अनुभवसमृद्ध मार्गदर्शन बरोबर घेऊन. प्लॅटफॉर्मवर उतरल्यावर त्यांच्या पायांच पडलो. प्रबोधिनीच्या पजाब सद्भावयात्रेत भाऊ सामील झाले होते. एप्रिलमध्ये फिरोझपूर–अमृतसर पदयात्रेत तरुणाला लाजवेल अशा उत्साहान आमच्या बरोबर चालले आणि वृद्धाला शोभेल अशा अनुभवसपन्न शहाणपणान आम्हाला साभाळून घेतल. आपली लष्करातली पुष्कळ वर्षे भाऊंनी पश्चिम सीमेवरच काढलीत. त्यामुळे योजनाकुशलता, लष्करी हालचालींची समज, सुरक्षिततेसाठी घेण्याची खबरदारी याविषयी गुरु व्हाव तर भाऊनीच! त्या पदयात्रेत प्रत्यक्ष खेमकरणच्या युद्धभूमीवर नेऊन भाऊनी ६५ च्या भारत–पाक युद्धातल्या रोमहर्षक विजयाची कथा आम्हाला सागितली होती. तरणतारणहून अमृतसरला चालत जाण्याच्या रात्रीत जिथे थोडं थाबत होतो तिथे त्यानी १९७१' मधल्या पूछच्या युद्धाचं जिवत चित्र डोळ्यासमोर उभं केलं होतं. याच युद्धातील पराक्रमाबद्दल भाऊंना महावीरचक्र मिळालं आहे. पजाबमधल्या पदयात्रेत भाऊनी प्रबोधिनीच्या कार्यकर्ता–सेनेला एक महत्त्वाचा धडा शिकवला–शाततकाळात सेनेला कसून राबवा की, युद्धकाळात ते अद्भुत वाटावेत असे पराक्रम करून दाखवतील!

भुसावळला पहाटेच्या थंडीत भाऊंनी असे आणखी धडे माझ्याकडून गिरवून घेतले. मिलिटरीलाइफमधील सुरक्षाविषयक सकेत, हालचालीमधली सुसूत्रता आणि पूर्वनियोजन, आणीबाणीच्या काळात घेण्याची खबरदारी, काश्मीरमधले परिचिताचे पत्ते आणि खूप काही. त्यांना सॅल्यूट करून गाडीत बसलो. पहाट होत होती. रात्रभरचा प्रवास सपला तरी अजून महाराष्ट्र संपला नव्हता., अशा वेळी नेहमी होते ती आपल्या देशाच्या खडप्रायतेची जाणीव. देश खडप्राय, त्याच्या समस्या खडप्राय. सर्व रस्ते, सर्व समस्या दिल्लीच्या दिशेनं जातात. दिल्ली बहुत दूर है। लेकिन बाजीरावका किस्सा मशहूर है!!

'झेलम' मध्यप्रदेश पार करून दिल्लीकडे वाहात निघालीय तसा मान्सूनचा पाऊसही. त्यामुळे एरवी उघडेबोडके असणारे डोंगर, दूरवर पसरलेली उजाड माळरानं ग्यावर हिरवी शाल परसलेली. प्रवास सुसह्य. पार्श्वभूमीला रुळाखाली सपूर्ण भारत, त्यातल्या खडप्राय प्रश्नचिन्हांची प्रतिबिंबं मनात उमटलेली. पुढे राजधानी दिल्ली निवात पसरलेली!

## दिल्लीचे दोन चेहेरे

प्रसंग तसा साधाच. खच्चून भरलेल्या मिनी-बसमध्ये पायात ब्रीफकेस ठेवून उभा राहिलो. एका प्रवाशान कंडक्टरला पाच रुपये दिले. प्रवाशाचा चेहरा उघडउघड नवागताचा दिसत होता. तिकिट आठ आण्याचं, उरलेले पैसे? असं विचारल्यावर कडक्टरनं त्याच्याकडे बघून दात विचकले. आसपासचे प्रवासीसुद्धा 'नया है' अशा विवश समजूतदारपणे हसले! मी दोन रुपये दिले. तिकिट चार आण्याचच. आता पुन्हा पूर्वीच्या शॉटच 'रिटेक'. एकदा जरा चाचरतच कडक्टरला वरच्या पैशाविषयी विचारले. तेव्हा पुन्हा तो जर हसला नसता तर मी एवढा सरकलो नसतो, आवाज नकळत चढला नसता, तोडातून मराठी मायबोलीतील 'अमृतातेही पैजा' जिकणारे शब्द आले नसते, पण मग पावणेदोन रुपयेसुद्धा परत मिळाले नसते! उतरताना कडक्टर म्हणतो, 'लो भाई, तुम्हारे पैसे लेके हमें कहाँ स्वर्ग मिलगा। पर जरा तमीज स बात कीजिए। इतने बिगडते क्यो?' तीन–चार वर्षांपूर्वी प्रथम दिल्लीत गेलो होतो तेव्हा प्रथम घडलेला हा प्रसग. नतर असच वाटत राहिलं की, पहिल्याच दृश्यात हा जो चेहरा दिसला तोच पुढे वेगवेगळ्या कोनांमधून वेगवेगळ्या मूडस्मध्ये दिसत होता. या पहिल्या अनुभवाच्याच विविध अर्थाच्या छटा अजून उलगडतायत.

दिल्लीचे चेहेरे दोन. एक नवी दिल्ली, एक पुरानी दिल्ली. नव्या दिल्लीत राष्ट्रपतिभवन, भव्य राजपथ, बोटक्लब, इडियागेट, संसदभवन. पुरानी दिल्लीत अरुद रस्ते, झोपड्या किंवा झोपडीवजा घर, अस्वच्छता, दुकान, वाहनं, माणसं याची तुडुब गर्दी. नई देहलीत कॅनॉटप्लेसचा पॉश विभाग, सुपर बाजार, पालिकाबाजार असे वातानुकूलित देखणेपण. पुरानी देहलीमध्ये चादणीचौकात फुटपाथावर सजलेला 'हर लाट पाच रुपिया'वाला बाजार. नवी दिल्लीमध्ये वाहतूक, बसेस टॅक्सीजच्या वेगानं धावते. पुरानी दिल्लीतल्या वेगावर सायकलरिक्शाचं नियत्रण असत. तरी एशियाडनंतर दोन्ही दिल्ल्याच्या चेहऱ्याला जरा तुकतुकी आली आहे. दिल्लीतली वाहतूक वेगान धावते; पण मुबईच्या लोकल्सप्रमाणे माणसातला जीव चिंबवून टाकत नाही. दिल्लीतला गलिच्छपणा कलकत्त्यातल्या गलिच्छपणाला उगीच लाजवत नाही. भारताची ही राजधानी–जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राची ही राजधानी स्वतःच्या एका मस्तीत शानमध्ये जगत असते. भारतभरचे आमदार–खासदार दिल्लीदरबारी पाणी भरतात. सर्व भारतीय वैविध्य दर्शवणारे चेहरे, वेशभूषा, सस्कृत्या, पदार्थ दिल्लीच्या रस्त्यांवरनं वावरतात. महत्त्वाच्या वृत्तपत्राचे प्रख्यात पत्रकार 'शास्त्रीभवन'च्या अत्यत सुखासीन प्रेस–लाउजमध्ये भेटतात. रेलभवन, कृषिभवन, सचारभवन, योजनाभवन, रिझर्व बँक अशा वास्तूमधून भारताचं भवितव्य घडवणारी कागदपत्रं सरकत

असतात किंवा अडकून पडलेली असतात. AIR, TV, वृत्तपत्रं, संस्था -- दिल्लीतल सगळंच अखिल भारतीय व्यापाच. खासदार, खाबूगिरी, खुशमिजाज रंगेलपणा हेही अखिल भारताचं प्रतिनिधित्व करणारं. इथला साधा कंडक्टर खासदाराच्या थाटात वागतो! (हे पहिल्याच प्रसंगात पाहिलं की नाही?) मग खासदार कसे वागत असतील? इथला नवयुवक आपण मंत्र्यांची मुलं आहोत अशा भावात वावरतात, मग खरंच मंत्र्यांची मुलं कशी वावरत असतील?

आमच्या या सर्वसमावेशक संस्कृतीच्या राजधानीला अजून शहाजहानरोड, औरंगजेबरोड, डुप्लेरोड ही नावं चालतात अजून लॉर्ड मौंटबॅटन लंडनमध्ये निवर्तला की, दिल्लीतला तिरंगा अर्ध्यावर उतरतो. एकमेकांपासून दीडशे वर्षांच्या अंतरावर असलेले दोन भारत एकाच वेळी दिल्लीत दिसतात. लोक, कार्यकर्ते, विविध पक्षनेते, मंत्री, पत्रकार, दुकानदार अशांना भेटताना आपला वावर एक खोलीच्या घरापासून एका खोलीएवढ्या बाथरूमपर्यंतच्या व्याप्तीवर होतो. नीट पाहिलं तर दिल्लीत भारत दिसतो. समजावून घ्यायचा प्रयत्न केला तर भारताचं राजकारण, समाजकारण, अर्थकारण दिल्लीत आपल्याला चक्रावून टाकतं.

मी दिल्लीत पोचलो त्या दिवसांमध्ये कॉंग्रेस (आय)नं कंबर कसायला सुरुवात केलेली. विरोधी पक्षनेते दिल्लीतळावरच डेरेदाखल झालेले. काश्मीरच्या राजकारणाशी संबंधित महत्त्वाच्या व्यक्ती–फारुक अब्दुल्ला, जी. एम. शाह, देवीदास ठाकूर, सय्यद मीर कासिम–सर्वजण दिल्लीतच आलेले सातव्या पंचवार्षिक योजनेचे पडघम घुमू लागलेत. राष्ट्रीय विकास परिषदेची बैठक, त्यावर विरोधी पक्षीय मुख्यमंत्र्यांचा बहिष्कार, पंजाबवरील श्वेतपत्रिका, विरोधी पक्षाची NTR च्या संयोजनाखाली एकत्र बैठक -- समजावून घ्यायला आणि चक्रावून जायला पुष्कळ साधनसामुग्री उपलब्ध होती,

□

दिल्लीतली सुरक्षाव्यवस्था हे एक नित्याचंच लक्षण. आता पंजाबमधल्या अतिरेक्यांच्या कारवाया आणि धमक्या, नव्यानंच भर पडत असलेल्या काश्मीर लिबरेशन आर्मीपासूनचा धोका यामुळे सुरक्षाव्यवस्था अधिकच कडक करण्यात आली आहे. सर्व महत्त्वाची सरकारी कार्यालयं, मंत्रीगण, विरोधी पक्ष–नेत्यांची घरं, पक्षांची कार्यालयं यासमोर बंदूकधारी खाकी सुरक्षा–सैनिक निवडणूकचिन्हासारखा उभा असतो दिल्लीकर सांगतात ही सुरक्षाव्यवस्था केवळ दिखाऊ आहे, ढिसाळ आहे ज्याला आपलं 'लक्ष्य' साधायचं आहे तो सफाईदारपणे कार्यभाग उरकून गुल होऊ शकेल; पण संबंधित व्यक्तीची भेट ज्याला घ्यायची आहे त्याला मात्र बायोनेटसमोर सावधानमध्ये उभं राहावं लागेल. काश्मीर लिबरेशन आर्मीनं माफियाच्या काही 'व्यावसायिकांना' सुपारी दिली आहे अन् संबंधित 'जॅकल्स्' राजधानीत पोचलेत अशी त्या दिवसांमधली बातमी होती. अशा वेळी सुरक्षासैनिकांच्या हातून चुकून बंदूक साफ करताना वगैरे.. गोळ्या उडण्याचा सराव होत होता. सफदरजंगरस्ता दोन्ही बाजूंनी बंद केला होता. सफदरजंगरस्ता–पंतप्रधाननिवास–शेजारच्या चौकातून जाणाऱ्या प्रत्येक वाहनाची तपासणी केली जात होती श्वेतपत्रिका प्रसिद्ध होण्याच्या दुपारी PIB मध्ये गेलो होतो. एका विशिष्ट क्षणाला पन्नासएक साध्या वेशातली माणसं आली. न बोलता त्यांनी आपापल्या 'पहाऱ्या'च्या जागांवर घुटमळायला सुरुवात केली. ही हालचाल, त्यांचं येणं, वावरणं इतकं स्पष्ट होतं की, अनुभवी नजर यातल्या प्रत्येकाला वेचून वेगळं काढू शकली असती.

## ९ रेसकोर्स रोडवर

नऊ–रेसकोर्स रोडवर मात्र असा काही पहारा नव्हता. साध्या वर्दीतले असले तर दिसले नाहीत. नऊ रेसकोर्स रोड म्हणजे विठ्ठलराव गाडगीळ. पूर्वी त्यांच्या भेटी झालेल्या होत्या एप्रिलमध्ये पंजाबसद्भाव यात्रेहून परतताना दिल्लीत याच घराच्या हिरवळीवर छोटीशी सभा झाली होती. पांढराशुभ्र पायजमा–झब्ब्यातल्या विठ्ठलरावांनी घरगुती अगत्यानं स्वागत केलं होतं, हे त्यांच्या सचिवांच्याही लक्षात होतं.

तीन सचिव एका वेळी त्यांच्या खोलीत कामात होते. टेबलावर कागदपत्रांचे ढिगारे होते. वृत्तपत्रं पडलेली होती. त्यातच मराठी वृत्तपत्रं जाणीवपूर्वक उठून दिसत होती. फोन्स पटापट होत होते: भेटायला येणाऱ्यांच्या नावांच्या चिठ्ठ्या आत साहेबांकडे जात होत्या आतून साहेबांचा निरोप आला की पुढचा माणूस आत रवाना व्हायचा. एका टाइपरायटरवर विठ्ठलरावांच्या उद्याच्या सर्व भेटीगाठीचं वेळापत्रक टंकलिखित होत होतं. आत कोणी तरी चारपाच माणसं साहेबांशी बोलत असतानाच निरोप आला. चटकन् उठून खोलीत गेलो विठ्ठलरावांनी हसून सांगितलं, बसा जरा, एक–दोन मिनिटांत याचं काम उरकतो मग निवांतपणे बोलू. खोलीत उजवीकडे कोच ठेवून निवांतीची जागा केली होती. त्यातल्या एका कोचमध्ये रुतलो. अलाहाबादहून आलेल्या एका प्रतिनिधीमंडळाशी विठ्ठलराव चर्चा करत होते त्यामुळे मी इकडे तिकडे बघत बसलो. भिंतींना पुस्तकांची कपाटं होती. कपाटांमध्ये कायदाविषयक पुस्तकं होती. विठ्ठलरावांच्या टेबलवर डावी–उजवीकडे फायली, कागदपत्रं होती, त्यातच रँडाल्फ चर्चिल (सर विन्स्टनचा मुलगा) चरित्र होतं. टेबलाच्या मागे खादीच्या पँटशर्टमध्ये विठ्ठलराव, विठ्ठलरावांच्या मागे डोक्याएवढ्या उंचीवर इंदिराजींची प्रसन्न, हसणारी तस्वीर त्याही वर काकासाहेब गाडगीळ वाकून पंडितजींच्या कानात काही तरी सांगतायत आणि पंडितजी मान वाकवून ते लक्षपूर्वक ऐकतायत अशी तस्वीर. आलेल्या मंडळीतला बुटकासा, काळा, गोल चेहऱ्याचा माणूस विठ्ठलरावांशी फारच दोस्तीनं बोलत होता. विठ्ठलरावांचा प्रतिसादही तसाच होता. अलाहाबादच्या टेलिफोनएक्सचेंजकेंद्राविषयी बरीच चर्चा झाल्यावर निघताना रँडॉल्फ चर्चिलचं चरित्र त्या बुटक्या–काळ्या–गोल चेहऱ्याला दाखवून विठ्ठलराव म्हणाले, 'वाच हे, मोठ्या माणसांच्या मुलांचे मनोव्यापार आपल्याला समजणं सोपं आहे' ते गेल्यावर येऊन कोचात बसत विठ्ठलरावांनी सांगितलं, 'हे हरी शास्त्री, लालबहादुरांचे चिरंजीव, अलाहाबाद मतदारसंघातले कॉंग्रेसचे प्रतिनिधी'

चर्चेला सुरुवात अशी खेळकर झाली तशाच खेळकर, मनमोकळ्या सुरात पुढे चर्चा चालू राहिली याबद्दल विठ्ठलरावांचे आभार मानायला हवेत. प्रारंभीच मी त्यांना सांगितलं, 'पंजाबमधली

लष्करी कारवाई आणि काश्मीरमधल फारुक सरकारचं वजन याला जनतेच्या एका मोठ्या गटानं मान्यता दिलेली दिसते. त्याना असे वाटत असत की, देशाच्या ऐक्याला बाधक असलेल्या घटकाचा असाच नि:पात व्हावा; पण याच हालचालीवरही पुष्कळ गदारोळ उठला आहे. काँग्रेसच्या पक्षीय राजकारणावर गंभीर टीका केली जातेय, हेत्वारोप केले जातायत. अशा वेळी मला काँग्रेसची, सरकारची बाजू समजावून घ्यायचीय म्हणून तुमच्याकडे आलो.' विठ्ठलरावानी विचारलं, 'आजच प्रसिद्ध झालेली श्वेतपत्रिका पाहिलीय का?' पाहिली होती; पण वाचली नव्हती त्यानी त्याच्याकडची हिंदी प्रत मला दिली. 'ही वाचा पंजाबमधल अकाली आंदोलन आणि अतिरेकी कारवाया या पूर्णपणे देशविघातक होत्या. याच कारवायाना काश्मीरमधून आधार होता.'

'लडाखमधल्या भारत–पाक चकमकींशी या घडामोडींचा काही संबंध आहे का?'

'नाही. त्या उघड लष्करी चकमकी आहेत. त्याचा राजकीय सबध काहीच नाही.'

'पण काही लष्करी तज्ज्ञांनी या चकमकींच्या खरेपणाविषयीच शंका व्यक्त केल्यात आलेल्या निवेदनांमध्ये ते काही विसगती दाखवून देतात त्यामुळे निवडणुकांमध्ये भांडवल करण्यासाठी भारत–पाक चकमकींचा 'वापर' केला जातोय अस काही अभ्यासू पत्रकारांनी माडलेय!–'

त्या पत्रकाराचं नाव सागून विठ्ठलराव म्हणाले, 'एरवी तो खरच चांगलं, अभ्यासपूर्ण लिहितो; पण या वेळी त्याचा कयास चुकीचा आहे. या चकमकी एप्रिलच्या अखेरीस झडल्या. त्याचे खात्रीशीर, तपासून घेतलेले अहवाल यायला वेळ लागला म्हणून वृत्तपत्रात त्या बातम्या अलीकडेच आल्या इतकच. त्याच्याकडे राजकीय दृष्टिकोनातून पहाण्याची आवश्यकता नाही काश्मीरमधला मुख्य प्रश्न देशहिताला पोषक अस सरकार तिथं हव हा आहे...'

'मग आत्ताचं दत्ता शाह सरकार तसं आहे? जी. एम. शाह हा माणूस फारुख अब्दुल्लांपेक्षा काही वेगळा आहे काय?'

विठ्ठलराव हसले. याहून अधिक काही प्रतिक्रिया इतक्यात त्याच्याकडून अपेक्षिणं चूक होतं मूळ मुद्दा त्यानी पुढ चालू ठेवला–

'फारुख अब्दुल्लाच सगळं राजकारण सशयास्पद होत यापूर्वी शेख अब्दुल्ला तुरुगात असताना युनोत गेलेल्या पाकवादी प्रतिनिधीमंडळाच नेतृत्व फारुखनी केलेलं आहे. काश्मीर लिबरेशन फरट आणि डॉ. जगजितसिह चौहान याच्याशी लडनमध्ये फारुखचे संबध होते. जमियत तुलबा या सरळसरळ, जातीयतावादी, पाकवादी सघटनेशी डॉक्टर अब्दुल्लाचे सबध आहेत. निवडणूक समझौता आहे परवाच्या लष्करी कारवाईनंतर काश्मीरमध्ये उसळलेल्या दगली आवरण्यात काश्मीर प्रशासनान अक्षम्य दिरगाई केली. तीही जाणीवपूर्वक, जम्मूमध्ये जमावानं हल्ला करून टेलिफोनएक्स्चेज जाळलं. हे चालू असताना पोलिसाना निरोप गेले; पण कोणी आल नाही. अखेर तासाभरान होमगार्डस् आले. शिख अतिरेक्याशी फारुख अब्दुल्लाचं संधान होतं काश्मीरमध्ये त्या अतिरेक्याना उघडउघड आश्रय होता. त्याची प्रशिक्षणशिबिरं काश्मीरमध्ये झालीत. या शिबिरात उपस्थित राहून फारुखनी भाषणं केली आहेत. तीन जूनच्या कारवाईनंतर काश्मीर सरकारला शिख अतिरेक्यांची यादी देण्य त आली होती प्रत्यक्षात एकही अटक झाली नाही आणि आता विमान पळवण्याचं प्रकरण!'

यावर बरेच प्रश्न विचारता आले असते; पण प्रश्नोपप्रश्नांचा फापटपसारा टाळून मूळ मुद्द्याकडे जाता आलं तर पहावं म्हणून विचारल– 'असं एवढं जर आहे तर काश्मीरला खास दर्जा देणारं कलम ३७० रद्द का नाही केल जात?–'

'तूर्त ते शक्य नाही आणि तस आवश्यकही नाही. तसंच असतं तर जनता सरकारन का नाही रद्द केल? सरकारात असताना वाजपेयीना मी हा प्रश्न विचारलाच होता. ३७० व्या कलमाच विरोधी पक्षीय उगीचच भांडवल करतात प्रत्यक्षात काश्मीरमध्ये काहीही घडवून आणायला कलम ३७० चा अडथळा होत नाही मग उगीच त्याला हात लावून कशाला मोहोळ उठवा?'

'मग ३७० कलम रद्द करा म्हणणाऱ्यांची ती केवळ राजकीय मागणी म्हणायची काय?'

'अह, तस नाही; पण मुख्य प्रश्न घटनेच्या एखाद्या कलमाचा नसून राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्याचा आहे...'

वाजपेयीना प्रश्न विचारल्याचा उल्लेख आणि आता 'मुख्य प्रश्न राष्ट्रीय एकात्मता' हे सूत्र सागून, कलम ३७० वरच्या प्रश्नाना बगल देण, ही सवादातली चतुराई मानायची की, एक केवळ योगायोग की, खरच राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न विठ्ठलरावाना माडायचा होता, हे त्या वेळी मला निश्चित करता आल नाही. तेवढी जुळवाजुळव मनात करून पहायला तेव्हा वेळही नव्हता; पण त्याच्या या उत्तरान '३७०' वरचे विचारता येण्याजोगे बरेच प्रश्न परस्पर कापले गेले. मुळात घटनेच हे कलम ही 'तात्पुरती तरतूद' असून यथावकाश ती अदृश्य होईल अस मार्गदर्शक तत्त्व आहे. हे कलम काश्मीरला खास दर्जा देतं. त्यानुसार अस्तित्वात असलेल्या वेगळ्या काश्मीरी राज्यघटनेन काश्मीरची स्वायत्तता ठळक केली आहे. उर्वरित भारतातला नागरिक काश्मीरमध्ये घर, मालमत्ता करू शकत नाही, जमीन खरेदी करू शकत नाही. मतदानाचा हक्क बजावू शकत नाही! थोडक्यात भारताचा नागरिक हा काश्मीरचा नागरिक नसतो; पण काश्मीरचा नागरिक मात्र भारताचा नागरिक असतो. या तरतुदीमधूनच काश्मीर पुनर्वसन विधेयक जन्माला आले पस्तीस वर्षांपूर्वी फाळणीच्या आसपासच्या काळात काश्मीर सोडून पाकिस्तानात गेलेल्या नागरिकाना परत येण्याचा हक्क मिळाला. त्याची त्या वेळची मालमत्ता परत मिळण्याची ग्वाही मिळाली एका बाजूला हे असताना, त्याच काळात सियालकोट भागातून निर्वासित म्हणून काश्मिरात आलेले सर्व अजून 'निर्वासित'च आहेत त्याना काश्मिरी नागरिकत्वाचे हक्क नाहीत त्याहून महत्त्वाचं म्हणजे या कलमाच आणि त्यामळ, काश्मीरला मिळणाऱ्या स्वायत्ततेच भाडवल करून काही प्रातामधून प्रातिक स्वायत्ततेची मागणी पुढे येते आहे विशेषत पजाबमधलं अकालीदलाच राजकारण पहाता प्रातिक स्वायत्ततेची मागणी हा विघटनाच्या राजकारणान पाघरलेला बुरखा आहे, असं म्हणायला जागा आहे. तेव्हा या तीनशेसत्तराव्या कलमाच्या भानगडीचा सबध केवळ काश्मीरपुरताच नाही तर सपूर्ण भारताच्या राजकारणावर त्याची सावली पडते. अस असेल तर 'न रहे बाँस, न बज बासुरी' या न्यायाने मूळ ते कलमच रद्द का न करा?

असे आणि यासंबधी खूप प्रश्न विचारायचे होते; पण विठ्ठलराव विचाराचा एक महत्त्वाचा धागा पकडत होते. तो तोडायला नको शिवाय ते मनमोकळेपणानं बोलत होते, मग उगीच त्यात चतुराई किंवा बगल देण्याचा प्रयत्न शोधत न बसता ते त्यांना जाणवणारा प्रश्न कसा माडतायत हे समजावून घ्याव म्हणून लक्षपूर्वक ऐकू लागलो–

'विशेषत: भारताच्या सीमावर्ती भागात एकात्मतेची भावना निर्माण करण हा मध्यवर्ती महत्त्वाचा प्रश्न आहे. नागालँड, मणिपूरच पहा ना. तिथे आज पंधरा ऑगस्ट साजरा होत नाही. का?

तर तो आमचा स्वातंत्र्यदिन नाही. आम्ही अजून 'भारताच्या गुला-मी'तच आहोत असे तेथे मानले जाते व मणिपूरमध्ये १८५७ च्या काळात ब्रिटिशांशी लढताना मारल्या गेलेल्या मणिपुरी राजाचा स्मृतिदिन 'स्वातंत्र्यदिन' म्हणून साजरा केला जातो. माझ्या ओळखीचाच एक नेता मणिपुरी राणीला गुप्तस्थळी भेटायला गेला होता त्यानं तिला राष्ट्रीय प्रवाहाशी जुळवून घेण्याविषयी समजावून पाहिले. ती मानेना. अखेर एक भावनिक अपील करावं म्हणून या नेत्यान तिला सांगितलं– 'आपण कलकत्ता विद्यापीठात दोघंही शिकायला होतो. मग बंधु-भगिनी म्हणून आपलं एकराष्ट्रीयत्वाच नातं नाही का बनू शकत?' तेव्हा त्या राणीनं काय उत्तर दिलं माहितीय? फार गंभीर विचार करायला हवा असं उत्तर आहे ते. ती म्हणाली 'चर्चिल आणि नेहरू सुद्धा एकाच विद्यापीठाचे विद्यार्थी होते; पण त्यांची'राष्ट्रं'वेगवेगळी होती तसं तुमचं आणि माझं आहे!'

## वेढला गेलेला भारत

अर्थात् या एकात्मताविरोधी चळवळींना भारताबाहेरून चेतवलं जात हे उघड सत्य आहे. अलीकडच्या काळातल्या दक्षिण आशियातल्या घडामोडीच नीट पहा. भारताचा सर्व शेजारी राष्ट्रांशी या ना त्या कारणानं तणाव वाढला आहे आणि तो उगीच, आपसूक वाढलेला नाही. त्यामागे बड्या शक्ती आहेत हिंदी महासागरात दिगो गार्शियावर अमेरिकन आरमार आहे श्रीलंकेच तमिळ प्रश्नावरनं भारताशी कधी नव्हतं एवढं वाकडं निर्माण झालय. तिथे आता 'मोसाद'–इस्त्रायली संघटना तळ देऊन आहे. इस्त्रायल आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणाचं प्रतिनिधित्व करतो हे स्पष्टच आहे. मग पूर्वेकडे या. बांगलादेशाशी संबंध सुरळीत नाहीत. उत्तरसीमेवर चीन आहे नेपाळ भारताकडे बारीक डोळे करूनच पहातो. पाकिस्तानशी तर कायमच तणावाचे संबंध असतात. ते तसेच तणावाचे राहावेत याची काळजी बड्या शक्तींकडून घेतली जाते. आंतरराष्ट्रीय परिस्थितीत भारत शेजारी राष्ट्रांकडून असा वेढला गेलाय आणि हे चुकून घडलेलं नाही. शेजारी राष्ट्रांशी तणाव पैदा होऊन भारत सतत दबावाखाली असावा, या डावपेचामागे बडी शक्ती आहे. असं पहा की, युनोमध्ये अमेरिकन प्रतिनिधी नेहमी भारताविरुद्ध का बोलतो? अमेरिकन व्हेटो भारताविरुद्ध, अनेकदा पाकच्या बाजूनं का वापरला जातो? कारण अमेरिकन वैश्विक राजकारणात भारत आणि पाकिस्तान या समसमान शक्ती मानलेल्या आहेत. दक्षिण आशियातलो सत्ता समतोल टिकून राहयाला भारत, पाकिस्तान तुल्यबळ रहाणं अत्यावश्यक आहे. त्यामुळे भारत ही एक महासत्ता किंवा निदान विभागीय सत्ता बनू नये असंच या बड्या शक्तींचं धोरण असतं. आकारमानानं मोठ्या असणाऱ्या कोणत्या राष्ट्राच्या शेजारी देशावर नेहमीच एक मानसिक तणाव असतो. त्याचा नेमका फायदा अमेरिका उठवते!

ही Encirclement Theory मी सर्वप्रथम आसाममध्ये ऐकली होती. श्रीलंकेतल्या तामिळप्रश्नावर भाष्य करताना केरळमधल्या अभ्यासकांनी याच सिद्धांताची आवृत्ती ऐकवली होती. पंजाबमधल्या परिस्थितीत एकीकडे मन.पूर्वक 'सद्भावकार्य' करतानाच मनातल्या मनात शक्य तेवढे ठोकळे जुळवून पहायचा प्रयत्न केला होता. तेव्हाही कित्येकदा त्या जुळून आलेल्या ठोकळ्यावर याच सिद्धांताचं चित्र उमटलेलं असायचं. तेव्हा मनात शंका असायची की, आकारमान आणि आर्थिक–लष्करी बळ या बाबतीत शेजारी राष्ट्रांची एकत्रित शक्ती भारताच्या निम्म्याएवढीसुद्धा भरत नाही. मग 'वेढले' गेल्याची भावना आपल्या इथे का पैदा होऊ द्यावी? किंवा आंतरराष्ट्रीय राजकारणात भारतानं कधीच आक्रमक भूमिका माडलेली नाही, आक्रमक कृती केलेली नाही मग शेजारी राष्ट्रांनी नाहक भयगंड बाळगून भारताकडे सशयित भीतीच्या नजरेनं का पहावं? प्रश्न विचारण्यापूर्वी विठ्ठलराव पुढे म्हणाले,

'शेजारी देशामध्ये एक सहज भय–भावना असते. भौगोलिकदृष्टया भारताला लागून असलेले देश तर सोडाच. ऑस्ट्रेलियातसुद्धा मला अशी भावना आढळली होती. तिथल्या नॅशनल युनिव्हर्सिटीच्या 'आंतरराष्ट्रीय राजकारणा' च्या प्राध्यापकानंच मला हे सांगितलं. तो म्हणाला, दुसऱ्या महायुद्धापूर्वी आम्हाला जपानबद्दल जसं वाटायचं, तसं आता भारताबद्दल वाटतं का विचारलं तर म्हणाला, आकारमान, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती याचा विचार करता भारत ही एक सुप्त (Potential) महाशक्ती आहे. त्याचा दबाव आम्हालासुद्धा वाटतो. जपानकडे स्वतःची लष्करी ताकद नसल्यामुळे, जपानबद्दल असं वाटत नाही. मग चीनबद्दल का नाही वाटत असं? तर तो प्राध्यापक म्हणाला, चीन दूर आहे.'

'तुम्ही म्हणताय ते मान्य. फक्त मी त्यात एक भर घालीन. तो योग्य आहे का सांगा! भारत सामर्थ्यवान बनणं जसं अमेरिकेला नको आहे, तसं रशियालाही नको आहे. केवळ सध्याच्या राजकीय आवश्यकतांमुळे रशियाची धोरणं निराळी आहेत'

'बरोबर आहे. आग्नेय आशियात रशियाचं एकमेव मित्रराष्ट्र आहे व्हिएतनाम आणि दक्षिण आशियात भारत. अमेरिका–चीन–दोस्ती लक्षात घेता भारताशी मैत्री असणं हे रशियाला आवश्यक आहे अन् अफगाणिस्तानात रशियानं पाय रोवलेले असल्यामुळे, पाकिस्तान हा आपला तळ करणं अमेरिकेला आवश्यक आहे.'

. काश्मीरवरून सुरू झालेली चर्चा कुठल्या कुठं येऊन पोचली होती. त्यात एक सलग धागा होताच. तो स्पष्ट करत विठ्ठलराव म्हणाले, 'भारताचा कोणताही प्रश्न अशा सर्व आंतरराष्ट्रीय संदर्भापासून सुटा करून पाहता येणार नाही. त्यातही राष्ट्रीय एकात्मता हा गाभ्यातला प्रश्न आहे विदेशी राजनीतीचा नेहमीच हा प्रयत्न आहे की, केंद्र दुबळं रहावं, अस्थिर रहावं. त्यासाठी अंतर्गत आणि बाह्य अस्थिरतेला या शक्तींकडून खतपाणी घातलं जातं. काश्मीरमधल्या राष्ट्रविघातक कारवाया हा अशा सर्व साखळीचा एक भाग आहे.'

सचिवानं खोलीत शिरून सांगितलं,'शालिनीताई आल्यात' तेव्हा एकदम मोठा फ्लॅशबॅक संपवून वर्तमानात आल्यासारखं वाटलं.' 'बराय मग या आता.' असं ते सांगतील याची वाट पाहिली. तर त्यांनी सचिवाला उत्तर दिलं, 'घरात बसायला सांग, मी आलोच.' आणि पोझ जराही न बदलता लक्ष पुन्हा चर्चेत वळवलं.'

एक शंका विचारतो. अशा प्रकारच्या चर्चांमध्ये नेहमीच मला ही शंका सतावते म्हणून विचारतो. त्यात काही उद्धटपणा वाटला तर माफ करा; पण ज्या तऱ्हेच्या आव्हानांना भारताला येत्या काही काळात तोंड द्यावं लागणार असं दिसतय त्यांचा स्वीकार करण्याएवढ्या आपल्या 'सिस्टीम्स' आणि व्यक्ती कणखर आहेत का? फॅकली सांगायचं तर काँग्रेस हा एकखांबी तंबू आहे. दुसरा कोणताच राजकीय पक्ष खऱ्या अर्थानं एकटा काँग्रेसला पर्यायी ठरू शकेल अशा अखिल भारतीय वकुबाचा नाही. राजकारण, अर्थकारण, समाजकारण सडवून टाकणारा भ्रष्टाचार हीसुद्धा एक Established Fact आहे. अशात पुढे काय? आव्हानांना सामोरं कोण जाणार?'

पुढे काय या प्रश्नाला काही तरी उत्तर विठ्ठलरावांनी दिलं; पण आता ते स्मरत नाहीये. त्यांच्या मुलाखतीची टिपणं घेतलेलं वहीचं शेवटचं अर्धं पान कोरंच राहलंय. या कोऱ्या ओळींवर उत्तर कोण लिहिणार? आधी ते शोधायला तर हवं? □

# बंडखोर आणि वसंतदादा

अभय गोखले

इंदिरा काँग्रेसची प्रत्येक राज्यातील पक्षयंत्रणा खिळखिळी झाली आहे. बहुतेक मुख्यमंत्र्यांच्या पायास, तो नाकापेक्षा जड होऊ नये म्हणून, काही तरी लोढणे अडकवलेले आहेच आणि याचा सर्व दोष केंद्रिय नेतृत्वाकडेच जातो. कधी याला चढव तर त्याला खाली उतरव, या सूत्रामुळे पक्षामध्ये शिस्त नावाची चीजच राहिलेली नाही. १९७४ पर्यंत, म्हणजे आणीबाणीच्या पूर्वी निरनिराळ्या राज्यात जेथे काँग्रेसपक्ष सत्तेवर होता तेव्हा, आताच्याइतक्या लाथाळ्या नव्हत्या; परतु आणीबाणीनतर, म्हणजे काँग्रेस सत्ताभ्रष्ट झाल्यावर, जी बेशिस्त पक्षात बोकाळली, तीमध्ये काँग्रेस पुन्हा सत्तेवर आल्यावरही काही बदल झालेला नाही. उलट ती दिवसेदिवस वाढतच आहे याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, इदिरा गाधीना काँग्रेसचे कार्यकर्ते पूर्वीसारखे घाबरत नाहीत कारण इदिरा गाधी व त्याचा पक्ष निवडणुकीत हरू शकतो हे जनता पक्षाच्या १९७७ च्या प्रचड विजयाने सिद्ध झाले आहे १९७४ पूर्वी इदिरा गाधीचा पक्षावर जो वचक होता तो आता न राहण्याचे हेच महत्त्वाचे कारण आहे. सजय गाधीच्या छोटयाशा कारकीर्दीत बेशिस्त व उद्दाम कार्यकर्त्यांचा एक सच पक्षात तयार झाला असून, त्यातील कित्येक जणाची महत्त्वाच्या पदावरून उचलबागडी झाली असली तरी जुने निष्ठावत या योग्य नावाखाली त्याचे उपद्रव चालू असतात व त्याचे वाळकडू त्याना सजय गाधी 'देशके नेता' असताना मिळालेल आहे महाराष्ट्रातील बंडखोरांबद्दल चर्चा करण्यापूर्वी निरनिराळ्या राज्यातील वरील ब्रँडच्या लोकानी जो उच्छाद माडला आहे त्याचा धावता आढावा घ्यायला हवा.

संजय गाधीनी वरून नेमलेल्या मुख्यमंत्र्यापैकी फक्त मध्यप्रदेशाचे अर्जुनसिग आपली जागा टिकवून आहेत इतरजण त्या पदावरून पदच्युत झाले हा काही योगायोग नव्हे. बाकी सारे मुख्यमंत्री हे त्याच लायकीचे होते. आमदाराच्यात मतदान घेतले असते तर त्याना १।३ ही पाठिबा मिळाला नसता! केवळ सजय गाधीच्या कृपेने ते मुख्यमंत्री झाले. यातील महाराष्ट्राचे अब्दुल रहेमान अतुले व कर्नाटकाचे गुडुराव हे विशेषत सजय गाधीच्या अगदी जवळचे मानले जात. इदिरा गाधी प्रतिभाप्रतिष्ठानच्या प्रश्नावरून अतुल्याना मुख्यमंत्रीपदावरून जावे लागले, तर गुडुरावच्या अरेरावी व भ्रष्टाचारी राजवटीला कटाळून तेथील जनतेने गुडुराव व इंदिरा काँग्रेस या दोघानाही सत्ताभ्रष्ट केले ! सजय गाधीचे आणखी एक शागीर्द राजस्थानचे पहाडिया हे त्याच्या अकार्यक्षमतेमुळे मुख्यमंत्रीपदावर राहू शकले नाहीत, तर बिहारच्या जगन्नाथ मिश्राना त्याच्या बेशिस्त, पक्षविरोधी कारवायाबद्दल चंद्रशेखर सिग याच्याकरता जागा खाली करावी लागली यापैकी अतुले, गुडुराव, पहाडिया, मिश्रा हे सर्व एकाच ब्रँडचे लोक असल्याने ते मुख्यमंत्रीपदावरून गेल्यावर त्याच्या पक्षविरोधी कारवायांस ऊत आला तर आश्चर्य वाटावयास नको यातील अतुले व मिश्रा हे तर सध्या बडखोरी करण्यात आघाडीवर दिसतात. एखाद्याला सशय यावा, की, केंद्रिय नेतृत्वाचे एखादे गुपित या दोघाना माहीत असल्याने, ते उघडकीस येऊ नये म्हणून त्याच्या बेशिस्त, बेलगाम वागणुकीकडे दुर्लक्ष केले जात आहे अतुले व मिश्रा हे उघडउघड मुख्यमंत्र्याना आव्हान देतात, त्याच्याविरुद्ध बेलगाम वक्तव्ये करतात, निरनिराळ्या निवडणुकात स्वपक्षाच्या उमेदवाराला, तो आपल्या गटाचा नसल्यास, पाडण्याचा प्रयत्न करतात व हे सगळे वरून खपवून घेतले जाते याचा अर्थ काय समजायचा?

महाराष्ट्रात अंतुले, आदिक, काळे, भोसले यानी उच्छाद माडलाय तर गुजराथमध्ये तीन मंत्र्यानी बंडखोरी केली असून, वीस कलमी कार्यक्रम अमलबजावणीसमितीचे अध्यक्ष जीनाभाई दारजी यानी मुख्यमंत्री सोळकीना सळो की पळो करून सोडलय ! हाय कमाडवाले कोणतीच निश्चित बाजू घेत नसल्याने, मुख्यमंत्र्याना बडखोराविरुद्ध कडक कारवाई करता येत नाही व राज्याच्या विकास कार्यक्रमांकडे लक्ष देण्याऐवजी बडखोराकडे लक्ष पुरवावे लागते. मध्यप्रदेशात प्रदेश काँग्रेस (इं) चे अध्यक्ष तिवारी हे हातघाईवर आलेत. मुख्यमंत्री अर्जुनसिग व त्याच्या कारभारावर त्यानी उघडपणे टीकेची झोड उठवली आहे अध्यक्षपदावर असलेला माणूस असे बेलगाम वर्तन करू लागल्यावर, इतरानी त्याच्यापासून काय आदर्श शिकायचा ? बिहारमध्ये मुख्यमंत्री चद्रशेखर सिग यांच्याविरुद्ध जगन्नाथ मिश्र व त्याच्या साथीदारानी इतके रान माजवले आहे की, विरोधीपक्षही त्याबाबतीत एक पाऊल त्याच्या मागेच आहेत. तथापि जगन्नाथ मिश्र याच्यावर कडक इलाज करण्याऐवजी केवळ सौम्य शब्दात त्याना सुनवले जात आहे. जर असेच चालू राहिले तर मुख्यमंत्र्यानी कारभार तरी कसा करायचा? दर वेळेस बडखोर काही तरी कागाळी करतात, मग मुख्यमंत्री तावातावाने त्याच्याविरुद्ध कडक अॅक्शन घेतली जाईल असे सागतात आणि दिल्लीला जातात व येताना मान खाली घालून येतात! हाय कमाडचा निरीक्षक येतो, बंडखोराना नुसती तंबी देतो; पण मुख्यमंत्र्यांना, बंडखोराना आपली जागा दाखवण्याची सधी दिली जात नाही आणि ते प्रकरण तेथेच सपते व बंडखोर पुन्हा दुसरे नवे उपद्रव सुरू करतात हे सर्व दुष्टचक्र महाराष्ट्रातच नव्हे तर काँग्रेस (इ) पक्ष सत्तेवर असलेल्या सर्वच राज्यात चालू आहे व याला इदिरा गाधी व त्याचे साथीदारच जबाबदार आहेत कोणत्याही मुख्यमंत्र्याला निर्धोकपणे राज्य करू द्यावयाचे नाही व सतत त्याच्या मानेवर टागती तलवार ठेवायची हा काँग्रेस(इं) नेतृत्वाचा खाक्या आहे त्यामुळेच राज्याराज्यातील बडखोरीस हायकमाडच जबाबदार आहे. अगदी ज्या ठिकाणी इदिरा काँग्रेस पक्ष सत्तेवर नाही, तेथही बंडखोरी माजलीच आहे कर्नाटकात के एच. पाटील, श्रीकान्तय्या मोईली, गुडुराव असे अनेक गट निर्माण झाले असून, पक्षाचा विचार न करता जनता मत्रिमडळ कोसळले तर मुख्यमंत्रीपदी वर्णी लावून घेण्यासाठी हे गट एकमेकावर कुरघोडी करत असतात आंध्रप्रदेशात प्रदेशाध्यक्ष राजशेखर रेड्डी याना काम करणे कठीण झाले आहे. कारण वेंगलराव, नरसिंह राव, ब्रह्मानद रेड्डी असे अनेक गट त्याच्या कामगिरीवर नाराज असून, आपलेच घोडे पुढे दामटत आहेत.

## हायकमांडचा विश्वास चौकडीवर

महाराष्ट्रातील परिस्थितीच वेगळी आहे. १९७८ मध्ये काँग्रेसपक्ष फुटल्यावर, वसतदादा हे यशवतराव चव्हाणाबरोबर इदिरा गाधीच्या विरोधात गेले, तेव्हापासून इदिराजीचा त्यांच्यावरील विश्वास उडाला आहे. शरद पवारानी बंडखोरी करून वसंतदादाचे मुख्यमंत्रीपद हिसकावून घेतल्यावर मग वसतदादा व इंदिराजी याच्यात दिलजमाई

पृष्ठ ३१ वर



# खतडवा

## नव्या नवलाईचा एक स्वातंत्र्य-दिवस

गीता साने

'काय रे मुलांनो, होमवर्कला आज सुट्टी द्यायची आहे काय ?' रोजच्यापेक्षा लौकर अंगणात गोळा होऊन कलकलाट करणारी चिमणसेना पाहून मी प्रश्न केला.

'अग ऽऽ आजी ऽ उद्या सुट्टी आहे ना ऽ ?' एक चुणचुणीत चिमुरडी हेल काढीत म्हणाली. तिला माझ्या अज्ञानाची कीव वाटत असावी.

'सुटी ? कसली सुटी ? उद्या तर काही सणवार नाही !' मी व मला भेटायला आलेले एक तरुण गृहस्थ, अंगणात खुर्च्या टाकून बसलो होतो. आमचा संवाद ऐकून ते हसत मिस्किलपणे म्हणाले, 'सणच म्हणायचा. सरकारी सण !'

त्यांचे हे शब्द, चिमणसेनेपर्यंत पोचलेही नाहीत, एकदम सारी सेना ओरडली, 'स्वातंत्र्य–दिन !' आणि मग आजीला हा कठिण शब्द समजणार नाही असे वाटूनच की काय, मुलांनी जयघोष केला, 'इंडिपेन्डन्स-डे, इन्डिपेन्डन्स डे !' उद्याच्या सणाचा आनंद मुले आजच लुटत होती. आज होमवर्क नव्हते. पाऊस नसल्याने अंगणात धावाधाव व ओरडा करण्याचे स्वातंत्र्य त्यांना लाभले होते. मुलांना खुश व्हायला आणखी काय पाहिजे ?

स्वतंत्रतादिनाची, 'सरकारी सण' 'सरकारी सत्यनारायण–विनतीर्थप्रसादाचा' इत्यादी विशेषणे मी ऐकली आहेत. तीही एक परीने ठीकच आहेत.

१९४७ मधल्या स्वातंत्र्यदिनाच्या हर्षोल्हासाची लाट त्यानंतर हळूहळू ओसरत गेली. चिनी युद्धानंतर स्वातंत्र्य–दिन हा एक उपचार मात्र उरला. अवघ्या पंधरा वर्षात आपले स्वातंत्र्य–दिनाचे, नव्हे स्वातंत्र्याचे कौतुक संपले होते. आता त्याच जिल्हाधिशाच्या नागरिकांना निमंत्रण–पत्रिका, पोलीस–लाइन्सच्या पटांगणात, समोरच्या बाजूला लावलेला तो किंवा तसाच शामियाना व त्यातल्या खुर्च्या, पटांगणामधल्या चौथऱ्यावर रोवलेला कायमचा ध्वजस्तंभ, त्याच्या माथ्यावरची पुली व तिच्यावरून गेलेली पातळ दोरी, त्या दोरीला खालच्या बाजूला लटकलेला, घडी पडलेला राष्ट्रध्वज –तिरंगा. नेहमीप्रमाणेच बरोबर सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण. त्यापूर्वी शामियाना भरतो. अनाहूत पोरे गोळा होऊन आरडा–ओरडा करीत असतात. जिल्हाधीश नऊला दहा मिनिटे असतानाच जोत्यावर चढतात. पटांगणात उभ्या असलेल्या पोलीस व बिहार लष्करी पोलीस दलांच्या रांगांचे 'सावधान' चे बूट खडखडतात. ती दले आपापल्या जागा घेतात. जिल्हाधिशांच्या हातात एक पोलीसअधिकारी ध्वजाची दोरी देतो. ध्वज वर चढू लागताच त्यात बांधलेल्या फुलांची वृष्टी होते. ध्वज भराभर वर चढतो. डौलाने फडफडू लागतो. पोलीस–दले ध्वजाला मानवंदना देतात. नागरिकही उभे राहतात, कारण पोलीसबँड राष्ट्रगीत वाजवू लागतो. आणखी काही क्षणांत राष्ट्रगीत संपून निमंत्रितांची पावले घराकडे वळतात व दरवर्षी नेमाने येणारा हा सण समाप्त होतो.

माझ्या मन:पटलावरचा हा चित्रपट संपून मावळला आणि दुसरेच एक अनोखे चित्र तेथे दिसू लागले.

—एक छोटीशी बंगली, तिच्या आवारात होळी धडधडून पेटली आहे. आश्विन शुद्धप्रतिपदेच्या, काळ्याशार, पांढरी चमकती खडी काढलेल्या, आकाशावर होळीच्या लाल–पिवळ्या, क्वचित राखी करड्या, लहान मोठ्या ज्वाळा नाचताहेत. मध्येच एखादे दमट लाकूड पेट घेते आणि जळताना कडकड आवाज करते. होळीभोवती नाचणारी लहान–मोठी मुले, जोराने टाळ्या पिटीत हातवारे करीत, अधून-मधून चीत्कारतात 'वा ऽऽऽ' 'वाऽऽ' निदान मला तो शब्द 'वा' असा ऐकू येतो आहे.

होळीभोवती घरातल्या स्त्रियांनी फेर धरला आहे घराची गृहलक्ष्मी आहे, तरुण मुलगी व सून आहेत. मुलगे नाहीत, ते कामावरून परत आलेलेच नाहीत.

मध्येच कोणी तरी एखादी हिरवी फांदी किंवा फोक उचलते व होळीवर फटके मारते. होळीमधून ठिणग्यांचा भुईनळा उडतो. मुलं पुन्हा टाळ्या पिटतात आणि ओरडतात 'ऽऽवा, ऽऽवा !' सर्वांचे गोरे चेहरे होळीच्या उष्णतेमुळे आणि लालसर प्रकाशामुळे लाल दिसताहेत चेहऱ्यावर, उल्हासाचे, निरागस आनंदाचे उधाण रंगले आहे, त्यांच्या पांढऱ्या कपड्यावर देखील लाल प्रकाशाची लाल छटा आली आहे. वातावरण जल्लोषाने भरलेले आहे. व्हरांड्यावर उभे असलेले मी व घरचे यजमान, माझे मित्र भूपालसिंह ह्या जल्लोषाचे मूक साक्षी आहोत.'

लहान–मोठ्या फांद्यांची जळून राख झाली. होळीतला पाला–पाचोळा आधीच जळून हवेवर तरंगत उडून गेला होता.

उल्हासाची लाट ओसरत होती. थोड्या वेळाने स्त्रिया घरात परतल्या. नंतर मुले पांगली व सर्व शांत झाले. आता माझ्या लक्षात आले की, अवताली–भोवताली अशा होळ्या सर्वत्र पेटलेल्या आहेत काही भडकत आहेत, काही विझत आहेत, विझल्या आहेत. माझे भान परतले आहे. मी भूपालसिहांना विचारते आहे 'मुले काय ओरडत होती, भूपाल ?'

भूपालसिंहाची अकरा–बारा वर्षांची चुणचुणीत नात-कविता व्हरांड्यावर येत होती. माझ्या प्रश्नाचे उत्तर तिनेच दिले.

'ये खतडवा जला रहे थे ना हम आजी? उसीको आवाज दे रहे थे सब.' तिचा चेहरा अजूनही लाल आणि उत्तेजित होता.

खतडवा–खतडवा, मनोमन मी तो शब्द जिभेवर घोळवला. त्या ओबड-धोबड रागड्या शब्दाची चव मला समजेना की स्वाद. दहनाची कल्पनाही मला काही सांगेना. अशा कितीक, तुटक्या व टाकाऊ किंवा उपयोगी व टिकाऊ गोष्टी, परिवर्तनाच्या तीरावर प्रत्यही जळताहेत. असेल खतडवाही त्यातलाच एक. माझ्या मनातला गोंधळ ओळखून भूपालसिंह म्हणाले,

'इसे कुमाऊ की लाल–पीली स्वातंत्र्य-पताका समझना. इक तरहसे हमारे शत्रू-सेनानी खतडसिंह की, और उसके प्रयास की चिता भी कह सकती हो!'

कविताचे लक्ष आमच्या बोलण्याकडे नव्हते, ती मधेच म्हणाली, 'और कल ककडीका त्योहार भी तो है न बाबा ?'

कुमाउनी स्वातंत्र्याची कथा म्हणजे किती जुनी! ब्रिटिश अमदानीपूर्वीची! दोन शतकांपेक्षा जास्त जुनी! इतिहासाचा संदर्भ मला लागण्यापूर्वीच भूपालसिंह कवितेला हसत म्हणाले, 'भोजन परोसा है न? कहना भूल गयी?' त्याच्या थट्टेने लाजून कविता घरात पळाली.

रात्री मी खतडवाची कथा ऐकली. त्या दिवशी मी हिमालयाच्या भावर (Foot–hills) मध्ये, हल्द्वानीला भूपालसिंह खाती ह्यांना भेटायला आलेली होते. दिवस सप्टेंबरच्या सतरा–अठरा तारखेचा असावा. ह्या उष्ण ऋतूत ज्याची स्मृती जागृत ठेवण्यासाठी लोकांनी होळ्या पेटवाव्यात इतका महत्त्वाचा माणूस खतडवा होता तरी कोण? ही मला जिज्ञासा होती व मी खतडवाची कथा मन लावून ऐकत होते.

उत्तरप्रदेशाच्या हिमालयीन विभागाचे, कुमाऊं व टेहरी–गढवाल असे दोन भाग पडतात गढवालमध्ये फार प्राचीन काळी, बहुधा दुसऱ्या शतकात, गढवाल–राजपुतांनी राज्यस्थापना केली आणि अलकनंदा-नदीच्या काठी आपली राजधानी श्रीनगर वसवली. कुमाऊ प्रथम त्याच्या राज्यात होता. अकराव्या शतकात कुमाऊनच्या राजपुतांनी आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. ह्या चदाराजांनी, हिमालयाच्या दुर्गम प्रदेशातली, दुर्गम जागा निवडून आपली राजधानी अल्मोडा येथे वसवली. राज्यस्थापना करणे जितके बिकट त्याच्यापेक्षा राज्याचे संरक्षण करणे कित्येक पटींनी बिकट असते, हा अनुभव, मराठ्यांप्रमाणेच चदाराजानाही आला. त्याच्या राज्यावर सतत गढवाली फौजा आक्रमण करीत, लहानमोठ्या चकमकी तर नेहमीच झडत. हा क्रम कित्येक शतके चालत राहिला. कधी कुमाऊं माघार घेई तर कधी गढवाल पराजय होऊन परत जात सतराव्या शतकात बहादूरशहा दिल्लीच्या तख्तावर होता, तेव्हा कुमाऊ व गढवाल दोन्ही राज्ये मोगलांची मांडलिक होती. तथापी त्यांच्या परस्पर लढाया व वैमनस्ये चालूच असत. त्या सुमारास गढवालचा सेनापती खतडसिंग शौर्यासाठी, सेनासचालनासाठी, फौजेच्या वेगवान हालचालीसाठी नावारूपाला आलेला होता. त्याची नजर कुमाऊवर जाणे स्वाभाविकच होते.

मोठ्या फौजेनिशी खतडसिंह कुमाऊंच्या दिशेने चाल करून येत असल्याच्या वार्ता आल्या. कुमाऊचा राजा बाजबहादुरसिंह चदा ह्याला भीतीने त्या थंड प्रदेशातही घाम फुटला! रामगंगानदीच्या काठी असलेल्या, केदारनाथाच्या मंदिरात त्याने पूजा बांधली व त्या जागृत दैवताची करुणा भाकून त्याने नवस केला, 'हे भगवन्, आम्हाला युद्धात यश द्या आमच्या शत्रूचा नायनाट करा! मी तुम्हाला सोन्याचे छत्र चढवीन, पन्नास गावे गूठ (दान) देईन!'

कुमाऊचा सेनापती गेट्टा–विश्त हाही शूर व उत्तम सेनानी होता. आपण युद्ध जिंकूच अशी त्याला खात्री होती. त्याने राजाला तसा निर्वाळा दिलाही. राजाच्या मनाने मात्र कच खाल्ली होती. केदारनाथाला नवस करूनही त्याला यशाचा विश्वास वाटेना. राजाला धीर देत सेनापती गेट्टा–विस्त म्हणाला, 'राजाधिराजांनी चिंता करू नये. आम्ही युद्ध निश्चयाने जिंकू! आपला विजय झाला म्हणजे सेनेची विजयी रणशिंगे निनादतील व ही आनंदाची वार्ता महाराजांना पोचवतील!' सेनापती गेट्टा–विस्त खतडसिंगाला कुमाऊनच्या सीमेवर भावरमध्ये गाठणार होता तिथून सेनेच्या रणशिंगाचा आवाज हिमालयाच्या गगनचुंबी रांगा ओलांडणार कसा आणि विजयाची वार्ता राजधिराजापर्यंत पोचवणार कसा? राजाला प्रश्न पडला

ह्या अडचणीवरही विस्ताने तोडगा काढला. हिमालयामधली खेडी परस्परांना वार्ता पोचवण्यासाठी पिढ्यानपिढ्या वापरीत असत, तीच युक्ती त्याने राजाला सांगितली. तो म्हणाला, 'राजन, आपण चिंता करू नये. आम्ही विजयाचे रणशिंग फुंकू आमच्या रणदुंदुभी, विजयाच्या उन्मादात वाजू लागतील तो आवाज जेथे जेथे पोचेल तेथे प्रजा शेकोट्या पेटवील व आनंद व्यक्त करील. त्या शेकोट्या ही वार्ता जेथपर्यंत नेतील तेथील प्रजाजनही शेकोट्या पेटवतील, त्या पाहून पुढची खेडी त्याचे अनुकरण करतील. सारी प्रजा आपला जयजयकार करील. थोड्याच वेळात विजयाच्या वार्ता, शेकोट्यांचा प्रकाश आणि दुमदुमणारा जयघोष, आपल्याला पोचवतील, राजाधिराजही त्या आनंदोत्सवात भागी होतील. भगवताच्या पूजेची तयारी करवतील!'

राजाला धीर देऊन गेट्टा–विस्ताने आपल्या सेनेसह दक्षिणेला कूच केले व मजल दर–मजल करीत तो भावरमध्ये पोचला. तेथे त्याने खतडसिंगाचे सैन्य अडकवले.

ह्या युद्धाच्या तपशीलवार कहाण्या आता उपलब्ध नाहीत. तथापी दिवसभराच्या युद्धानंतर, संध्याकाळी, सेनापती खतडसिंग मारला गेला. गढवाली फौज त्यानंतर पळून गेली व कुमाउनी सेना विजयी झाली. तो दिवस अश्विन शुद्ध प्रतिपदेचा होता!

थकलेल्या पण विजयाचा उन्माद चढलेल्या कुमाउनी सेनेने आपली रणशिंगे फुंकली, रणभेरीवर त्यांच्या टिपऱ्या पडू

लागल्या. थोड्याच वेळात उत्तरेच्या डोंगरमाथ्यावर व उत्तर उतरणीवर शेकोट्यांचा प्रकाश दिसू लागला हे लोण माथ्यावरच्या शेकोट्यांनी खालच्या दऱ्याखोऱ्यात व पुढच्या रांगेच्या उत्तरउतरणीवर पोचवले. हळूहळू त्या काळ्याभोर रात्री सारा प्रदेश अग्निफुलांनी बहरला, उजळला.

राजा बाजबहादुर डोळ्यात प्राण आणून राजप्रासादाच्या सौधावरून, दक्षिण-क्षितिज न्याहाळीत होता. त्याची चिंता शिखराला पोचली होती. त्याला चैन पडत नव्हते, तो मधूनच येरझारा घाली, पुन्हा दक्षिण क्षितिज न्याहाळी अखेर त्याला क्षितिजावर पहिला प्रकाश दिसला. पहाता-पहाता, दक्षिण क्षितिज ज्योतीच्या प्रकाशाने व लोकांच्या क्षीण आवाजाने भरू लागले राजा आनंदाने गद्गद झाला भक्तिभावाने त्याने केदारनाथाला हात जोडले 'प्रभु, तुझी लीला अगाध आहे' नवस फेडण्यासाठी पहाटेच निघायची सेवकांना आज्ञा झाली.

कुमाऊ अत्यंत गरीब व नापीक प्रदेश. ह्या दिवसात शेतामध्ये काकडीशिवाय कुठलेच पीक तयार नसते, तेव्हा बाजबहादुर चंदाने द्वियेतीचा दिवस 'काकडीचा सण' म्हणून घोषित केला. असा हा अनोखा स्वतंत्र्या व नव्या नवलाईचा काकडीचा सण.

दुसऱ्या दिवशी मी काकडीच्या सणात भाग घेतला. घरच्या गृहिणी क्षमावतींनी घरच्या शेतातून आणलेली काकडी सालासकट चिरून तिच्या गोल चकत्या काढल्या होत्या. एका ताटलीत ठेवलेल्या ह्या चकत्यामधून, प्रत्येक जेवणारा एक किंवा अधिक चकत्या आवडीप्रमाणे घेई व मीठ लावून खाई. मीही त्यातल्या दोन चकत्या घेतल्या.

साध्या-भोळ्या गरीब कुमाउनी लोकांचा हा साधा-भोळा स्वातंत्र्यदिवस ! आज तीन शतके होऊन गेली तरी हा दिवस, शेकोट्या पेटवून व काकडीचा सण करून साजरा होतो आहे. वरील परंपरेचा अन्वयार्थ आता काळाच्या उदरात लुप्त होऊ लागला आहे; पण त्या दिवसामधला आनंद-उत्साह अजून टिकलेला आहे.

सरकारी सणाच्या उल्लेखाने खतडवाची चिंता माझ्या दृष्टीसमोर साकारली. माझे मन म्हणाले भारत आपल्या तिरंगी ध्वजाला आपल्या स्वातंत्र्यपताकेला अशी उत्स्फूर्त मानवंदना पुनः कधी देऊ लागणार ? □

# राज्यसभा आणि विधानपरिषदा पाहिजेतच कशाला ?

गो. वि. वैद्य

**१९८४** च्या प्रारंभी आंध्रप्रदेशात तेथील विधानसभेने आपली विधानपरिषद बरखास्त करण्याचा एक ठराव २१० विरुद्ध फक्त १ एवढ्या प्रचंड मताधिक्याने संमत केला आणि घटनेतील तरतुदीप्रमाणे पुढील कारवाईसाठी तो केन्द्रसरकारकडे पाठविला.

एवढ्या मोठ्या मताधिक्याची पार्श्वभूमी अशी की, १९८२ साल संपत आले तोवरच्या ३८ महिन्यांत आंध्रमध्ये फार मोठी राजकीय अस्थिरता एकसारखी राहिली होती. परिणामी तेवढ्या कालावधीत तेथे ५ मुख्यमंत्री झाले ! आणि अखेर जानेवारी १९८३ मध्ये 'तेलगूदेसम्' ह्या नव्या प्रांतिक राजकीय पक्षाचे संस्थापक श्री. एन. टी. रामाराव निवडून येऊन मुख्यमंत्री झाल्यावर तेथे राजकीय स्थिरता नांदू लागली.

तेलगूदेसम् पक्षाचा तो विजय खरोखरी अभूतपूर्व असाच होता. कारण २९४ जागा असलेल्या तिथल्या विधानसभेसाठी त्या पक्षाचे १९८, म्हणजे दोनतृतीयांशपेक्षा थोडे जास्तच उमेदवार निवडून आलेले होते. त्यामुळे त्या पक्षाला जे संपूर्ण व अबाधित मताधिक्य Absolute majority प्राप्त झाले ते राज्यात राजकीय स्थिरता स्थापन होण्यासाठी निर्णायक ठरले.

त्या मताधिक्याच्या बळावर, विधानपरिषद बरखास्त करण्याचा ठराव विधानसभा सहज समत करू शकली. येथे एक गोष्ट लक्षात घ्यावयाची ती ही की, आंध्रच्या विधानपरिषदेत मात्र स्थिती नेमकी उलटी होती. ९० गणसंख्येच्या त्या परिषदेत इं. काँग्रेसचे ५६ आणि सत्ताधारी तेलगूदेसम्चे केवळ ५ आमदार होते. (आता ६ आहेत) साहजिकच हाती सत्ता असलेल्या तेलगूदेसम् पक्षाने स्वतःच्या बळावर इं. काँग्रेसला विधानपरिषदेतूनही हुसकावून लावण्याचा डाव टाकला; एवढेच नव्हे तर त्या पक्षाचे मताधिक्य असलेले ते सभागृहच बरखास्त करून टाकायचे ठरविले हे उघड आहे. तेव्हा एखाद्या प्रांताने राजकीय डावपेच म्हणून आपले द्वितीय; पण ज्येष्ठ सभागृह नष्ट करून टाकावे काय ? आणि अशी कृती कितपत इष्ट, न्याय्य म्हणता येते असा प्रश्न निर्माण होतो.

आंध्रचे सदर विधेयक दिल्लीस गेल्यावर तेथे अर्थातच त्याला थप्पड बसली आणि ते शीतपेटीत टाकण्यात आले. केन्द्रीय कायदेमंत्री श्री. जगन्नाथ कौशल त्याबद्दल मार्च १९८४ मध्ये राज्यसभेत म्हणाले, '... राज्यातील सत्ताधारी पक्षाची ही भूमिका राजकीय हेतूने घेण्यात आलेली आहे. केन्द्र सरकारला मान्य नसल्यास, तसा ठराव माडणे सरकारवर बंधनकारक नाही ...'

पण बंधनकारक नसल्याचा आधार घेऊन ठरावास परवानगी नाकारणे आणि तो माडण्यास मोकळीक देऊन किमान आवश्यक मताधिक्याच्या अभावी संमत होऊ शकत नाही हे दाखवून देणे ह्या दोन गोष्टी सर्वस्वी भिन्न स्वरूपाच्या होत व यामुळे केन्द्राने जो आरोप आंध्रावर केला तोच केन्द्रावरही करता येण्यास जागा राहाते.

अशा परिस्थितीत ज्या एका (राजकीय नव्हे तर) घटनात्मक समस्येचा विचार करणे प्राप्त ठरते ती म्हणजे भारतातील प्रांतांना

खरोखरीच ह्या द्वितीय सभागृहाची आवश्यकता आहे काय ? ज्येष्ठ मानल्या जाणाऱ्या त्या विधानपरिषदांचा सक्रिय उपयोग कितपत होतो ? आणि काही लहान प्रांत व केन्द्रशासित प्रदेश सोडले तरी भारतात विधानसभा हे एकच सभागृह असलेले काही मोठे प्रांत आहेतच ना ? (उदा. आसाम, गुजरात, केरळ, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान) मग सुव्यवस्थित राज्यकारभारात केवळ विधानपरिषदेचा अभाव त्यांना अडचणीचा वाटत नाही काय ? तथापि दोन्ही सभागृहांपेक्षा एकच असल्यास (म्हणजे विधानसभा), विधेयके समत होण्यास कमी वेळ लागतो व सुटसुटीतपणा येतो ही एक साधी उघड गोष्ट आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात दोन प्रांतांनी आपल्या विधानपरिषदा पद्धतशीर, घटनात्मक कारवाई करवून घेऊन बरखास्त केल्या असल्याचा दाखला उपलब्ध आहे. हे दोन प्रांत म्हणजे प. बंगाल व त्याच्यापाठोपाठ पंजाब. (दोन्ही १९६९ मध्ये) बिहार व उत्तर प्रदेशातही १९७० मध्ये असे प्रयत्न झाले. त्या दोन्ही प्रांतात, अशा ठरावासाठी घटनेप्रमाणे लागणाऱ्या किमान सभासदसंख्येपेक्षा त्या ठरावांना खूपच जास्त आमदारांचे अनुमोदनही मिळालेले होते; पण ते शेवटपर्यंत (दिल्लीला) यशस्वी ठरू शकले नाहीत.

महाराष्ट्रातही १९८३–८४ मध्ये, विधानपरिषद बरखास्त करावी अशा आशयाचे एकूण ५ ठराव निरनिराळ्या विरोधी पक्षांच्या आमदारांनी दाखल केले होते. म्हणजे सध्या एकूण ७ प्रांतात विधानपरिषदांचे अस्तित्व असले तरी त्यांचे भवितव्य मात्र फारसे आशादायक वाटत नाही व त्याला कारणेही बरीच आहेत.

प्रांतांतील ह्या विधानपरिषदांचा, म्हणजे द्वितीय सभागृहाचा जन्म आपल्या स्वातंत्र्याबरोबरच झालेला आहे. सुरुवातीस त्यांना लेजिस्लेटिव्ह कौन्सिल असे म्हणण्यात येत असे. घटनेच्या कलम १६८ प्रमाणे प्रारंभी बिहार, बांबे, (महाराष्ट्र), मद्रास (तामिळनाडू), पंजाब, युनायटेड प्रॉव्हिन्सेस (–यू. पी.– उत्तर प्रदेश), व पश्चिम बंगाल ह्या ६ प्रांतांना 'टू हाउसेस' होती. यात नंतर बदल होत गेले. १९५६ पासून राज्यपुनर्रचनामंडळाच्या शिफारशीप्रमाणे काही नवे प्रांत अस्तित्वात आल्यावर त्यांच्यात ही दुसरी सभागृहे सुरू झाली. (आंध्रप्रदेश व म्हैसूर (कर्नाटक) असे) तर प. बंगाल व पंजाबमध्ये ती नष्ट करण्यात आली. नव्या परिषदा निर्माण करण्याचा व असलेल्या नष्ट करण्याचा अंतिम अधिकार घटनेने कलम १६९ (१) अन्वये लोकसभेला दिलेला आहे.

## द्विदलपद्धती

प्रांतात अशी दोन विधानसभागृहे असणे आणि केन्द्रस्थानीही त्याचप्रमाणे राज्यसभा (पूर्वीचे Council of states) हे स्थूलमानाने ग्रेटब्रिटनच्या द्विदल राज्यपद्धतीचे अनुकरण आहे. घटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर व घटनासमितीचे कार्यालयीन सल्लागार श्री. बी. एन. राव प्रभृतींनी भारतीय घटना तयार करताना जगातल्या अनेक देशांच्या राज्यव्यवस्थापद्धतींचा सूक्ष्म व तौलनिक अभ्यास केला होता आणि अखेर ग्रेटब्रिटनच्या म्हणजे आपल्या राज्यकर्त्यांच्या द्विदल स्वरूपाच्या राज्यपद्धतीला घटनासमितीने मान्यता दिली व सुरुवातीस 'अ' गटातील ६ राज्यांमध्ये विधानपरिषदा सुरू झाल्या. तथापि म. गांधींना ह्या स्वरूपाची द्विदल राज्यपद्धती समत नव्हती; पण ते घटनासमितीचे सभासदही नव्हते, ही गोष्ट ह्या संदर्भात लक्षात घ्यावी

तेव्हापासून विधानपरिषदा असलेल्या राज्यांची कमाल संख्या आजवर ९ राहिलेली आहे. १९६९ पासून तिला उतरती कळा लागली. उत्तरप्रदेशाने तर विधानपरिषद चालू ठेवण्याचा खर्च आपल्याला परवडत नाही असेही एक कारण तिच्या बरखास्तीसाठी दिले होते. तथापि हे कारण इतरही तशा प्रांतांना लागू पडण्यासारखे आहे आता ७ राज्यात विधानपरिषदा अस्तित्वात आहेत. ते म्हणजे आंध्र, बिहार, काश्मीर, कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडू व उ. प्रदेश आणि त्यांच्या आमदारांची संख्या ५३४ भरते. सर्वांत मोठी विधानपरिषद उ. प्रदेशची (१०८) व छोटी काश्मीरची (३६) आहे.

ह्या द्वितीय सभागृहावरील खर्च (व राज्यसभेचाही), त्यांची खरीखुरी सक्रिय उपयुक्तता आणि घटनेनेच त्यांना दिलेले मर्यादित आणि विधानसभा–लोकसभा यांच्या तुलनेने दिलेले कमी अधिकार यांचा विचार आता करू या; पण तत्पूर्वी एका देशाचे उदाहरण ह्या बाबतीत विचारात घेण्यासारखे आहे.

हा देश म्हणजे मॉरिशस (बेट). १९६८ मध्ये स्वतंत्र झालेला. बरीचशी भारतीय लोकसंख्या असलेले एक छोटे मित्रराष्ट्र. मॉरिशसमध्ये एकच कायदेमंडळ असून त्याची सभासदसंख्या ६२ आहे. निवडणुकीत ज्या अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व मिळू शकलेले नसेल त्यांचे जास्तीत जास्त ८ प्रतिनिधी ह्या कायदेमंडळावर नियुक्त करण्याची सुविधा तेथे करण्यात आलेली आहे. तेव्हा पाहिजेत कशाला दोन सभागृहे ? घटनात्मक गरजही वाटत नाही आणि खर्चही टळतो.

भारतीय घटनेनेही अशी सुविधा ठेवलेली आहे. (कलम ८०) (१) त्यानुसार जास्तीत जास्त १२ सभासदांची नियुक्ती राष्ट्रपती राज्यसभेवर करू शकतात. मात्र अशा व्यक्ती साहित्य, विज्ञान, कला, सहकार व समाजसेवा ह्या क्षेत्रात नाणावलेल्या असाव्या लागतात म. म काणे, मामा वरेरकर, शकुंतला परांजपे, आचार्य कालेलकर, नटवर्य पृथ्वीराज ही तशी काही निवडक उदाहरणे. हीच मुभा राज्यपातळीवर विधानपरिषदांसाठी आहे. कलम १७१ अनुसार राज्यपाल आपल्या प्रांतातील विधानपरिषदांवर तशाच नियुक्त्या करू शकतात. ग. दि. मा., डॉ. सरोजिनी बाबर, कवी महानोर ही तशी काही निवडक उदाहरणे.

पण अलीकडे ही सुविधा बरीच स्वस्त व सवंग करण्यात आलेली दिसते आणि सत्ताधारी पक्ष राष्ट्रपती अथवा राज्यपाल यांच्यामार्फत आपणास पाहिजे असेल अशा व्यक्तीची नियुक्ती करून घेतात असेही आढळते. निवडणुकीत पडलेल्या आपल्या पक्षीय धुरिणांची सोय लावणे हा प्रकार तर अनेकदा दिसून आलेला आहे. त्याचप्रमाणे स्वपक्षीय नसले तरी ज्यांच्याकडून आपणास पाहिजे ती कामे करून घेता येतील व आवश्यक त्या प्रसंगी ते नियुक्त सभासद आपल्या पक्षाच्या बाजूने मते देतील एवढे तरी किमान पक्षी पाहिले जाते.

पृष्ठ २९ वर




प्रा.स.शि.भावे

# संज्ञा हरवलेली संज्ञापन यंत्रणा

(२)

'ही कम्युनिकेशन गॅप का?' असा प्रश्न गेल्या वेळी विचारला होता.

एक स्पष्ट करायला पाहिजे. अमेरिका आणि भारत किंवा अमेरिका व इतर देश, एवढ्यांपुरतीच ही गॅप आहे असे नव्हे.

अमेरिकेतल्या अमेरिकेत, अनेक क्षेत्रांत, अनेक पातळ्यांवर ही गॅप पाचर ठोकून आहे.

सुवर्णमंदिराबाबत ज्या मुलाखती चालू होत्या त्यांचेच एक उदाहरण बघा. अर्ध्या तासाच्या दोन मुलाखती. तर मधे दहा-बारा जाहिराती. काही वेळा बोलणाऱ्याचा शब्द अर्धवट तोडून जाहिरात आली तर काही वेळा मुलाखतकारच सांगत होता– 'वुई विल रिटर्न टु द डिस्कशन आफ्टर दीज मेसेजेस.'

मेसेजेस! मेसेजेस कसले, कानठळ्या बसवणाऱ्या धमक्याच त्या.

...यू मस्ट परचेस अवर कार नाऊ! डॉलर्स नाइन नाइन नाइन ऑफ. इयर एंड सेल एंड्स् फ्रायडे. मेक हेस्ट टु अॅव्हॉइड डिस् अपॉइंटमेंट!'

ही जाहिरातीची 'वर्ड–लाइन'! (यापेक्षा 'पत्र, नव्हे मित्र' ही वसंत बापटांची लाइन किती चांगली.) भरीला फिट आल्यासारखे हातवारे, उडचा मारणे आणि धावा धावा फॅशनचे बेबीच्या देठापासून केकाटणे आणि हे विज्ञापन.

मोटारींसाठीच नव्हे, तर सर्व वस्तूंसाठी साधारणपणे असाच आवाज. फर्निचर, क्रोकरी, शीत पेये, 'डिकॅफिनेटेड' कॉफी, 'डी–कॅलरीड' चीज, लॉन मोअर्स, सुतारकामाची किंवा लोखंडी कामाची हत्यारे, बागकामाची अवजारे, शाम्पू, क्रीम्स अशी नाजूक सौंदर्यसाधने, किमती सोफासेट्स, तऱ्हेतऱ्हेचे दिवे, कार्पेट्स, वस्त्रप्रावरणे, स्वयंपाकाची साधने, डबाबंद खाद्य–पेय–चोष्य–लेह्य पदार्थ... किंबहुना उपयोज्य, आनंददायक अशा साऱ्याच वस्तूंच्या विज्ञापनासाठी आवाज सारखाच ठणठणीत आणि उच्चार सारखाच धमकावणीचा.

पहिले दोन दिवस साऱ्या जाहिराती मन लावून ऐकत होतो. नवीनपणाची उत्सुकता होती. तिसऱ्या दिवशी राग येऊ लागला. आपल्यावर आक्रमण होत आहे असे वाटायचे. सातव्या-आठव्या दिवशी कंटाळा आला आणि चौदाव्या–पंधराव्या दिवशी चक्क विसर पडला. उपेक्षाखंड सुरू झाला.

–आणि, मन असे शांत झाल्यावर एकेक प्रश्न विचाराच्या पातळीवर पुढे येऊ लागले!

पहिला प्रश्न हा होता की, या जाहिरातींचे व्यापारी उद्दिष्ट खऱ्या अर्थाने साधते का? प्रेक्षकांना या जाहिराती आवडतात का? दीर्घ काळ आवडत राहतात का? वस्तूचा खप वाढणे हे जे उद्दिष्ट, ते साधते का?

हा विचार करता, एक मान्य करायला हवे की काही वस्तूंचा खप वाढत असतो. अमेरिकेत काय, नि इथे काय? अर्थात्, अमर्याद वाढत्या लोकसंख्येचा घटक इथे आहे आणि तिथे तो तसा नाही! याचा अर्थ लोकांना वस्तूचा उपयोग कळतो–पटतो, म्हणून स्वतःचे पैसे टाकून ते ती वस्तू पुन्हा पुन्हा घेतात. म्हणजे कोणती वस्तू सतत वापरायची हे अनुभवाने ठरते, जाहिरातीने नव्हे.

मग जाहिरात कशाला?

एक तर, आहे तो खप घसरू नये. आपण नंबर एक वस्तू वापरीत आहो असा दिलासा ग्राहकाला सतत मिळत राहिला पाहिजे. दुसरे म्हणजे, दुसऱ्याची वस्तू वापरीत असणाऱ्यांनी ती वस्तू सोडावी आणि आपली वस्तूच पत्करावी. यासाठी तुलनात्मक विचार करून आपली वस्तू अधिक चांगली आहे हे लोकांना सतत पटवणे आवश्यक असते.

या गरजा मान्य केल्या तरी एक प्रश्न उरतोच. हे सारे दणदणीत पद्धतीने का व्हावे? आर्जवी, हळुवार पद्धतीने का होऊ नये?

याचे एक मानसिक कारण संभवते. सामूहिक मनाला आर्जवीपणा हा अनेक वेळा दुबळेपणा वाटतो, तर ठणठणीतपणा हा बळकटपणा वाटू शकतो. अमेरिकन सामूहिक मन याच पद्धतीने विचार करते असे ठाम विधान मी करू शकणार नाही. कारण माझा तेवढा व्यापक अनुभव नाही. तथापि, एवढे खरे की, अमेरिकन संज्ञापन–यंत्रणांच्या व्यवस्थेत, आशयात, आविष्कारात बहुतांशी, 'ठणठणीतपणा = बळकटपणा' हे सूत्र स्वीकारलेले दिसते.

स्वतःच्याच नव्हे तर इतरांच्या वागणुकीचा अर्थ लावण्यामागे देखील हीच अमेरिकन पद्धती जाणवते.

...इराकच्या सीमेवर इराणने सैन्याची मोठी जमवाजमव सुरू केली होती. तर इराकने होरमुझ सामुद्रधुनीत शत्रुराष्ट्रांच्या जहाजांचा प्रवेश नियंत्रित केला होता. प्रत्युत्तर म्हणून इराकने तसेच प्रतिनिर्बंध घातले होते. त्यावर खुल्लंखुल्ला प्रश्नोत्तरात्मक चर्चा.

चॅनेल पाच. 'नाइटलाइन.' रात्री साडे-दहा ते अकरा. अमेरिकेतील पहिल्या वीस महत्त्वाच्या व्यक्तींत यदा स्थान मिळविलेला मुलाखतकार टेड कोप्पेल. मुलाखतीसाठी आलेले, नव्हे, टेडला एकमेकाना आणि प्रेक्षकांना—दिसणारे, इराकचे अमेरिकेतील व इराणचे यूनोतील राजदूत.

'इराक हे युद्ध किती काळ चालू ठेवणार आहे?' टेड कोप्पेलचा प्रश्न. इराकसाठी.

'हे युद्ध इराणने आमच्यावर लादले आहे. आता आम्ही शेवटपर्यंत लढणार.'—इराकचे राजदूत. हसतमुख. ठाम.

'इराणचे राजदूत काय म्हणतात?'

'आमचे सन्माननीय शत्रू जे म्हणतात तेच. इराकने आमच्यावर हल्ला केला आहे. आम्ही अखेरपर्यंत विजय मिळवण्यासाठी लढू.'— इराकचे राजदूत. हसत. ठाम. वैभवशाली खर्जात. दिमाखात.

'पण यामुळे उभय राष्ट्रांची अपरिमित हानी होईल, त्याचं काय?'— टेड.

'त्याला इलाज नाही. आत्मसमानाची ही किमान किंमत आहे ती आनंदानं द्यायलाच हवी.'— उभय राजदूत तसेच ठाम.

'या संघर्षाची झळ इतरांनाही लागू शकेल. नव्हे, लागेलच त्याची आपणाला काळजी वाटत नाही काय?'

'काळजी जरूर वाटते; पण प्राप्त परिस्थितीत त्याला इलाज नाही आम्ही दिलगीर आहोत; पण मजबूर आहोत.'—दोघा राजदूतांचा पुन्हा तोच ठामपणा. त्यात अदब होती. उच्चारात नजाकत होती. चेहऱ्यावर स्मित; पण शब्द मोजके, निःसंदिग्ध आणि ठाम होते.

टेड कोप्पेलला हा ठामपणा आवडत होता. त्याने त्या ठामपणासाठी उभय राजदूतांचे अभिनंदन केले आणि शेवटचा प्रश्न विचारला.

'माफ करा. जरा जास्त मोकळेपणाने स्पष्ट विचारतो. विचारू ना?' हा नम्रपणा उभय राजदूतांनी स्वतःच्या ठामपणातून मिळवला होता. तो सौजन्याचा अथवा उपकाराचा नव्हता.

'अवश्य विचारा!' उभय राजदूत. आत्मविश्वासी स्मिताने.

'आपली दोन्ही राष्ट्रे एकाच धर्माची. तरी तुम्ही शत्रू कसे?'

'प्रश्न उत्तम आहे. आम्ही एका धर्माचे. म्हणून आम्ही भाऊ जरूर आहो. इतर धर्मांविरुद्ध आम्ही एक आहोत; पण आज आम्ही खुले शत्रू आहोत. भांडण संपल्यावर कदाचित पुन्हा खुले मित्र होऊ.'— उभय राजदूत. शब्द थोडे वेगळे. आशय हाच.

'आपल्या ठाम, खुल्या मोकळेपणाने आपण मला आणि नाइटलाइनच्या प्रेक्षकांना जिंकले आहे. धन्यवाद!'— अशी मुलाखत संपली.

... असा खुला ठामपणा अमेरिकन मनाला अधिक आवडतो. 'बघू', 'पाहू', 'बघितलं पाहिजे', 'हूऽऽऽ', 'तसं पाहिलं तर', 'परहॅप्स', 'ऑलमोस्ट', 'पॉसिबली', 'मे बी', 'वेल, आय ॲम नॉट शुअर, बट', 'वुई कॅन नॉट सी सेड टु बी एक्झॅक्टली इनिमिकल टु ईच अदर, हाउएव्हर'— असे शब्द व वाक्यप्रयोग त्यांना एक तर दुबळे, नाही तर फसवे वाटतात. यामुळेच त्यांना अशी भाषा पुरेशी विश्वसनीय वाटत नाही.

एका चिनी विचारवंताच्या अशा वळणदारपणाने विलक्षण अस्वस्थ झालेला मुलाखतकार मला ठळकपणाने आठवतो.

अध्यक्ष रेगन यानी, चीनमध्ये दिलेली मुलाखत चिनी दूरदर्शनने 'संपादित' (सेन्सॉर) केली होती. त्या संबंधात हा घटना—तज्ज्ञ मुलाखत देत होता. मूळचा हा चिनी, पण आता अमेरिकन नागरिक झाला होता. म्हणजे, चिनी सरकारचे त्याला तसे भय नव्हते. तो म्हणाला—

'सेन्सॉरशिपबद्दल माझे मत मी जाहीरपणाने आणि लेखी अनेकदा मांडले आहे. ते सेन्सॉरशिपविरोधी आहे. (मुलाखतकाराचा चेहरा उजळू लागला. चिनी तज्ज्ञाकडून सध्याच्या चिनी सरकारचे खडखडीत मूल्यमापन मिळणार, असे त्याला वाटले असावे.) तथापि, रेगन यांच्या भाषणाबाबतीत नक्की काय झाले ते मला माहीत नाही. तेव्हा, मी मत कसे देणार?'

'पण खुद्द चिनी दूरदर्शनने मान्य केले आहे की, त्यांनी भाषणाची संपादित आवृत्ती प्रसारित केली.'— मुलाखतकाराच्या आवाजात 'गवसले ते हरवले का' जातीचा वैताग.

'संपादन आणि सेन्सॉर यात मूलभूत, तात्त्विक फरक आहे. शिवाय, संपादन अनेक कारणांनी, अनेक भूमिकांतून आणि भिन्नभिन्न परिस्थितीत करावे लागते. काही प्रसंगी संपादनाने मूळचा दर्जा सुधारतो देखील.'... चिनी तज्ज्ञ तत्त्वज्ञान सांगू लागला. डोळघाच्या चिरा. चेहऱ्यावर मिस्किलपणाचा भास असणारे पण तसे सिद्ध करता न येणारे स्मित. भाषा अचूक पण आवेशरहित. मुद्दा तर्कशुद्ध खोडता येऊ नये असा.

मुलाखतकार वैतागला. सराईतपणे धन्यवाद देऊन त्याने मुलाखत संपवली.

असा वळणदारपणा अमेरिकनांना रुचत नाही, पचत नाही. त्याने ते लवकर वैतागतात.

□

एका बाजूने, चांगल्या अर्थाने पाहिले तर हा निरागस भोळेपणा आहे.

दुसऱ्या बाजूने पाहिले तर हा निरागस भोळेपणा परवडावा इतके हे राष्ट्र संपन्न आहे. असा निरागस भोळेपणा गरिबीत परवडत नाही. गरिबी गरजेने गांजलेली असते.

तिसऱ्या बाजूने बघायचे तर सर्वव्यापी संज्ञापनयंत्रणा, या मूळ स्वभावाचा आधार घेऊन, अगदी अपरिहार्यपणाने सर्वभक्षक बनत चाललेल्या आहेत स्वतःचे मत सरळपणे, निर्भयपणे सांगणे याचे रूपांतर आक्रमकतेत होत आहे. ठामपणाचे रूपांतर ठणठणीत आणि ठणकावून सांगणाऱ्या आवाजात होत आहे एका टोकाला हा अतिरेक झाल्यावर दुसऱ्या टोकाला अतिरेक येणे क्रम प्राप्त. अपेक्षाभंग झाल्यावर अधिक वैतागणे, चिडणे, अधिक भावनाग्रस्त होणे हे येतेच

केंटकी डर्बी रेसची गमत आठवते

शर्यतीच्या आधी, एका विशिष्ट घोड्याचो भलावण करण्यात वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन यांच्यात जणू शर्यत लागली होती. त्या अश्वपुत्राची (कोल्टची) कुलीनता जोरजोराने सांगितली जात होती. त्याच्या पित्याने हीच शर्यत पूर्वी दोनदा जिंकली होती. त्याच्या मातेने इतर अनेक विक्रम केले होते, त्याच्या या 'पेडिग्री' समवेत त्याच्या प्रगतीचे आलेख, संख्याशास्त्राच्या विश्लेषणासह सादर केले जात होते.

होता होता शर्यतीचा बार उडाला. त्या

दिवशी सकाळच्या वृत्तपत्रांत प्रत्येकी चार ते सहा पाने या रेससाठी होती. शर्यतसमीक्षकाच्या मुलाखती होत्या. देशातल्या प्रमुख समीक्षकांनी आपले क्रमांक दिले होते. त्यात तेरापैकी अकरा जणानी हाच अश्वपुत्र पहिला येणार असा निर्वाळा दिला होता.

दुपारी चार वाजले. दूरदर्शन सारी रेस दाखवणार होते. घोडे, स्वार, शिक्षक, मालक, समीक्षक, जुने अनुभवी रेस खेळणारे—अशा सान्याच्या मुलाखती झाल्या (घोडयाने क्लोजअपमध्ये येऊन डौलदार दर्शन देणे, क्वचित खिकाळणे म्हणजे मुलाखतच ). मग रेसमैदानातली अफाट गर्दी. बेफाट, बेफाम झाली. प्रत्येकाला पक्की खात्री दिसत होती. 'अश्वपुत्र 'च जिंकणार ! जुगारी खात्री.

रेस सुरू झाली. सव्वा—दीड मिनिटांत संपली. तात्पुररे निकाल जाहीर झाले आणि काय ? जिकडेतिकडे उच्छ्वास, निःश्वास, हळहळ, डोळे टिपणे, चीत्कार, रडणेदेखील—याची एकच गर्दी उडाली. सारे चेहरे पाढरे-फटक पडले. कारण सान्यानी अश्वपुत्रावर पैसे लावले आणि अश्वपुत्र चक्क सहावा आला होता !

झाले. पुन्हा मुलाखती. भावनोद्रेक. दुसन्या दिवशी वृत्तपत्रात 'चकित झाल्या '-च्या बातम्या, टिप्पण्या, मते—मतातरे. सान्या संज्ञापनयत्रणेला नवे काम, नवी संधी, नवे आव्हान, नवा ठामपणा. निराशेच्या भावनेत ठामपणा आशेच्या अपेक्षेनही ठामपणा. त्या आठवडयाच्या रविवार—आवृत्तीत भाष्यलेख आले. एक लेख खूप बोलका होता. लेखकाच्या (ठाम) मताने हे सारेच बनावट होते. अश्वपुत्र ठरवून हरला होता. अदाजात जो पाचवा होता तो घोडा पहिला आला होता. त्याचेवर पैसे लावणाराना मोठाच गल्ला मिळाला होता आता म्हणे येत्या रेसमध्ये अश्वपुत्रावर थोडेच लोक पैसे लावतील. मग मात्र अश्वपुत्र जिंकेल. थोडया रेसशौकीनाना दरवेळी मोठा पैसा मिळावा यासाठी हे षड्यत्र होते.

ठामपणाच्या वेडातून हे षड्यंत्र चालू राहत होते. हे ठामपणाचे वेड चालू राहील, कायम राहील, वाढते राहील या दिशेने येथील सारी संज्ञापनयंत्रणा झुकली आहे, हे वाचताना, बघताना ध्यानात येत होते.

औद्योगिकीकरण, शहरीकरण, अमर्याद खुली, स्पर्धात्मक अर्थव्यवस्था—यातून, असुरक्षिततेची भावना, जुगारी वृत्ती, व्यक्तिवैशिष्टयाचा ऱ्हास हे सारे तयार होते हे माहीत आहे. भारतातील शहरात हे अनुभवाला येत आहेच. अमेरिकेतही हे सारे आहे शिवाय, अमेरिकेची समृद्धी आणि मूळची निरागस सरळ ठामपणाची आवड यांची त्यात भर पडली आहे. याचे भडक आणि विदारक रसायन जास्तीत जास्त दिसते ते अमेरिकेतील आजच्या संज्ञापनयंत्रणेत. या यंत्रणेतून खरे सज्ञापन गळून पडते आहे. गाळातून स्वच्छ पाणी गळून जावे तसे.

¤

हे एक कोडेच वाटते. खाजगी जीवनात अमेरिकन लोक आपले वैशिष्टय, आपला खाजगीपणा कटाक्षाने, आग्रहाने, क्वचित हट्टाने, विक्षिप्तपणाचा आक्षेप हसत पत्करून, पण जपत असतात. सार्वजनिक सज्ञापनयंत्रणातील तोचतोपणा मात्र ते निमूटपणाने काही प्रमाणात उत्साहाने देखील स्वीकारताना दिसतात. ध्वनिप्रदूषणाचेच बघा. ध्वनिप्रदूषण टळावे म्हणून हे जागरूक व प्रयत्नशील असतात. माझ्या तीन महिन्यांच्या वास्तव्यात वाहनाचे शिंग वाजलेले मी एकदाही ऐकले नाही; पण हेच लोक दूरदर्शनवरील ध्वनिप्रदूषण बिनतक्रार पत्करतात. जरा खोल पाहिले की, हे कोडे काही प्रमाणात सुटते. तो विचार आतापर्यंत केला. त्यात असे दिसले की, निसर्गदत्त स्वभावाचा सहेतुक बाजारी आविष्कार व उपयोग झाल्याने ही आपत्ती ओढवली आहे.

या संज्ञापनयंत्रणातून सध्या फक्त एकतर्फी व्यवहार होत आहे. भाषणे, निवेदने, प्रकटने, जाहिराती—सारे एकतर्फी. लोकानी फक्त ते ऐकायचे आणि बघायचे. सवाद आणि त्याची परस्परता या व्यवहारात अगदी कमी झाली आहे. भाषेचा मूळ भाषापणाच या व्यवहारात हरवला आहे. देवाण—घेवाण सपली आहे.

भावनाना हलकेच आवाहन करणे, कुतूहल जागे करणे, संवादासाठी व्यक्तित्वाला उन्मुख करणे, सर्व भाषिकाना एकत्र येऊन वादसंवादातून आपोआप तत्त्वबोध होणे ही भाषेची प्रक्रिया जवळजवळ सपली आहे.

आजची या यंत्रणांची भाषा देखील एक यंत्र झाली आहे. तेच भाषाबंध, तोच सतत वाढता कानठळघा बसविणारा आवाज, तेच दटावणे किंवा उत्तेजित करणे. थोडक्यात म्हणजे लोकाच्या कानांवर आणि डोळ्यांवर एकच गोष्ट सारखी ठोकत राहणे. लोकाची स्वाभाविक कुतूहलवृत्ती, जिज्ञासा याना झोपवून ठेवणे त्यासाठी सातत्याने तोच तोपणा वापरणे. सातत्य म्हणजे तरी किती ? तर दिवसाचे चोवीस तास. इतका सगळा वेळ दूरदर्शन आवश्यक असते का ? लोक इतका वेळ टीव्ही बघतात का ? पण हा विचार लोकहिताचा झाला. असा विचार व्यापारी यत्रणात बसत नाही. यंत्रणेच्या दृष्टीत लोक नसतात, गिऱ्हाइके असतात. चोवीस तासातील कोणत्याही वेळी कोणी ना कोणी गिऱ्हाईक जागे असतेच. त्या वेळी त्याला कार्यक्रम हवा. 'डे ॲण्ड नाइट' औषधाची दुकाने असतात, लॉन्ड्रया असतात, स्टोअर्स असतात, सिनेमाघरे, मोठमोठया प्रकाशित जाहिराती असतात, तसाच टीव्ही ! या सान्या एकतर्फी गदारोळात दुसन्याचे म्हणणे शांतपणाने ऐकणे, त्यावर शातपणाने विचार करणे, आपल्याइतकेच त्याचेही विचार महत्त्वाचे आहेत हे ओळखणे, त्यातून जरूर तर स्वतः बदलणे—हे सारे मूक झाले आहे, लोप पावण्याच्या बेतात आहे.

¤

खरे म्हणजे अमेरिकेसारख्या देशात असे होऊ नये. येथे सुबत्ता आहे, सुविधांची रेलचेल आहे. तत्रज्ञानाची कमाल आहे. व्यक्तित्वाचे स्वातंत्र्य हे मूल्य आहे. विक्षिप्तपणालाही वाव आहे. येथे असे होऊ नये. नवनिर्मितीचे धुमारे अशा अनुकूल वातावरणात खरे तर हजारो—लाखो वाटानी फुलावे; पण तसे होताना दिसत नाही.

डिपार्टमेंटल स्टोअर्स घ्या. सर्वत्र एकाच प्रकारचे, मॅक्डॉनल्ड हॅमबर्गर घ्या. सर्वत्र तेच. तसेच. ते मिळणारी दुकाने देशभर तीच तशीच बँकांसारख्या सार्वजनिक इमारतींवरील प्रकाशित अक्षरे, शब्द, वेळाचे आणि उष्णतामानाचे आकडे घ्या. तेच आणि तसेच. दुकानांवरील नावाच्या पाटया. एकासारख्या एक !

याचा मग कटाळा येतो. त्यानाही येतो. मग कोणी तरी एखादी नवी लाट काढतो. ही लाट जितकी नवी, जितकी चागली असेल

तितक्या जलद सर्वदूर पसरते, सार्वत्रिक होते, थोड्याच काळात जुनी होते. नव्या लाटेची जुनी चाकोरी होते.

अमेरिकेतील सुबत्तेचा आणि अतिविकसित तांत्रिक प्रगतीचा हा अपरिहार्य परिणाम आहे. यू हॅव टु बी बिग इन ऑर्डर टु सक्सीड यू हॅव टु बी बिग इफ यू विश टु सर्व्हाइव...आणि लहानांना गिळल्याशिवाय मोठे हे मोठे होऊच शकत नाहीत, मोठे राहूच शकत नाहीत, मोठेपण टिकवू शकत नाहीत.

मोठेपणासाठी सारखेपणा. सारखेपणासाठी समान नियंत्रण. समान नियंत्रणासाठी शिस्त. शिस्तीसाठी एकानुवर्तित्व. अशी ही अपरिहार्य साखळी झाली आहे. या साखळीत तुम्हाला–मला–आपणा सर्वांना नेमलेल्या जागी बसावे–वागावे लागते. जे काही करायचे ते साखळीच्या मर्यादेत, साखळीच्या आवश्यकतेप्रमाणे करावे लागते.

आजच्या अमेरिकन संज्ञापनयंत्रणा अशा आवश्यकतेने आणि अशा गतीने, मोठ्या–अधिक मोठ्या झाल्या आहेत, अधिकाधिक मोठ्या होत आहेत. या मोठेपणात संज्ञापनाचा मूळ हेतू जो दुतर्फी संवाद, तोच हरवून गेला आहे त्याची व्यक्तिविशिष्ट संज्ञा हरवली आहे. प्रतिभा केविलवाणी झाली आहे.

यात उरतो तो एकतर्फी मारा. तो अधिकाधिक आकर्षक कसा करता येईल याचा प्रयत्न सतत चालू असतो. साधी बातमी. तीही अधिकाधिक ताजी देण्याचा अट्टाहास असतो. साधी 'न्यूज' चालत नाही ती 'आय विटनेस न्यूज' असावी लागते. 'आयविटनेस न्यूज' देखील 'अपडेट' असावी लागते. इमारत कोसळली की लगेच वार्ताहर तिथे समोर कॅमेरा. हातात माईक. आजूबाजूला एक–दोन कॅमेरे. वार्ताहराचे वर्णन चालू असते. इमारतीखाली सापडलेल्यांना, बाहेर काढताना कॅमेरा सारे दाखवीत असतो. मधेच इमारतीचा आणखी एखादा भाग कोसळतो. कॅमेरा हे दृश्य प्रत्यक्ष कोसळताना दाखवतो. वर्णन करून सांगताना वार्ताहराच्या चेहऱ्यावर विजयाचे समाधानी स्मित असते. आवाजात आत्मविश्वासाची गुरकावणी असते. 'आयविटनेस न्यूज अपडेट' ने एक स्पर्धा जिंकलेली असते.

स्पर्धा. इतराशी स्पर्धा. स्वत:शीही. तरच व्यवसायात टिकणार. अन्यथा अगदी थडपणाने बाहेर फेकले जाल.

किती तरी अमेरिकनांना या संज्ञाशून्य यंत्रणांचा उबग येऊ लागला आहे. हिप्पी वृत्ती ही केवळ सुरुवात होती. आज अधिक लोक आतून या साऱ्या यांत्रिक सारखेपणाला कटाळून चालले आहेत. टी. व्ही. फक्त बातम्यांचे वेळी चालू करणे किंवा चौसष्ट पानी वृत्तपत्राची जाड घडी या बाजूची त्या बाजूला जशीच्या तशी ठेवून देणे, आपल्या व्हीसीआरवर ठराविक कार्यक्रम त्या त्या वेळी मुद्रित करून घेणे आणि सवडीच्या वेळी ते पाहणे – असे काही खाजगी उपाय लोक करू लागले आहेत... काही तर, एकांतात बसून जाड जाड पुस्तके वाचण्यात गर्क राहू लागले आहेत... काही लोक छोट्या सांस्कृतिक–धार्मिक संस्था सुरू करीत आहेत तर काही झेन बुद्धिस्ट केंद्रात सामील होऊ लागले आहेत.

या साऱ्याचा काही ठळक परिणाम संज्ञापनयंत्रणांवर झाला आहे असे आज तरी आढळत नाही. त्यांची अपरिहार्य सर्वभक्षकता कायम चालू आहे. एक भारतीय म्हणून काळजीची वाटणारी गोष्ट म्हणजे या यंत्रणा भारताला तशा अनुकूल नाहीत. भारतासंबंधी या यंत्रणांना विधायक जिज्ञासा नाही सेन्सेशनल काही असेल तरच त्याला स्थान मिळते. भिवंडीसारख्या दंगली, भूकंबळी, भिक्षेकरी, भागलपूरसारखे अत्याचार – अशा तपशिलांनाच ठळक स्थान असते. बरे, या घटना खोट्या नसतात तशी तक्रार करता येत नाही. याच घटना का निवडता, अशीही तक्रार करता येत नाही. 'आम्ही असत्य दाखवीत नाही. जे जे आहे त्यातले काय निवडायचे ते आम्ही ठरवू.' असे उत्तर येईल अशा उत्तराने आपली कुचंबणा होते खरी; पण इलाजही नसतो इलाज एकच. भिक्षेकरी दिसायचे नसेल, म्हणूनच घ्यायचे नसेल तर भिक्षेकरी नसावे हेच खरे आणि तेच बरे

अलीकडे आणखी एका छटेची भर या दृष्टीत पडली आहे. भारतातील ८३ टक्के हिंदूंची भीती भारतातील अल्पसंख्याकांना वाटते या 'वस्तुस्थिती'वर नेहमी कमी–अधिक भर देण्यात येतो इंदिरा काँग्रेस ही 'हिंदू डॉमिनेटेड' आहे असे वर्णन केले जाते. हे वर्णन वाचून स्वत: इंदिराजींना काय वाटेल कोण जाणे.

खरे म्हणजे या संज्ञापनयंत्रणा खाजगी आहेत राजकीय, सामाजिक बाबतीत त्यांची धोरणे परस्परविरोधी आहेत; पण चीन, रशिया, भारत यासारखे देश व लोक यांचे संबंधाने त्यांच्यात आश्चर्यकारक एकवाक्यता आहे. रशियाबद्दल तुच्छतायुक्त भीती आहे. चीनबद्दल काहीसा आदर आणि गूढ जिज्ञासा आहे. भारताविषयी प्रतिरोधी उपेक्षा आहे

अर्थात, ही संज्ञापनयंत्रणांची दृष्टी झाली. सामान्य अमेरिकनाची दृष्टी कशी आहे ? □


जगप्रसिद्ध 'चिपको' आंदोलनाचा अभ्यास करण्यासाठी
पन्नास साथीदारांना बरोबर घेऊन केलेली भटकंती :
पर्यावरण या विषयावरचे मराठीतले पहिलेच पुस्तक !

**प्रेरणा चिपकोची : भटकंती गढवालची**

**लेखक : जगदीश गोडबोले**

**प्रस्तावना : डॉ. माधव गाडगीळ**

• किंमत : २८ रुपये, ३० सप्टेंबरपर्यंत सवलतीची किंमत : २२ रुपये

**वार्ता प्रकाशन, २/२४ लोकमान्यनगर, पुणे–४११ ०३०**

पुस्तके

# स्वभावाला औषध नाही, दैवापुढे गती नाही

—म. म. केळकर

' वाङ्मय–शोभा ' मासिकाचे संपादक श्री. म. म. केळकर यांचे आत्मचरित्र या महिन्यात ( ऑगस्ट ८४ ) पुण्याच्या कॉन्टिनेन्टल प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिद्ध होत आहे. आत्मचरित्राचे नाव आहे– ' स्वभावाला औषध नाही आणि दैवापुढे गती नाही. ' या आगामी आत्मचरित्रातील काही भाग.

कै. बापूसाहेब माटे यानी वाङ्मय–शोभेत प्रारंभीच्या काळात खूप लेखन केले. वाङ्मय-शोभेला प्रारंभापासून जी प्रतिष्ठा मिळाली त्यातला काही वाटा द. के. केळकर व ना. सी. फडके यांच्याबरोबर माटयांच्याकडेही जातो. किती तरी सुंदर लेख व गोष्टी त्यांनी वाङ्मय-शोभेसाठी लिहिल्या. उलट त्याना मनसोक्त ललित मजकूर लिहायला वाङ्मय-शोभेमुळेच वाव मिळाला ते आमच्या घराशेजारीच राहात असल्यामुळे त्यांच्याकडे जाऊन गप्पा मारणे आणि वाङ्मयीन चर्चा करणे नेहमीच चालायचे आपण निबंध-लेखक आहोत, ग्रथलेखक आहोत; पण आपल्याला कथा लिहिता येत नाहीत अशी त्याना मोठी रुखरुख होती. मी आणि मोडक, ( वि. श्री. ) त्यांना म्हणायचे, ' बापूसाहेब, तुम्ही मनात आणले तर तुम्हाला कथा नक्की लिहिता येईल. ' आणि अशातच त्यानी ' हास्याचा शोध ' हा लेख ( कथा ) लिहिला. मी ती कथा डिसेंबर १९३९ च्या अंकात प्रसिद्ध केली आहे. मी जेव्हा त्याना म्हटले, ' बापूसाहेब, अहो तुम्ही वाटल्यास याला लघुनिबंध म्हणा, पण मला वाटते ही कथाच आहे लेख तर नाहीच नाही. ' आणि माझा तर्क अगदी बरोबर ठरला. त्यानंतर काही दिवसानी अप्पासाहेब फडके आमच्याकडे चहाला आले होते तेव्हा या गोष्टीसबंधी बोलताना म्हणाले, ' Mate has turned red ! ' त्यांना ती गोष्ट खूप आवडली होती.

अशा या बापूसाहेब माटयाचा वाङ्मय-शोभेशी लेखक म्हणून असलेला संबंध पैशामुळे तुटावा याचे मला खूप दुःख झाले. तसाच रागही आला. त्याचे असे झाले– ' हंस ' व ' वसंत ' ही मासिके बाजारात आपला लौकिक वाढवीत होती. अशा वेळी आपणही उठाव करावा या दृष्टीने मी अधिक पैसे देऊ करून ( एक रुपया किंमत केल्यामुळे व तरीही खप खूप वाढू लागल्यामुळे मला थोडी ऐपत आली होती. ) जुने लेखक जोडायचा पुन्हा प्रयत्न केला. बापूसाहेब माटयाना वाङ्मय-शोभेसाठी मी लेख मागितला व २० रुपये मोबदला देऊ केला. त्यावर त्यांनी मला पुढील आशयाचे पत्र लिहिले, ' ...... मासिकाचा संपादक..... मला २५ रु. मोबदला देतो आणि तुम्ही नेहमी कमी मोबदल्यात मजकूर मागता. तुम्ही तात्यासाहेबाचे पुतणे असल्यामुळे तुम्हाला अन्य काही मदत हवी असल्यास मी करीन; पण कमी मोबदल्यात मजकूर देता येणार नाही. ' मी त्यांना उलट कळविले, ' आपण माझी कीव करण्याचे काही कारण नाही. माझी काळजी घ्यायला माझे भाऊ मातब्बर आहेत मोबदला परवडत नाही असे मी म्हणतो तेव्हा वाङ्मय-शोभेला तो परवडत नाही असा त्याचा अर्थ असतो. आपले हे पत्रच आपला मजकूर म्हणून वाङ्मय–शोभेत मी छापणार आहे आणि माझे उत्तरही छापणार आहे. ' लगेच त्यांचे दिलगिरी व्यक्त करणारे आणि माझी समजूत घालणारे पत्र आले.

आपण आपल्या स्वभावावरून जगाची परीक्षा करतो ही फार मोठी चूक आहे आणि त्याहून मोठी चूक म्हणजे व्यवहारात कसे वागावे यासबंधीच्या आपल्या कल्पना लोकांवर लादणे ही होय. गेले काही दिवस मी मला आलेली जुनी पत्रे वाचून पाहात आहे. त्यातली आज फारसे महत्त्व नसलेली निकालात काढूनसुद्धा मजजवळ खूप पत्रे शिल्लक आहेत. ती वाचताना जुन्या काळात वावरल्याचे समाधान तर होतेच; पण त्यातली काही आपण त्या वेळी असे वागायला नको होते असे आवर्जून सांगतात; पण तरीसुद्धा असे वाटते की वयाच्या चाळिशीलासुद्धा जी परिपक्वता अनेक कटु अनुभवांनंतर आपल्या अंगी मुरायला हवी होती ती दुर्दैवाने मुरली नव्हती. नाही तर बापूसाहेब माटयांच्यासारखा सव्यसाची लेखक मी हातचा गमावला नसता.

आणखी एका महान लेखकाचा वाङ्मय–शोभेशी संबंध आला. त्यांची माझी पहिली ओळख १९२७ साली श्रीपाद कृष्ण कोल्हटकराच्याबरोबर ते पुण्याच्या घरी उतरले होते तेव्हा झाली होती त्या वेळी पुण्याला भरणाऱ्या साहित्यसमेलनाचे कोल्हटकर अध्यक्ष ठरले होते आणि खाडेकर त्याचे शिष्य किंवा सचिव या नात्याने त्याचे भाषण लिहून घेण्याचे काम करीत होते. त्या ओळखीवर मी खाडेकराकडे लघुनिबंध मागितले आणि त्यांनीही ते पाच रुपयाप्रमाणे दिले. ( त्या काळी बोकिलांच्या कथाही मला पाच रुपये दराने मिळत असत. आज हा आकडा हास्यास्पद वाटतो; पण त्या काळी पायरीचे आंबे चौदा आणे, हापूस एक रुपया आणि दोन आणे डझनाने मिळत होता. आंबेमोहोर चार आणे शेर होता. साखर चार आणे शेर होती हे लक्षात घेतले म्हणजे हे पैसे अगदीच थोडे नव्हते हे लक्षात येईल. ) पुढे खाडेकराशी व्यवहार कमी होत गेला. नवीन मासिके, दिवाळी अंक निघू लागले. काही काळानंतर खाडेकरांच्या एका मध्यस्थाने मला सांगितले, ' भाऊसाहेबांचा लघुनिबंध हवा असेल तर पचवीस रुपये पडतील व कथा हवी असेल तर पाऊणशे रुपये पडतील ' मी हिम्मत करून पाऊणशे रुपयाना कथा विकत घेतली. ती कथा वाङ्मय–शोभेच्या मे १९४९ च्या अंकात प्रसिद्ध झाली आहे. या कथेत काळा

पैसा जमविणाऱ्या रेशनिंग इन्स्पेक्टरची बायको अखेरीस वैतागून, 'अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे' हे गाणे म्हणत घर सोडून जाते असे दाखवले आहे. त्यानंतर मात्र खाडेकरांची कथा वाङ्मय-शोभेत आलेली नाही.

आणखी एक नाव घेण्याजोगे लेखक म्हणजे पु भा भावे. भाव्यांचा व माझा घनिष्ट स्नेह. त्याची माझी प्रथम ओळख टिळक स्मारक मंदिरात झाली. तेव्हा ते मला म्हणाले, 'अरे! वाङ्मय-शोभेचे संपादक ते तुम्हीच काय? मला वाटले होते की कोणी तरी मिशावाला, पगडी घालून उपरणे घेणारा मनुष्य वाङ्मय-शोभेचा संपादक असेल; पण तुम्ही तर अगदी किरकोळ दिसताय!' आणि मी खरोखरच किरकोळ शरीरयष्टीचा सव्वीस-सत्तावीस वर्षांचा पोरगेलासा दिसणारा तरुण होतो. उलट भावे माझ्याहून दोन-तीन वर्षांनी वडील आणि चांगले भारदस्त होते त्याच्याइतकी जाज्वल्य हिंदुत्वनिष्ठा आणि सावरकरनिष्ठा माझ्यात नसली तरी मी त्याच्याशी जवळीक साधणारा होतो. फक्त मी केळकरांच्या छायेत वाढलेला एक केळकरच होतो. भाव्यांची व माझी दोस्ती फार लवकर वाढली. ते पुण्यात असले म्हणजे माझ्याकडे गप्पांचा चार-चार तास अड्डा बसे. चहा तर अनेक वेळा होई व कधी ते जेवायलाही राहात. टिळकरोडच्या पलिकडे असलेल्या मंगलभुवनमध्ये ते काही काळ राहात होते तिथेही आमच्या गप्पांचा अड्डा जमे. माडगूळकर तेथे आले म्हणजे गप्पाना आणखी रंग चढे एकदा ते माडगूळकराना म्हणाले, 'अण्णा, तुम्ही वाङ्मय-शोभेला कविता द्यायला पाहिजे' आणि अण्णानी बसल्या बैठकीला, 'वश्या-किश्यानो' ही उपहासगर्भ कविता लिहून दिली. त्या वेळी मर्ढेकरांची नक्कल चालू झाली होती आणि इंदूरकडच्या कोणी वसताने (आडनाव आठवत नाही.) एक तद्दन आधुनिक शिवराळ कवितासंग्रह प्रसिद्ध केला होता. त्याचा या कवितेत खरपूस समाचार माडगूळकरानी घेतला होता.

पण असे असले आणि वाङ्मय-शोभेत भाव्यानी थोडेफार लिहिले असले तरी खास भाव्याची म्हणावी अशी एकही गोष्ट-१९४७ दिवाळी अंकाचा अपवाद वगळता-वाङ्मय-शोभेला मिळाली नाही. नुकत्याच पाहिलेल्या पत्रव्यवहारात शं ना. नवऱ्यांचे पत्र मला सापडले आहे त्यात ते म्हणतात, 'यदा दिवाळी अंकाला भावे तुम्हाला नक्की कथा देणार आहेत. तुम्हाला कथा द्यायला हवी हेही ते मान्य करतात. फक्त तुम्ही त्याना एक पत्र टाका.' पण त्याही अंकाला कथा मिळाली नाही 'नौका' नावाच्या एका कथासंग्रहाचाही आम्ही करार केला होता. त्या वेळची अॅडव्हान्स चेकची पावतीही मला कागदपत्रात सापडली; पण ती मी फाडून टाकली. कारण भाव्याच्यावर माझे खरेखुरे प्रेम होते आणि कुठल्याही व्यावहारिक तणावाने त्याला तडा जायला मला नको होता. एक गुणी लेखक आणि माझ्यावर प्रेम करणारा एक भावनाशील मित्र हेच त्यांचे नाते मला कायम राहायला पाहिजे होते आणि ते तसे राहिलेही आणि फारशा भेटीगाठी पुढे होईनाशा झाल्या, तरीही त्याचा गाभा कायम होता. भाव्यांच्या बैठकीचा 'रंग' बदलला आणि माझ्याकडच्या बैठकीत त्याचे मन रमणे दिवसेंदिवस कठीण होत गेले आणि ते साहजिकही होते; पण भावे साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासाठी उभे राहिल्याचे मला कळले आणि प्रकृती बरी नसतानाही साहित्यपरिषदेने केलेल्या त्याच्या सत्कारसमारभाला मी गेलो. वास्तविक साहित्यसमेलनात मी कधीच रस घेतला नाही ३८ साली सावरकर अध्यक्ष असताना तेथे पुस्तके खपतील या अपेक्षेने एक नवखा प्रकाशक म्हणून तेथे गेलो होतो. समग्र केळकर वाङ्मयासारखा ग्रंथ मी तेथे नेला होता; पण माझी उपेक्षाच नव्हे तर दारुण निराशा झाली. समेलन म्हणजे तीन दिवस चालणारा जलसा आणि टोळक्याचे गप्पासत्र हे त्याचे स्वरूप माझ्या मनात ठसले.

पण भावे उभे राहिले म्हणून मी प्रतिनिधित्वाची वर्गणी भरली अन् भाव्याच्या सत्कारात छोटे भाषणही केले. ते भाषण फार छान झाले अशी पावतीही मला मिळाली. भाव्यांना फार बरे वाटले. समेलनानतर भावे पति-पत्नी आमच्या घरी अगत्याने येऊन गेली.

माझे पुस्तक 'ते माझे घर' १९६२ मध्ये प्रसिद्ध झाले. त्याची प्रत मी भाव्यांना पाठविली त्या वेळी भाव्यांनी मला पत्र लिहिले,

'मित्रवर्य मनोहरपंत केळकर यासी सप्रेम नमस्कार वि वि-

'ते माझे घर' हे आपले पुस्तक मला फार आवडले, हे कळविण्यासाठी चार ओळी लिहिल्या आहेत. आपल्यातल्या लेखकास आपण असेच मोकळे सोडावे. कळावे लोभ असावा- स्नेहांकित, पु. भा. भावे.'

एवढेच लिहून ते थांबले नाहीत तर माझे अभिनंदन करण्यासाठी सहकुटुंब माझ्या घरी येऊन गेले.

समेलनानंतर त्यांची माझी बरेच दिवसांत गाठ पडली नाही तेव्हा मी त्याना पत्र लिहिले आणि पुन्हा पुण्यास याल तेव्हा अवश्य भेटा असे सांगितले. त्यावर त्यानी लिहिले, 'खरोखरच एकमेकाना भेटायला पाहिजे. आता आपण फार थोडे उरलो आहोत.'

पण ती भेट अखेर झालीच नाही. जे थोडे उरलो आहोत तेही विस्कळित झालो आहोत. भाव्याच्यापुरते बोलायचे तर ते गेले खरे; पण खूप किर्ती मागे ठेवून गेले आहेत.

□

मी सभा-समेलनांतून फारसा भाग घेतला नाही त्यामुळे साहित्यिकाची वर्तुळे, मंडळे, समित्या, सस्था इत्यादीपासून दूरच राहिलो. मी प्राध्यापकही झालो नाही. प्राध्यापकाला साहित्यिक बनणे आणि वरील सघटनातून भाग घेणे खूप सोपे असते तरी पण व्यक्तिशः मात्र माझ्या व्यवसायामुळे आणि स्वभावामुळे खूप साहित्यिकाशी माझा सबध आलेला आहे आणि तोही अगदी घनिष्टपणे आणि वगवेगळ्या काळी वेगवेगळ्या स्थळी. नव्या उदयोन्मुख साहित्यिकाना पत्रे लिहायची, त्याना आपल्याकडे बोलवायचे, आपण त्याच्याकडे जायचे ही माझी हौस होती किंबहुना तो माझा हव्यास होता नव्या लेखकाचा चागलासा मजकूर आला की तो संस्कार करून का होईना घ्यायचा, पण अकुर खुडू द्यायचा नाही अशी माझी वृत्ती होती, ती तशी बनण्याला प्रारंभी माझी घरी झालेली उपेक्षा हेही एक कारण असू शकेल.

शं. ना नवरे यांची 'तिळा उघड' ही गोष्ट 'सत्यकथे'त वाचली आणि मी त्यांना कौतुकाचे पत्र लिहिले. स. ग. मालशे याची एक कथा (की समीक्षा) मी रेडिओवर

ऐकली आणि त्यांनाही मी पत्र लिहिले. वसुधराबाई पटवर्धनाची एक कथा मी 'विविधवृत्ता 'त वाचली आणि तिचे कौतुक केले. मधु मगेश कर्णिकाची एक कथा दिवाळी अकासाठी माझ्याकडे आली ती मी दिवाळी अकात घेऊ शकत नव्हतो. पण मी लगेच त्याना ती खूप आवडल्याचे पत्र लिहिले आणि त्याचा माझा स्नेह जमला. सांताक्रूझच्या झोपडपट्टीत ते राहात. तेथेही मी जात असे सदानद रेगे तर अगदी प्रिय मित्र. रेग्यांच्या सहवासात मी पाच-सात वर्षे अतूट आनदात घालविली आहेत. फोर्टमध्ये भटकणे, तसेच काळ्या घोड्यापासच्या लायब्ररीत जाऊन बसणे, गप्पा आणि चहा-पाणी यात किती वेळ खर्चला याची गणती नाही.

या लोकांनीही मला चागला प्रतिसाद दिला. यापैकी कित्येक जण पुण्याला मुद्दाम माझ्याकडे येत आणि त्याचे गृहस्थी पद्धतीने चागले स्वागत होई, पाहुणचारही होई. हे स्वागत करताना माझ्या स्वभावाप्रमाणे ते दिलखुलासपणे होई आणि माझ्या पत्नीनेही कठीण परिस्थितीतसुद्धा या कामी मला उत्तम साथ दिली; एवढेच नव्हे तर घरातल्या अडचणी कुणाच्याही लक्षात येऊ दिल्या नाहीत. आमच्या घरच्या वाळयाच्या पाण्याचे आणि अजिराच्या मोरव्याचे रेग्यांनी तोंड भरून किती कौतुक करावे याला तर सीमाच नव्हती. रेग्याच्याबरोबर एकदा काही कारणाने मगेश पाडगावकराचा आमच्या घरी दोन-चार दिवस मुक्काम झाला. त्या वेळी त्यांची प्रकृती बरी नव्हती. पण दोन दिवसानी त्याना बरे वाटले आणि आमच्या घरगुती आपलेपणाने तो कविमाणूस भारावून गेला. इतका की पुढे एकदा मी त्याना पत्र लिहून वाङ्मय-शोभेसाठी त्याचा एक लेख मागितला आणि त्याना लिहिले की तुम्हाला लेख द्यावाच लागेल, कारण रेग्यानी तशी हमी घेतली आहे. तेव्हा त्यांनी मला उत्तरी एक कविताच पाठिविली;

सदू रेग्याची हमी कशाला ?
निबध नक्की देईन धाडून,
स्फुरला जर तर दुधात साखर
नाहीतर मग देईन 'पाडून' !
कुठलाही मग विषय असू दे
राम असो वा असू दे रावण
सदैव अमुचा सुसज्ज बोरू
ग्रीष्म असो वा असू दे श्रावण
मान आमची देऊ आम्ही
शब्दाचा पण ठेऊ मान
सायन ग्रामी अमुचा लौकिक
त्याचा बाळगतो अभिमान !
जाहीर करितो तारीख आठ
त्या दिवशी मम निबंध येईल;
नाही तर कवि शब्दाखातर
दाढी अपुली काढुनि देईल.

पाडगावकर घरी असताना आणखी एक गंमत झाली. त्याची एक कविता अविनाशच्या एका श्रमिक पुस्तकात होती. त्याला ती समजेना. तेव्हा रेगे त्याला म्हणाले, 'अरे, त्या दाढीवाल्या काकाचीच ती कविता आहे. त्यांनाच अर्थ विचार.' अविनाश लगेच त्यांच्याकडे गेला आणि म्हणाला, 'अहो दाढीवालेकाका, ही कविता मला समजावून सांगता का ? ' आणि आम्ही मन:पूर्वक हसलो !

जाता जाता अशीच एक गंमत आठवली ती सांगतो. एका काळी कवी मनमोहन नातू याचा नि माझा घनिष्ट सबंध होता. त्याच्या कित्येक सुदर कविता मी वाङ्मय-शोभेत छापल्या आहेत. त्याची माझ्याकडे छापलेली सर्वोत्कृष्ट कविता सावरकराविषयी आहे— विश्वात फक्त आहेत । विख्यात बहाद्दर दोन जे गेले आईकरिता । सागरास पालाडून हनुमंतानतर आहे । त्या विनायकाचा मान

त्यानंतर मनमोहनची मी प्रसिद्ध केलेली चांगली पण अकारण बदनाम झालेली कविता म्हणजे 'राधे तुझा सैल अंबडा.' मी अनेकदा मनमोहनकडे गेलो म्हणजे त्याच्या करडीतून त्याने लिहून टाकून दिलेल्या कविताचे चिठोरे बाहेर काढून वाचीत असे. त्यात मला एकदा एक कविता गवसली. कवितेचे नाव होते, 'झाला मज उलगडा' त्या कवितेला फक्त चागले तोंड नव्हते. अतिशय हृद्य अशी ती कविता मनात भरली नाही म्हणून मनमोहनने केराच्या टोपलीत टाकून दिली होती. ती कविता अशी होती—

पृथ्वीच्या पेल्यात गाळिली
रात्रीच्या बागेतिल द्राक्षे
भुलवुनि तुजला बनात नेली
वाजविता बासरी
कचपाशाचा नाग उलगडी फणा
बाल्याची कबुतरे पळाली
पहिल्या चचल भेटीमधली
मिठी पुरावा ठेवुनि गेली
वेणि तिपेढी कुरळी मृदुला
सुटली घालित गधसडा
भ्रमररगी हा शाम सापडे
नीलकमल कचपाश तव गडे
अरुणोदय होताच उलगडे
पाकळि पाकळि होई मोकळी
या कोड्याचा झाला मज उलगडा

मी मनमोहनला म्हटले, 'अरे गृहस्था, ही कविता फार चागली आहे. ती पूर्ण कर. (मला वाटते त्या वेळी त्याने पहिली दोनच कडवी केली होती.) आणि या कवितेला एक चांगले तोंड कर.' अशा रीतीने पूर्ण झालेली ही कविता काव्य-गायक वाटवे यांनी झिजेपर्यंत गायिली आणि ग्रामोफोन रेकॉर्ड निघून त्या रेकॉर्डसुद्धा खूप खपल्या.

अविनाश लहान असताना त्याने एकदा मनमोहनची दाढी उडवली होती, त्याची हकीकत मोठी मनोरंजक आहे. एकदा मनमोहनने, एक चार ओळीची कविता लिहून तो कागद त्याला आणून दिला. ती कविता अशी—

अविनाष माझे मधुर सुनाम
माता-पित्याना करुनी प्रणाम
घेई मुखी मी पहिलाच घास
आनद कोंदे सदा आसपास

कवितेचा कागद अविनाशच्या हातात देऊन मनमोहन घाईत असल्यामुळे जायला निघाला. पहिल्या ओळीतला पोटफोड्या 'ष' पहाताच अविनाश धावत त्याच्यामागून गेला आणि म्हणाला, 'अहो नातूकाका, जरा थाबा; माझ्या नावातला 'श' शेंडीफोड्या आहे तो तुम्ही पोटफोड्या लिहिला आहे.'

मी 'शुद्ध' लेखनाचा पुरस्कर्ता आहे व माझे ज्ञान मी प्रुफे तपासताना साक्षेपाने उपयोगात आणतो; परतु अविनाशने माझ्यावरही कडी केली होती.

मनमोहनचा कवी म्हणून वाङ्मय-शोभेशी संबंध पाच-चार वर्षे टिकला असेल पण तो त्याच्या प्रतिभेच्या बहराचा काळ होता. त्याच्या किती तरी कविता-काही दीर्घ काव्येही-वाङ्मय-शोभेत प्रसिद्ध झाल्या आहेत, मनमोहनजवळ त्याचे कात्रणसुद्धा नसे. त्याच्या सृजनशक्तीविषयी त्याच्या-

पेक्षाही माझी अधिक खात्री होती. फक्त त्याला योग्य तो लौकिक न मिळायला त्याचा स्वभाव कारण झाला. माणसाचे मूल्य जोखले जायलासुद्धा एक तऱ्हेचा संथपणा आणि भारदस्तपणा त्याच्या स्वभावात लागतो. त्याने काही लागेबांधे जोडावे लागतात. एकदा त्याने स्वतःचे स्थान निर्माण केले की, मग थोडेसे जगावेगळे वागणे खपून जाते. रोप लावायचं अन् दोन दिवसानी मुळं किती वाढली म्हणून उपटून पहायच असे करून चालत नाही.

मनमोहनने कविता लिहून आणि गद्यातही अनेकदा, त्याला लौकिक मिळवून दिल्याबद्दल माझे आभार, मानले आहेत. माझ्याबरोबरच रॉय किणीकराचेही नाव त्याने घेतले आहे. 'तुम्ही दोघांनीच माझ्यातला गुण ओळखलात' असे तो म्हणतो. मी तर त्याची थोडी वकिलीही केली आहे. कविवर्य बोरकरांना मी तर मनमोहनविषयी लिहिलेल्या पत्राच्या उत्तरात ते म्हणतात, : मर्ढेकरांच्या मर्यादा आणि मनमोहनच्या शक्ती मी फार पूर्वीपासून ओळखल्या होत्या. आपापल्या परीने दोघेही मोठे आहेत; पण संकेताची झापडे बाजूला सारून माणसाचा नेमका मोठेपणा हेरणे फार थोड्यांना जमते. तुम्ही मनमोहनचा मोठेपणा फार लवकर ओळखलात यात शंका नाही.' (हे पत्र शांतिनिकेतन, बोरी, फोंडा गोवा येथून ३ ऑक्टोबर १९७० ला बोरकरानी पाठवले आहे).

बोरकर कवी म्हणून विख्यात आहेतच आणि माझ्याहून ते वयानेही मोठे आहेत. तेव्हा त्यांनी दिलेल्या या शाबासकीने मला आनंद झाला असे मी म्हटले तर वाचकानी तो अहंकार समजू नये.

'राधे तुझा सैल अंबाडा' या १९४८ साली वाङ्मय-शोभेच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या कवितेबद्दल १९६३ च्या दीपावली शुभचिंतनात मनमोहन म्हणतो,

मनोहर
तुझा यशोदायी हात
केरातले सोने वेचणारा.
तुझ्या 'परीक्षक' हाताने
'राधे तुझा सैल' मराठीला वाचवून दिले
जे 'कागद' रद्दीत गेले असते
त्यांना तू महोदयता दिलीस

मनमोहनची पहिली कथा 'भागी' वाङ्मय-शोभेतच प्रसिद्ध झाली; पण त्याची माझ्याकडची अप्रतिम कथा 'मर्मबंधातली ठेव ही,' ही कथा दीनानाथ मंगेशकरांच्या जीवनातील एका अतीव करुण प्रसंगावर आधारलेली आहे.

ज्याची माझी तीस वर्षांहून अधिक वर्षे पत्रव्यवहाराने ओळख आहे; पण प्रत्यक्ष गाठभेट तीनदाही झालेली नाही असे माझे स्नेही व वाङ्मय-शोभेचे एक लेखक जी. ए. कुलकर्णी याच्याविषयी मुद्दाम लिहायला पाहिजे. कारण एखाद्या मित्राची किंवा जवळच्या नातलगाचीही पत्रे माझ्याजवळ नसतील इतकी त्यांची पत्रे माझ्याजवळ आहेत दोघानाही पत्रव्यवहाराचे प्रेम आणि जणु समक्ष बोलतो आहोत अशा पद्धतीने पत्र लिहायची शैली असल्यामुळे हा पत्रव्यवहार मनमोकळा आणि काही ठिकाणी रंगतदारही झालेला आहे. जी. ए. पत्रे जपून ठेवतात का? आणि ठेवत असतील तर त्यात माझी आहेत का? हे मला माहीत नाही.

जी ए. कुलकर्णी याचे वाङ्मय-शोभेत आलेले बहुधा पहिले लेखन म्हणजे 'चांदण्यातील सावल्या' ही सुंदर एकांकिका होय. त्याच्या अगदी अलीकडच्या म्हणजे २०-४-७९ ला धारवाडहून आलेल्या पत्रात ते लिहितात, 'वाङ्मय-शोभेच्या प्रगतीचा मला फार आनंद आहे. फार पूर्वी शोभेत 'चांदण्यातील सावल्या' नावाची एक एकांकिका आली होती. ती तुम्हाला बरीच आवडलीही होती. ती मी माझ्या कुठल्याही संग्रहात घेतलेली नाही. म्हणजे ती जर कुणाला पहायची असेल तर त्याला वाङ्मय-शोभेच्या अंकाखेरीज आधार नाही.'

अलीकडे मात्र कित्येक वर्षांत जी. एं. चा मजकूर वाङ्मय-शोभेत आलेला नाही; पण *त्याला कारण ते नाहीत, मी आहे.* कोणत्या विचित्र मनःस्थितीत मी त्याचेच नव्हे; पण पूर्वी माझ्याकडे लिहीत असलेल्या अनेक ख्यातनाम लेखकांच्याकडे मजकूर मागणे बंद केले ते मी (या आत्मचरित्राच्या) वाङ्मय-व्यवहार या प्रकरणात सांगेन.

☐

## गुलशन-ए-गजल

### मराठी मुक्तार्थासह उर्दू गजला

उर्दू गजलचे क्षेत्र अत्यंत विस्तृत असून मिर्झा गालिब, मीर, मोमिन, जफर, साहिर लुधियानवी, जिगर, शकील बदायुनी, फिराख गोरखपुरी, इकबाल, कातिल शिफाई, मजाज, कैफी आजमी, मजरुह सुल्तानपुरी, दाग, मीनाकुमारी अशा किती तरी पुरातन व आधुनिक शायरानी गजलच्या क्षेत्रात आपआपल्या सामर्थ्यानुसार लेखन केले आहे. गजलच्या संपन्न क्षेत्रात प्रा. टी. के. जाधव 'अश्क' यांनी 'गुलशन-ए-गजल' या पुस्तकाद्वारे आपली लेखणी अजमावून पहाण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रा. टी. के. जाधव 'अश्क' याचा 'गुलशन-ए-गजल' हा उर्दू गजलाचा संग्रह आजच्या पिढीवरील गजल या काव्यप्रकाराच्या वाढत्या प्रभावाचं प्रतीक आहे. प्रा. टी. के. जाधव यांनी स्वतःच्या उर्दू गजला देवनागरी लिपीत प्रसिद्ध करून व त्यासोबत त्याचा मुक्त भावानुवाद देऊन रसिकाची मोठीच सोय केली आहे. उर्दू गजलाच्या स्वरूपाबद्दल माहितीपूर्ण असे आरंभी आलेले कवीचे मनोगत जिज्ञासूनी मुळातूनच पाहण्याजोगे आहे.

उर्दू गजलमध्ये आढळणारी विरहाची भावना प्रामुख्याने येथे आविष्कृत झाली आहे.

जागे तो याद, सोये तो
आये तुम्हारे ख्वाब।
इस दरजा कोई हमको सताये,
तो क्या करें॥

प्रेयसीपासून विरह होणे स्वाभाविकच आहे. हे सांगताना कवी म्हणतो–

क्यो नही, 'अश्क' फासला हममें।
मैं जमी वो सुहाब की मी है॥
(मी धरती तर प्रिया मेघासमान आहे)

कालपर्यंत स्फुंदून स्फुंदून रडणारी प्रिया आज इतकी निष्ठुर कशी झाली? आज तिच्या डोळ्यात माझ्यासाठी सहानुभूतीचा एक अश्रूही का येत नाही? असा प्रश्न

कवीला पडतो–

आँखों मे उनकी नही आँसू
मेरे लिए।
रोते थे जार जार,
अभी कल की बात है।।

प्रियेच्या विरहात हे संपूर्ण जग म्हणजे एक कारुण्यपूर्ण कबरच वाटते,म्हणून कवी म्हणतो,

एक मजारे बकसी है
ये दहर तेरे बगैर।
मौत के पहलू में सोये
उम्रभर तेरे बगैर ।।

फुलासारख्या नाजुक शरीराची प्रिया, पण मनात मात्र काटयासारखी सलत राहते, त्याला काय म्हणावे ?

तसव्वुर में वो गुलवदन जबसे है।
खलिश दिलमें एकखार-सी तबसे है ।।

प्रियेवरील प्रेमभावनेच्या विविध रंगाची प्रा. जाधव याची गजल बहरलेली आहे. प्रेमाशिवाय जग विषासमान असह्य आहे. प्रेम हीच भक्ती आहे, मदिर-मशिदीमध्ये देव नसून प्रीतीच्या तेजाचा दीप उजळण्याचे नावच 'धर्म' होय ,या कवीच्या तत्त्वज्ञानाचा हृद्य आविष्कार या गजलामध्ये झाला आहे.

उर्दू गजलातील तरल सौंदर्यानुभूती, आत्यतिक नाजुकता, काटेकोर बाधणी, बदिस्त नियम, सुदर-मधुर कल्पनाविलास, कलदरवृत्ती, जीवन-मृत्यूचे आगळे-वेगळे दर्शन, प्रेमाची उदात्तता, शब्दांची आशयघनता, मनोरम गेयता असलेली छदयोजना ( बहेर ), ही प्रमुख उर्दू-गजलाची गुणवैशिष्टये कवी प्रा. टी. के जाधव याच्या गुलशन-ए-गजलमध्ये आढळून येतात. मात्र काही ठिकाणी यमक-अत्ययमकाचे (काफिया-रदीफ) भान सुटलेले आहे

कवी जाधव याना गजल तत्रावर हुकुमत प्राप्त झाली असून त्यांचे उर्दूभाषेवरील प्रभुत्व व गजलरचनेतील सफाई मराठी वाचकाना निश्चितपणे विलोभनीय वाटेल, म्हणून त्याच्याच शब्दात त्याना हे सागावेसे वाटते–

उठाओ साज, गजल
छेड दो तुम्ही, ऐ 'अश्क'।
के बज्मे शेरे अभी तक तो
खुशगवार नही ।।

—रब्बेसलाम शेख

'गुलशन-ए-गजल'
कवी प्रा. टी. के. जाधव – 'अश्क'
किरण प्रकाशन, पुणे.
किमत रु. २०. पृष्ठे–८१.

# वासंतिक गायनोत्सवाचे पुण्यस्मरण

प्रा. डॉ. श्रीरंग संगोराम

डॉ. वसतराव देशपाडे म्हणजे मूर्तिमत गायनोत्सव ! गेली तिसाहून अधिक वर्ष महाराष्ट्राच्या सगीत–माहौलमध्ये हा उत्सव चढत्या उत्साहाने साजरा होत राहिला आणि जेव्हा अचानक तो थाबला तेव्हा सर्व गानरसिकांना हरवल्या– हरवल्यासारखं होऊन गेलं. 'गौर से सुन रहा था जमाना। तुम ही सो गए दास्ताँ कहते।' असं सर्वांचं मन बोलून गेल. परवा दि. ३० जुलैला पुण्यातील गरवारे महाविद्यालयाच्या सभागृहात उत्फुल्ल गर्दीमध्ये डॉ. वसतरावाच्या प्रथम पुण्यतिथीच्या कार्यक्रमात ही भावना सर्वांच्या मनात प्रकर्षानं जागी आहे अस जाणवत होतं. या कार्यक्रमाची चार प्रमुख वैशिष्टय होती. एक त्यांचे सत्शिष्य विजय कोपरकर यांचं गायन, दुसर पु. ल. देशपाडे याचे भाषण, तिसरं कै. वसंतराव याच व्ही. डी. ओ. वर दूरदर्शन आणि पं. कुमार गंधर्व याच गायन. विशेष जाणीव झाली ती याची की, कार्यक्रम बरोबर नऊला सुरू झाला आणि त्यापूर्वीच श्रोते स्थानापन्न होऊन बसले होते. सगीताच्या कार्यक्रमात अस फार कमी पाहायला मिळतं. कार्यक्रम उशीरा सुरू झाल्यामुळं श्रोते आधी येऊन बसले आहेत अस भासत असत. दुसरं असं की, गायकाच्या पुण्यतिथीत भाषणाची गर्दी न ठेवता त्या महापुरुषाचा 'आठव' यथातथ्य रूपात येत रहावा अशीच सर्व योजना होती. विजय कोपरकराच्या गायनातून वसतरावाच्या गायकीचं सगुण साकार दर्शनच जणू घडलं. 'सगुण साकार' अशासाठी की, स्वतः वसंतरावाच गायन आपण जेव्हा जेव्हा ऐकलेल आहे तेव्हा निर्गुण परमात्म्याप्रमाणं आपल्या हाती सापडणारं वाटत नव्हतं. तो एक गायनोत्सवच असायचा. ते गायला बसले की, पहिल्या चार–पाच मिनिटात रंगत 'प्रस्थापित करून आपल्या 'विहारा' ला निघत. मग त्यात लयकारीच्या नानापरी, समवेर येण्याची 'नमवी महा भूमि हा' सारखी ऐट, तानाचे 'अतोनात' प्रकार, एवढयाशा जागेत विद्युल्लतेची चमक जशी तेजाच सर्वत्र दर्शन घडवून जाते तशी अडीचतीन मात्रेतही स्वरवेलीचं भरघोस कणीस निर्माण करण्याची त्यांची लकब, बंदिशीतील अक्षरं, शब्द आणि भाव सर्व समजून घेऊन त्याची बढत करण्याची त्यांची खास वसंतरावी ढब हे सर्व आणि इतरही खूप असं मेजवानीत एकामागून एक येणाऱ्या पदार्थांप्रमाणं इतक समोर उभ ठाकायच की,

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनम् ।
आश्चर्यवत् वदति तथैव चान्य. ।
आश्चर्यवत् चैवमन्यः श्रृणोति ।
श्रुत्वाप्येन वेद न चैव कश्चित् ।।

अशी स्थिती होऊन जायची. भगवद्गीतेत आत्म्याचं वर्णन करताना हा श्लोक आला आहे. या आत्म्याकडे आश्चर्यकारक वस्तू म्हणून कुणी पाहतो, कुणी याचं वर्णन 'केवळ आश्चर्यकारक' अस करतो. अन्य जन हे वर्णन ऐकून आश्चर्य करीत असतात; परतु यापैकी कुणालाच या आत्म्याच खर स्वरूप कळलेल नसतं तर अस हे वसंतरावाचं चैतन्याचा बाघ फुटल्याप्रमाणं वाहणार गाणं एखाद्या सगुण साकार रूपात पकडण ही गोष्ट कठीणच विजय कोपरकरांच्या गायनातून मात्र तिच्या 'विश्रब्ध विलक्षणतेचं' मनोहारी दर्शन घडलं आणि पु लं. नी आपल्या भाषणात वेगळ्या शब्दातून जणू हेच ध्वनित केल. त्यानी वसतरावाच्या आयुष्यातली तीस–एक वर्षांपूर्वीची नागपूरची घटना वर्णन करताना सागितल की 'त्या' बैठकीत वसंतान कौशी कानडा असा ठासून गायला की,श्रोते मत्रमुग्ध झाले; पण एका खडूस बुझुर्गानं त्यांना विचारलं की, 'तुमचं घराणं कुठलं ?' वसंतानं ताडकन उत्तर दिलं– 'आमच्यापासून सुरू होणार आहे आमच घराण.' पु. ल. म्हणाले की,

वसंतरावांच्या त्या उद्गाराचं प्रत्यतर आज या तरुण गायकाचं गाणं ऐकताना मिळालं. याचाच दुसरा अर्थ हा, की, वसंतरावांच्या गायकीतील काही स्थिर-पद तत्त्वाचं दर्शन *विजयच्या गाण्यातून घडलेलं होतं आणि त्या*मुळंच वसंतरावांच्या घराण्यानं बाळसं धरलं आहे असं जाणवत होतं.

## वसंती वैशिष्ट्यं

विजय कोपरकरांनी मारू-विहाग, केदार हे राग आणि 'रवि मी' हे नाट्यगीत सादर केलं. स्वराची गोलाई, मुरकी घेऊन समेवर येणं आणि तेही वेगवेगळ्या पद्धतीनं येणं, सरगमचं सौंदर्य, लयकारीचं भान, ख्यालाची द्रुतविलंबित बढत, आवाज अजिबात न चोरता खुला आकारयुक्त स्वर लावण्याचा आग्रह इत्यादी अनेक वसंती वैशिष्ट्यांचा आनंद त्यांच्या गायनातून भोगता आला. वसंतरावांच्या दोन लकबीही जाणवल्या. ते ए-काराचा उच्चार मधून मधून 'य्ये'च्या अंगानं करीत (उदा 'दे'च्या ऐवजी 'द्ये') तसंच हिंदी उच्चाराच्या भिनलेल्या संस्कारांमुळं शब्दाच्या *अखेरचा स्वर ऱ्हस्व 'अ' कडे झुकत असे.* उदा. 'रवि मी' म्हणताना 'रवि मी ऽऽ व्' असं ऐकू येत असे. त्यांच्या या लकबीमुळं श्रुतिसौंदर्यात एक आगळीच भर पडत असे. याचं स्थान तोंडी लावण्यापुरतं असलं तरी 'तोंडी लावणं' यातच त्यांचं 'अलंकारिकत्व' सिद्ध होतं. सांगायचं म्हणजे कोपरकरांच्या गायनातूनही हे ऐकायला मिळत होतं. 'कान्हा हे नंदनंदन' ही केदारमधली द्रुत चीज म्हणत असताना 'नौन्दन' असा जो त्यांचा उच्चार होत होता तो वसंतरावांच्या संस्कारांची आठवण करून देत होता पु. लं. नी आपल्या भाषणात वसंतरावांच्या गायनातील या श्रुतिसौष्ठवाकडं मुद्दाम लक्ष वेधलं आणि केवळ वसंतरावांचं वैशिष्ट्य म्हणूनच नव्हे तर एकूण हिंदुस्थानी गायनाचंच एक महत्त्वाचं अंग म्हणून त्याचं महत्त्व अविवाद्य आहे. 'वसंतरावांच्या गायनातील व्युत्पन्नता त्यांच्या उच्चारात *होती. त्यांच्या व्रजभाषेच्या उच्चारात* कधीही चूक होणार नाही.' वसंतराव शिष्यांना तालीम देत असताना बंदिशीच्या या अक्षरनाद-सौन्दर्याचं नक्कीच महत्त्व सांगत असले पाहिजेत. कारण त्यांच्यामध्ये इतर 'बहुतेक' गायकांमध्ये न आढळणारा एक गुणविशेष होता. तो हा की त्यांना हिंदी, बोली व्रज, तसंच उर्दू आणि पंजाबी इत्यादी भाषांचं *उत्तम ज्ञान होतं. त्यामुळं त्यांच्या गायनात* 'पंडित' आणि 'उस्ताद' या दोघांचं दर्शन एकाच वेळी घडत असे. भास्करबुवा बखल्यांच्या गाण्यात जी 'कोर मे की खुषबो' (उस्ताद मंडळी मांसाहारी असल्यामुळं त्यांच्या गायनात एक वेगळीच रंग आणि सुगंधित शृंगारिकता असे असा एक भाव) सांगितली जात असे तिचं दर्शन वसंतरावांच्या ख्याल, ठुमरी, टप्पा, दादरा, गझल इत्यादींतून चांगलंच होत असे. याचं श्रेय त्यांच्या पतियाळा-प्रेमाला आणि संगीतातील मिळतील त्या सर्व उस्तादांकडं मधुमक्षिकावृत्तीनं केलेल्या एकलव्य-साधनेला दिलं पाहिजे. संगीतासाठी असा वणवण भटकणारा साधक विरळा! या विरळेपणात आणखी एक निराळेपणा होता. तो हा की हे सर्व वसंतरावांनी संसार सभाळून केलं. त्यासाठी चोवीस वर्षं ते 'गवर्मेंटचा मोस्ट ओबीडियंट सर्व्हंट' राहिले. दुचाकीवरून *पायटच्या मारीत ऑफिस करायचं आणि* उरलेला सर्व वेळ संगीताला अर्पण करायचा; पण संगीताच्या 'पार्टटाइम' जॉबचा त्यांनी 'फुलटाइम' जॉब करून टाकलेला होता.

परंतु याकरिता त्यांना किंमत किती जबर द्यावी लागली! – पण याबद्दल थोडं नंतर बोलायचं आहे. आधी ३० जुलैचा कार्यक्रम संपवून घेतला पाहिजे. पु लं च्या भाषणानंतर नाटककार श्री. सुरेश खरे आणि नटवर्य श्री. दिलीप प्रभावळकर यांनी बनवलेली व्ही. डी. ओ. टेप लावण्यात आली आणि वसंतरावांनी गायलेली एक ठुमरी ऐकायला मिळाली. त्या मंडळींनी हे फार मोलाचं काम करून ठेवलं आहे आणि इतरही महनीय गायकांचं असं स्मारक त्यांनी त्वरित करावं असं सुचवावंसं वाटतं. ठुमरीत 'सखया उद्या सकाळचं का जात नाही? *असं नायकाला आळवणाऱ्या नायिकेचे* बोल होते. त्यातला तो उघड उघड शृंगारिक भाव स्वरलडीतून, स्वरकणांतून आणि लयीच्या लडिवाळ उपजातून वसंतरावांनी असा काही खुलवला आहे की ते गायन संपेपर्यंत आपल्या मनात दुसरा कुठलाही भाव जागृत होऊ शकत नाही. त्यातली ऐंद्रिय संवेदना संगीताच्या माध्यमामुळं अतींद्रिय बनली असली तरी *त्यात मातीचा सुगंध दरवळत होता.* महाराष्ट्राला अशा प्रकारचं मातीच्या सुगंधाने श्रीमंत झालेलं गाणं देण्यासाठीच जणू वसंतरावांनी अवतार घेतला होता.

पुण्यस्मरण कार्यक्रमाची सांगता पं. कुमार गंधर्वांच्या गायनानं झाली. कुमारजींचा आणि वसंतरावांचा अगदी जुना स्नेह. वसंतराव कुणापुढे झुकणारे नव्हते. बंडखोरपणात हे बसतच नाही; परंतु इथं मात्र त्यांना 'दिव्यत्वाची प्रचीती' मिळाली होती. कुमारांनी आपल्या गायनात आवर्जून एक बंदिश म्हटली यातील अस्ताई वसंतराव आणि अंतरा कुमारांचा आहे. मधुवंती रागाच्या या अस्ताईमध्ये वसंतराव म्हणतात- 'हे मनबसिया कुमारजी मला तुमच्या पाया पडू दे.' यावर अंतऱ्यात उत्तर आहे– 'अरे मनबसिया मित्रा माझी झोपडी तुझीच आहे. पाया पडण्याची काय गरज!' हिंदुस्थानी संगीतातील बंदिशीमध्ये गुरु-शिष्य सवादाचे *असं नाट्यमय रूप एरव्हीही आढळतं.* त्यातलंच हे एक. तर मुद्दा हा की, हा या दोघांतला स्नेहभाव. आपल्या या कद्रदान मित्राकरिता मुद्दाम कुमारजी आलेले. त्यांच्या त्या एकूण गाण्यामध्ये वसंतरावांच्या स्मरणाचा 'सूर' त्यांनी जागता ठेवला होता. त्यांनी फक्त काही निवडक बंदिशीच मुख्यतः ऐकवल्या. परंतु त्यातही स्वराचे वेगवेगळे लगाव आणि खोल कलात्मक लयकारीचं दर्शन इतकं पाडलं की, क्षणाक्षणाला दाद देण्याशिवाय मार्गच नव्हता. कुमारजींच्या सुरांनी कार्यक्रमाची सांगता झाली हे सर्वथा यथायोग्यच झालं.

¤

वसंतरावांचं पृथगात्म वैशिष्ट्य सांगायचं झालं तर 'ज्ञानी गायक' असं त्यांचं वर्णन करता येईल. त्यांच्या कायमच्या अनुपस्थितीमुळं महाराष्ट्राच्या संगीतक्षेत्रात अक्षरशः न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे याचं प्रत्यंतर गेल्या वर्षभर संगीतप्रेमींना मिळत आहे. हिंदुस्तानी संगीतासंबंधीचा कोणताही प्रश्न असो त्याचं अभ्यासपूर्ण असं निर्णायक उत्तर त्यांच्याजवळ हमखास मिळत

असे. त्याच ज्ञान प्रयोगसिद्ध होतं. गायनातील कोणत्याही प्रमेयाबद्दल बोलायच म्हणजे सप्रयोग बोलावं लागतं वसतरावानी आपल्या मनाच्या प्रयोगशाळेत सुचतील त्या सर्व प्रश्नांवर अनेक प्रयोग केले असले पाहिजेत त्यामुळं त्याची मतं ही खास त्याचीच असत आणि म्हणून त्यांचं विशेष महत्त्व होतं. उदाहरणार्थ स्वर आणि भाव यांचा संबंध सांगताना ते नि.सदिग्धपणे सांगत की, स्वराना भाव नसतो ते फक्त आर्त असतात. एखाद्या रसभावाशी त्यांचा जो सबंध जुळतो तो लयीमुळं किंवा तो राग पूर्वांगप्रधान किंवा उत्तरागप्रधान असल्यामुळं. स्वत: उत्कृष्ट 'सरगम' करणारे असूनही 'सरगम' बद्दल ते स्वच्छ सांगत– 'जे आकारानं करून दाखवता येतं ते 'सरगम'नं केलं तर रसहानी होईल. सरगममधून ताल–लय–चित्र निर्माण होते; पण भावव्यक्ती खास नाही.' ज्या 'कट्यार...' नाटकानं त्यांना कांचन आणि कीर्ती मिळवून दिली त्या नाटकाबद्दल 'हे सगीत–नाटक नाही' असं वेगळे पण अत्यंत तर्कशुद्ध मत त्यांनी वर्तविलेलं आहे. नाटचसगीताबद्दलचं त्याचं ज्ञान म्हणजे ते त्यातला 'ज्ञानकोश' होते. दूरदर्शनवर आणि प्रकट कार्यक्रमातून याची प्रचीती अनेकाना आली आहे. या कार्यक्रमामध्ये त्यांनी बालगंधर्व शैलीची आणि दीनानाथ शैलीची अशी दोन्ही गीत म्हटलेली आहेत. 'कशि या त्यजू पदाला' हे गीत म्हणत असताना ते बालगंधर्वांच्या निवडक जागा चपखलपणे घेत. बालगंधर्वांची सही सही नक्कल करणाऱ्यांना त्यांच्या खोल लयकाराचा वेध कधीच घेता आलेला नाही. वसतरावांना मात्र तो पूर्णत्वानं प्राप्त झालेला होता. हीच गोष्ट दीनानाथाची गीतं गात असताना. एकाच कंठामधून बालगंधर्व व दीनानाथ आपल्या मूळ रूपात ऐकायला मिळण हे अजब. वसंतरावांनाच ते शक्य होत.

## तंतोतंत भूमिका

वसंतरावानी संसार सांभाळून आपली संगीतसाधना सफल केली हे खरे; पण त्यासाठी त्याना किंमत किती द्यावी लागली! नोकरी सोडून 'सपूर्ण वेळ गायक' बनण्याचं आणि दरबारी थाटामध्ये राहून शागीर्दांना मार्गदर्शन करीत मधूनमधून मोठ्या दिमाखानं मैफली रंगवण्याचं स्वप्न त्याच्या मनी नक्कीच असल पाहिजे. त्याकरता लागणारं मूलधन त्यांनी कमावलेलं होतं; पण त्याची ती आकांक्षा 'त्या' इतमामानं पूर्ण होऊ शकली नाही. हे शल्य त्यांच्या मनात तर राहिलच; पण त्याहीपेक्षा सगीतरसिकांच्या मनात राहून गेलं. यात चुकलं कुणाचच नव्हतं. नाटकात धीरोदात्त नायकावर जे कठीण प्रसंग येतात ते नियतीमुळेच येत असतात. नट-गायक म्हणून त्याना प्रचड कीर्ती मिळाली; पण ती त्याच्या नटत्वापेक्षा गायकत्वामुळे जास्त मिळाली हे विसरून चालणार नाही. 'कट्यार'मधील भूमिका ही त्यांच्या स्वभावाशी आणि जीवनसाधनेशी तंतोतंत बसणारी होती. अर्जुन, धैर्यधर, कच यांसारख्या भूमिकामध्ये ते यशस्वी झाले असते का? अर्जुनाची भूमिका त्यानी केलेलीही होती. हा आग्रह वसतरावांचा मुळीच नसला पाहिजे. आपल्या संगीतनाटकवाल्याना नटापेक्षा गायक हवा असतो. तर मुद्दा हा की, वसतरावाना मैफलीच्या व्यासपीठावरून रंगमंचावर खेचण्याचे प्रयत्न त्याच्या निधनानतर तरी कमी व्हावेत.

खंत या गोष्टीची वाटते की, महाराष्ट्रानं वसतरावाच्या गायनाचा भरपूर लाभ करून घेतला नाही. मात्र या मुद्द्याचा सदर्भ जरा वेगळा आणि काहीसा तिरकस आहे बडे गुलाम अलीच्या महाराष्ट्रातील अवतरणाच्या आधी वसतरावानी पजाबी शैलीच गाणं मराठी श्रोत्याना ऐकवायला सुरुवात केली होती. त्या गाण्याच चलन अतिबिकट आणि तितकच मनोहारी होत. या ढंगातून त्यानी सादर केलेले ठुमरी, दादरा, गझल हे गीतप्रकार ऐकताना श्रोत्यानी एक आगळाच संगीत-साक्षात्कार लुटलेला आहे. 'बान जिया मे लागी' हा दादरा त्यांच्या दूरदर्शनवर झालेल्या मुलाखतीत म्हटला होता, त्याची आठवण येते. ती अशासाठी की, गाताना मुखावरील भावदर्शन करण्याची त्याची जी हातोटी होती ती फक्त तिथच पाहायला मिळेल. ठुमरी, दादरा यासारखे गीतप्रकार 'भुवई, मान, हात' यांच्या नाटचमय उपयोगानं खुलवण्याच त्याचं जे खास वैशिष्टच होत ते फार कमी गायकांमध्ये पाहायला मिळत. भावुकता, फिरत, आड–कुआड, नाटच, अभिनय आणि गायनातील भावबीजाच साहित्यिक स्तरावर आकलन हे सर्व त्याच्या गायनाचे सौंदर्यविधायक अलकार. गाणं त्यांच्याकडं दुथडी भरून वाहत होतं; पण महाराष्ट्राच्या बाहेर ते 'तितकं' पोहोचू शकलं नाही. तसं झालं असतं तर महाराष्ट्राची शान वाढली असती. याची वरवरची कारणं दिसतात ती अशी की, त्यांच्या बहुसंख्य अशा ध्वनिमुद्रिका झाल्या नाहीत, आकाशवाणीवर त्याना स्थान देण्यात आलं नाही, दूरदर्शननही बरंचसं दूरच ठेवलं. थोडासा न्याय तिथं मिळाला; परंतु नाटचसगीताच्या संदर्भात कुणाला हे आकळलेच नाही की अरे, हे अजस्र गाण जपून ठेवलं पाहिजे. आमची ही मराठी शान भारतभर पोहोचली पाहिजे. वसंतरावाना गायक म्हणून ख्याती मिळण्यासाठी या संपर्कसाधनाची फार आवश्यकता होती. त्याना नाटकात अडकून पडाव लागलं. दौरे, जागरणं यातून या संगीतसिंहाची शक्ती नको तिथं खर्च होत गेली; पण हे असंच काही चटका लावणारं व्हायचं होतं.

राहून राहून दु:ख या गोष्टीचं होतं की, मराठी सुगमसगीताला नवं वळण देण्यासाठी लागणारं मूलधन वसतरावाजवळ होतं याची जाणीव (ऑफ ऑल दि पर्सन्स) आमच्या संगीतदिग्दर्शकांनाही झाली नाही. तस झालं असतं तर आमचं मराठी सिनेगीत आज हिंदी सिने-गीतांइतकंच श्रीमत झालं असतं. आपल्या सिनेगीताच चटकन लक्षात भरणारं वैशिष्टच म्हणजे विविधतेचा अभाव टेंबे, मास्टर कृष्णराव, भोळे याच्याच पठडीवर अजून आपण चाललो आहोत. हिंदी सिनेगीतात तीन मिनिटात नुसती चैनच चैन असते. लयीच्या सौदर्याचे विलोभनीय प्रकार, एकेका रागाचे विविध सौंदर्यभेद! ही गीतं वेगळ्या जगात आपल्याला घेऊन जातात! पंजाबी, पूर्वी सर्व इथं पाणी भरत असतं. एकेका सगीतदिग्दर्शकावरून जीव ओवाळून टाकावा असं वाटत राहतं. सर्वसाधारणपणे पाहिल तर आपलं सिनेगीत अजून देवघरात, माजघरातच आणि फार तर फडात आहे. दिवाणखान्यात, अंत:पुरात, रानावनात अजून पोहोचलेलं नाही. यासाठी लागणारी इहवादी वासनेची खुमारी वसतरावाच्या गायनात होती. त्याच्या ठुमरी–टप्पा–दादऱ्यात होती. सामान्य श्रोत्यांचं जाऊ द्या; पण 'अनुकरणप्रिय' सगीतदिग्दर्शकाचं काय? वसंत फुललेला होता, बहार आलेला होता; परंतु प्रयोगशील मराठी रसिक-समाज मात्र त्याचा उपयोग करून घ्यायच विसरून गेला होता!! वसतरावाच्या प्रथम पुण्यस्मरणाच्या प्रसंगी दाटणारे हे भाव व त्यातली खत कधी संपणारी नाही! □

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# स्वप्नांची भागीदारी

कुठे तरी दोन–चार दिवस रहाण्याच्या सहलीला गेल की कॉलेजमधली माझी मैत्रिण म्हणायची आज सकाळी उठल्यावर किती प्रसन्न वाटतय ! रोज सकाळी आपण साखरझोपेत असताना आई कटकट कटकट करून, रागावून आदळआपट करत उठवणार. आपण छानपैकी गाणं गुणगुणत, दात घासून, मस्त चहा घ्यावा म्हणावं तर आई रागानं विचारणार कालच्या शिळ्या पोळ्या उरल्यात त्या डब्यात नेणार आहेस का चिवडा करू पोळीचा ? मग काल उशीरा आल्याबद्दल उलटतपासणी होणार. इतकं सकाळी सकाळीच उदास वाटायला लागतं ना, की दिवसाची चवच निघून जाते. आज आपण मस्त गप्पा मारू या चहा पिता पिता.

चौदा–पधरा वर्षांच्या पुढ मुलं गेली की, पालकाच्यात आणि मुलाच्यात ही दरी निर्माण व्हायला लागतेच. त्यामुळे मुलांशी बोलायच ते त्यांच्या बेजबाबदार वागण्याविषयी हजेरी घेणारच बोलायचं असंच संवादाच स्वरूप हळूहळू व्हायला लागतं. विशेषतः मुलींच्या बाबतीत पालकाच्या मनावरचा ताण समजू शकतो मला. वाढत्या वयाची, फुलू लागणारी मुलगी संध्याकाळी उशीरा घरी आली तर आईवडलाच्या हृदयाचे ठोके आधीच वाढलेले असतात ते आणखीच जलद पडू लागतात. मग ती खरच काही चागलं करण्यात गुंतलेली असली तरी ते समजून घेण्याइतका धीर नसतो.

मुलाच्याही वागण्यावर साहजिकच याचा परिणाम होतो. आपल्या आईवडिलांना आपल्या मनाचा,आपल्या आनंदाचा, आपल्या आवडीचा काहीही पत्ताच लागत नाही. सदानकदा आपले ओरडतच असतात म्हणून मुलंही हळूहळू गमतीजमती सांगेनाशी होतात. घुमी होतात.

पहिली–दुसरीत शाळेतून आल्या आल्या आज ना आमच्या शाळेत– अशी सुरुवात करून काय काय मजा सागणाऱ्या बडबड्या मुलांचा, ह्या सांगण्याचा उत्साह आपल्याला टिकवता येईल का ?

अर्थात त्यासाठी मूल शाळेतून आलं की, हं मग काय झालं आज शाळेत, बाई काय म्हणाल्या, मित्र–मैत्रिणी कोण भेटल्या असं कटाक्षानं विचारण हा मार्ग नसतो. मुलाना लगेच वाटतं आई आपल्याला फारच पिळते आहे. दोन माणसामधल्या संवादाची हीच तर गंमत असते. नुसते प्रश्न विचारून त्यांची उत्तरं मिळवणं म्हणजे सवाद नव्हे आणि उत्तरं मिळतीलच ही तरी खात्री कुणी द्यावी ? माणसाला आपल्या मनातलं बोलावस वाटाव असं वातावरण निर्माण करणं ही फार कौशल्याची गोष्ट आहे. आपण मोकळेपणानं काही गोष्टी बोलण, सागणं हा एक मार्ग आहे; पण त्याचीही मर्यादा ओळखायला हवीच. आपल्याला अशी माणसे माहीत असतातच की जी दुसऱ्याला तोंड उघडू देत नाहीत अगदी. आपण बोलण आणि दुसऱ्याचं मनापासून ऐकण ह्या दोन्ही गोष्टींची गरज असते.

पालक शिक्षणाच्या भाषेत अशा ऐकण्याला active listening किंवा Sensitive listening म्हणतात. मूल जे सागत आहे त्यामागचा अर्थ समजून घेऊन तसा प्रतिसाद पालकाना देता यायला हवा. कधी मूल तोंडानं काही म्हणतही नाही; पण खाली मान घालून येत, बूट, चपला काढून आपटत, दप्तर फेकतं, कुठे तरी बघत उदास बसून राहतं. यात कुठेही शब्द नसतात; पण हे वागणं बरंच काही सांगत असतं आज काही तरी मनाविरुद्ध घडलेलं दिसतय ! मित्राशी-मैत्रिणीशी भांडण तर नाही ना झाल ? का बाई सर ओरडले ? मॅच हरलात की काय ? काय झाल आजच्या स्पर्धेंच ? अशा अनेक शक्यता पालकांना सुचायला हव्यात. त्या ऐवजी 'हे काय दप्तर कशाला फेकलंस ? उर्मटपणा वाढतच चाललाय तुझा. ठेव ते अगोदर जागेवर. ऊठ आधी' असं म्हटलं की झालं कल्याण !

कधी मूल मनातलं काही तरी सागण्याचा अर्धवट प्रयत्नपण करत असतं. त्यात कधी तक्रार असते, कधी स्वतःची फुशारकी असते, कधी एखादं मनोराज्य असत. आपण आपल्या मुलाचा बऱ्यापैकी अभ्यास केलेला असला तर त्याला खरं काय म्हणायचय ते आपल्याला बऱ्याच वेळा समजू शकत.

'मला ना आज वर्गातल्या सगळ्या मुली म्हणत होत्या तू सेक्रेटरी हो म्हणून' असं एकदा माझी मुलगी शाळेतून आल्यावर सांगत होती. खरं तर मला माहीत होत असं काही मुली वगैरे म्हणत नाहीत. बाईच सेक्रेटरी नेमतात; पण हे सांगणं हे तिच्या मनात काही महत्त्वाकांक्षा निर्माण होत असल्याचं लक्षण होतं. ती तिचं स्वप्न सांगत होती. तेव्हा मी तिला 'चल थापा नको लावूस. तुला कोण सेक्रेटरी करणार ? त्याला पहिला नंबर यायला लागतो. अभ्यास करावा लागतो. नुसत मांजराशी खेळून कुणी सेक्रेटरी नाही होत !' असं म्हणणं म्हणजे ती जो संवाद साधायचा प्रयत्न करत होती तो तोडून टाकणंच होतं. मी तिला म्हटलं,

'मुली म्हणत होत्या पण तुला वाटतं का ग आपण सेक्रेटरी व्हाव असं ?'

'हो वाटत की.'

'मग तू का नाही झालीस सेक्रेटरी ?'

'अग, पण बाईंनी त्या थतेलाच केलं ना सेक्रेटरी !'

'का बरं ?'

'ती ना अगं खूप हुशार आहे. पहिला नंबर येतो तिचा आणि गोष्टीपण सागते एवन.'

'मग बरं झाल की तिला सेक्रेटरी केलं ते. ती आता वर्गाला खूप गोष्टी सागेल.'

'मी पण आता गोष्ट सागणार आहे वर्गात.'

'कुठली सागशील ?'

'बिरबलाची'

'तुला मी आणखीपण नवीन गोष्टी वाचून दाखवीन. काय ? मग तुला रोज नव्या गोष्टी सांगता येतील वर्गात.'

'पण नंबराचं काय ग ? माझा नंबर खूप खाली आहे.'

'अग, तुला आता अभ्यासाची गोडी वाटायला लागलीय् की नाही? तुझा पण नंबर वर येईल हळूहळू. एकदम कसा पहिला येईल? आता रोज सकाळी बसतेसच की अभ्यास करत.'

'मी सहावीत गेले ना की मी सेक्रेटरी होईन.'

आभा नंतर खेळायला गेली. तिचा पहिला नंबर येईल की नाही, ती सेक्रेटरी होईल की नाही याला माझ्या दृष्टीनं महत्त्व नाही; पण काही तरी मिळवायचं तर काही तरी कष्ट घेऊन करावं लागेल हे तिच्या मनात उजाडतं आहे याचं मला महत्त्व वाटलं. चांगऱ्या कल्पना सुचणं ही त्या कल्पना प्रत्यक्षात येण्याची सुरुवातच असते आणि चांगली स्वप्नं डोळ्यापुढे असणं ही तसं होण्याची पहिली पायरीच असते.

मुलींच्या स्वप्नांमध्ये असं आपल्याला कायम सहभागी होता येईल का? मग लहानपणी ते स्वप्न सेक्रेटरी होण्याचं असेल, कदाचित क्रिकेटियर होण्याचं असेल, थोड्या मोठेपणी ते स्वप्न करिअर निवडण्याचं असेल, पुढे कदाचित् ह्या स्वप्नाचा ताबा कुणी प्रियकर किंवा प्रेयसी घेईल, मूल चांगलं वाढलं तर समाजातले प्रश्न सोडवण्याची स्वप्नं त्याला पडू लागतील, आपण पुढाकार घेऊन प्रश्न सुटत नसतात, लोकांसाठी काम करण्यापेक्षा लोकांबरोबर काम करावं लागतं हे त्याला–तिला कळत जाईल आणि ह्याच काळात काही स्वप्नं प्रत्यक्षात यायलापण लागली असतील.

मुलांच्या ह्या स्वप्नांमध्ये सहभागी होणं, आपल्याही स्वप्नांच्या चढउताराबद्दल त्यांच्याशी बोलणं हा कायमच्याच संवादाचा विषय राहायला हवा. मग उदास सकाळ उजाडणार नाही आणि घरातही चहा पिता पिता गप्पा होत राहतील. □

रंगभूमी

# 'शुक्–शुक'

## साराच शुकशुकाट!

वि. भा. देशपांडे

नाटकाला गर्दी खेचण्याचे जे अनेक मार्ग आहेत, त्यामध्ये प्रचंड जाहिरात हा एक महत्त्वाचा लोकमान्य मार्ग आहे! तशी जाहिरात वृत्तपत्रात बहुतेक सारेच नाटकवाले करतात; पण अद्याप त्यासाठी दूरदर्शनचा वापर (निदान नाटकवाल्यांनी तरी) केलेला नव्हता. तो 'शुक्–शुक' नामक नाटकाने म्हणजे त्यांच्या सस्नेह या संस्थेने केला. एका प्रायोजित कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांनी मुंबई दूरदर्शनवरून आपल्या नाटकाची जाहिरात काही नाट्यभाग दर्शवून केली. ती असंख्य मंडळींनी पाहिली असणार, त्यामुळे त्याचे कुतूहल चाळवले असणार आणि परिणामी नाट्यगृहात ते गर्दीने आले असणार निदान पुण्यात तरी पहिल्या प्रयोगाला आलेल्या प्रेक्षकांपैकी अनेकांच्या बोलण्यात दूरदर्शन जाहिरातीचा उल्लेख होता. यावरून आणखी एक गोष्ट ध्यानात येते, ती म्हणजे वृत्तपत्रांच्या वाचनापेक्षा दूरदर्शन पाहणाराचे प्रमाण किती तरी अधिक आहे!

दूरदर्शनवर नाटकाची जाहिरात करण्याचा पहिला प्रयत्न म्हणून या 'शुक्–शुक'चे नाव घेतले जाईल. दुसरा एक प्रकार त्यांनी जाहिरातीत केला तो म्हणजे वृत्तपत्रात–त्या ठिकाणी विनोदी नटांची, नाटककाराची मोठमोठी नावे घेऊन या परंपरेतले हे नाटक आहे असे लक्षवेधी ठळक टाइपात सांगितले. जाहिरात कोणी, कशी आणि किती करावी हा ज्या त्या निर्मात्याच्या दृष्टीचा, आर्थिक ताकदीचा प्रश्न आहे. अपेक्षा अशी की, त्या जाहिरातीच्या निमित्ताने जे काही आपण प्रेक्षकांना पाहण्यासाठी प्रलोभित करतो त्याच्याजवळपास तरी आपला नाट्यप्रयोग असावा; पण तसे घडले नाही. नाटक आरंभित झाल्यावर दहा–पंधरा मिनिटांच्या अवधीत ध्यानात आले की, हे नाटक आपण पूर्वी पाहिले आहे. पूर्वीचे नाटक म्हणजे 'ती पाहताच बाला' या नावाचे! ते नाटक गेल्या वर्षी शशिकांत निकते आदी मंडळींनी केलेले होते; पण ते काही प्रयोगांतच संपुष्टात आले. नवा निर्माता भेटल्यावर लेखक राजा पारगावकरानी तेच जुने नाटक नव्या नावाने आणि नव्या नटसंचात पुन्हा एकदा रंगमंचावर उभे केले. हा बदल करताना नाटककाराने (किंवा निर्मात्याच्या सूचनेवरूनही असेल) नाटकाचे नाव असे बदलले की, त्यातून ज्याला हवा तसा अर्थ काढावा. गम्मत अशी की, त्या नावाचा आणि नाटकाचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. केवळ चूष म्हणून नाव दिले असावे. त्या नावातून अर्थ काढायचेच म्हटले तर काढता येतील; पण तसा नाटकातही फार खोलवर भाग नाही.

हे नाटक कधी विनोदाच्या अंगाने तर बहुतांश फार्सिकल पद्धतीने लिहिले आहे. रहस्य आणि विनोद यांच्यातून नाटकाचे कथानक पुढे चालल्याचा भास होतो. काही लाख रुपयांची चोरी झाली आहे आणि तिच्या शोधात काही लोक आहेत त्यातली एक बाई एका घरात येते. त्या बाईवर घरातील मुलाचे आणि वडिलांचे लक्ष असते. दोघेही लग्नाची तयारी करीत असतात. त्यातच मुलीच्या प्रेमाचे वळण आहेच. लग्न घरीच लावायचे ठरते. भटजीला बोलावणे गेल्यावर तो येतो आणि लग्न लावण्याच्या निमित्ताने झालेला गोंधळ बराच वेळ चासलेला असतो. पैशाची चोरी आणि लग्नाचा गोंधळ यातच सारे नाटक फिरत राहते. यातली एक कल्पना जी आहे, ती म्हणजे एकाच बाईवर मुलगा आणि वडलांनी डोळा ठेवून लग्नाचा विचार करणे वगैरे. ही तर अभारतीय वाटणारी आहे. उगाचच मध्येमध्ये आपले काही संदर्भ आहेत, त्यात एक ययातीचा संदर्भ आहे; पण त्यामुळे मूळ कल्पनेचे उपरेपण काही कमी होत नाही. तशीच आणखी एक कल्पना उपरी किंवा उसनी वाटते. लग्नातला गोंधळ भटजीच्या लक्षात आल्यावर तो बेशुद्ध पडतो, तो मेला असे गृहीत धरून त्याची जी पळवापळवी चाललेली आहे ती पाहून 'जाने भी दो यारो' या चित्रपटातील कमिशनरचे प्रेत ज्या पद्धतीने हलवले जाते तो प्रसंग आठवत राहतो. अर्थात त्या चित्रपटातही तो प्रसंग अतिरेकी पद्धतीने वापरला आहे, तसाच याही नाटकात तो कमालीचा ताणला आहे. तसाच आणखी एक भाग म्हणजे बाबासाहेब या पात्राचा चष्मा हरवल्याचा प्रसंगही ताणलेला आहे. हे किंवा अशाच प्रकारचे जे लहानमोठे प्रसंग ताणलेले आहेत त्यातून हास्यनिर्मिती होण्यापेक्षा ते हास्यास्पद

अधिक झालेले आहेत.

या नाटकात काही सुसह्य भाग आहे तो रमेश पवार आणि भटजी झालेला मधू आंगणे यांच्या अभिनयाचा. रमेश पवार हा एक गुणी कलाकार आहे; पण त्याच्या कलागुणांना पुरेपूर वाव मिळेल अशा भूमिका त्याच्या वाट्याला येत नाहीत. त्यामुळे नेहमीच्या हसवण्याच्या युक्त्या वापरून घटकाभर करमणूक करण्याचा यत्न तो करतो; पण त्या गोष्टींनाही मर्यादा आहेत. मधू आंगणे याने भटजी मेल्यावर घेतलेले सोंग उत्तम वठलेले होते. प्रदीप दळवी, रवींद्र दिवेकर, ज्योती शेवडे, सुरेश टाकळे, शुभांगी रावते आदि कलाकारांनी आपापल्या भूमिका ठीक केल्या. दिग्दर्शक होते रवीन्द्र दिवेकर. त्यांनी एकच चांगली गोष्ट केली ती म्हणजे पात्रांच्या हालचाली यथाशक्ती गतिमान ठेवल्या; पण हे सारे प्रयत्न व्यर्थ जात होते किंवा माफक प्रमाणातच हसवीत होते, याचे कारण मूळ लेखन सुमार आहे. नाटकाचे नाव घेऊन बोलायचे तर 'शुक्–शुक्' म्हणून कुतूहलाने पाहायला गेलो आणि सारा शुकशुकाट पाहायला मिळाला. आता इतका सामान्य विनोद आवडणारा काही टक्के प्रेक्षक असतोच. तो अगदी सुमार किंवा टुकार विनोदाला अथवा विनोदी कृतीला हसतोच. त्यावरून हे नाटक लोकांना आवडते असा भाबडा समज करून घ्यायचा असेल तर ठीकच आहे !

◘

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने झिंबाब्वे आणि पोलंड येथील नृत्य-संगीताचे काही कार्यक्रम मराठी प्रेक्षकांसाठी केले गेले. त्यातला पोलंडमधील कलाकारांनी केलेला लोकनृत्य आणि लोकसंगीत यांचा एक कार्यक्रम गेल्या महिन्यात पुण्यात झाला. एक स्मरणीय प्रेक्षणीय कार्यक्रम असे त्याचे वर्णन करता येईल. हे कार्यक्रम केवळ पुणे–मुंबई ह्या नेहमीच्या शहरी न करता अहमदनगर, जालना आणि औरंगाबाद ह्या तीन गावी केले ही एक महत्त्वाची गोष्ट संचालक कमलाकर सोनटक्के यांनी केली.

□



# रशियन बहिष्कार

## खेळाडूंच्या प्रतिक्रिया

ठरल्याप्रमाणं लॉस एंजेलिस ऑलिंपिक २८ तारखेला सुरू झालं. यापुढचे १५ दिवस निरनिराळ्या खेळांतील खेळाडूंच्या विक्रमाने गजबजलेले रहातील. अर्थात रशिया आणि पूर्वजर्मनी, झेकोस्लोव्हाकिया, क्युबा इ. त्याच्या मित्रदेशांनी ऑलिंपिकवर टाकलेल्या बहिष्काराने लॉस एंजेलिस ऑलिंपिकचेच नव्हे तर संपूर्ण ऑलिंपिक चळवळीचे खूप नुकसान झालं आहे हे नाकारता येत नाही. बहिष्काराचा निर्णय आता जुना झाला असला तरी त्याचे परिणाम ऑलिंपिक सुरू झाल्यावरच खरे जाणवत आहेत. भाग घेणाऱ्या आणि न घेणाऱ्या खेळाडूंना तर हा बहिष्कार मोठ्या प्रमाणात जाणवतोच आहे. पण अमेरिकन लोकांना या बहिष्काराबद्दल काय वाटतं ?

'रशिया येवो वा न येवो, ऑलिंपिक आम्ही यशस्वी करून दाखवूच' असं उसनं अवसान अमेरिकन नेत्यांनी आणलं असलं तरी आपल्या वल्गनेतला फोलपणा त्यांनाही कळतो आहे. कारण कम्युनिस्ट खेळाडूंचं ऑलिंपिकवरचं वर्चस्व कोणीच नाकारू शकणार नाही. अर्थात रशियानं या धक्कादायक व आकस्मिक निर्णयाचे जे कारण दिले आहे ते मात्र अमेरिकेला मुळीच मान्य नाही. या कारणात रशियानं खेळाडूंची सुरक्षितता हा मुद्दा उपस्थित केला आहे; पण तो खोडून काढताना खेळाडूंच्या सुरक्षिततेसाठी आपण काय योजना केल्या आहेत याची यादीच अमेरिकेनं पुढं केली आहे. हजारो पोलिसांची नियुक्ती खेळाडूंच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आली असून सुमारे ८,००० कॉलेजविद्यार्थ्यांना कोठेही काही विपरीत प्रसंग घडल्यास त्याची ताबडतोब पोलिसांना माहिती देण्याचे काम सोपवण्यात आले आहे. सुरक्षाव्यवस्थेसाठी लॉस एंजेलिस ऑलिंपिक कमिटीने सुमारे १ कोटी पौंडांची तरतूद केली होती; पण अमेरिकन काँग्रेसने त्यात ५० लाख पौंडांची भर घालायचे आदेश दिले आहेत. शिवाय खेळाडू रहात आहेत त्या ऑलिंपिकनगरांभोवती तारेची कुंपणे घालूनही कडेकोट व्यवस्था करण्यात आली आहे. मॉस्को ऑलिंपिकच्या वेळेस रशियात जशी सर्वांच्या टूथपेस्टपासून सगळ्या सामानाची वारंवार तपासणी करण्यात आली तशी ही व्यवस्था नसेल कदाचित; पण ही व्यवस्था पुरेशी असल्याचे अमेरिकन सरकारचे मत आहे. अमेरिकेच्या मते रशियाला भीती वाटत होती ती निदर्शनांची आणि खेळाडू देशांतर करतील याची आणि असं काही होऊ देणार नाही अशी हमी द्यायला अमेरिकन सरकार अर्थातच तयार नव्हते.

अमेरिकेने १९८०च्या मॉस्को ऑलिंपिकवर रशियाच्या अफगाणिस्थानातील हस्तक्षेपाचा निषेध म्हणून बहिष्कार टाकला होता. त्याचा हा बदला आहे असे मत अमेरिकेच्या एका प्रसिद्ध साप्ताहिकाने व्यक्त केले आहे. त्यांच्या मते रशियाची प्रगती, त्यांचा दिमाख साऱ्या जगाला दाखवायची जो संधी ऑलिंपिकमुळे रशियाला मिळाली होती, ती अमेरिकन बहिष्कारामुळे हुकली. रशियन नेत्यांना आणि विशेषतः दिवंगत ब्रेझनेव्हना हा अपमान फार जिव्हारी लागला होता. त्याची या वेळेस परतफेड झाली. अर्थात जोपर्यंत युरी आंद्रोपोव्ह सत्तेवर होते तोपर्यंत रशियाचं धोरण सामोपचाराचं होतं; पण नंतर चेर्नेन्कोनी सूत्र हातात घेतल्यावर मात्र एकामागून एक अडचणी उपस्थित करायला सुरुवात केली. जेव्हा रशियानं कोरियाचं विमान पाडण्याचा प्रसंग मागच्या वर्षी घडला तेव्हा रशियन परराष्ट्रमंत्री आंद्रियो ग्रोमिको एका बैठकीत भाग घेण्यासाठी अमेरिकेला येत होते; पण अमे-

रिकेच्या स्थानिक नेत्यांनी त्याना विमानतळावर विमान उतरवू देण्यास नकार दिला. ग्रोमिको परत फिरले; पण या घटनेचाही परिणाम बहिष्काराचा निर्णय घेताना झालाच.

जिनिव्हामधील अण्वस्त्रावर मर्यादा घालण्याबद्दलच्या चर्चेतून रशियाने मधूनच अंग काढून घेतले. त्याच निर्णयाचा हा दुसरा भाग आहे असे अमेरिकेत मानलं जातं. रेगन प्रशासन सत्तेवर असेपर्यंत अमेरिकेशी बोलणी होऊ शकत नाहीत असं रशियाचं मत असल्याचही सांगितलं जातं. अमेरिकेच्या राज्यविभागातील एक अधिकारी तर या संदर्भात म्हणाला, 'रशियन सांगताहेत, ते इतके चिडलेले आहेत की ते आता आमच्याबरोबर खेळात सुद्धा भाग घ्यायला तयार न हीत.' असे निर्णय घेऊन रोनाल्ड रेगन याच या निवडणूकवर्षात राजकीयदृष्टचा जास्तीत जास्त खच्चीकरण करावं असा रशियाचा हेतू असल्याचा आरोपही अमेरिकनाकडून केला जातो.

अर्थात ही झाली अमेरिकेची बाजू. सोव्हिएट रशियाच्या निर्णयाने या दोन महासत्तांतील सबंध अधिकच बिघडले आहेत हे सत्य असलं तरी त्याला एकटा रशिया जबाबदार नाही. अमेरिकेनेही या आगीत भरपूर तेल ओतलं आहे. ऑलिंपिकसनदेत उल्लेख नसताना रशियन खेळाडूंनी अमेरिकेचा व्हिसा घ्यायला हवा असा आग्रह अमेरिकेनं धरला. रशियाच्या ऑलिंपिक चिटणिसाला हरकत घेण्याचा खोडसाळपणाही त्यानी केला. रेगन याचं एकूणच रशियाबद्दलचं दुराग्रही धोरणही या निर्णयाला कारणीभूत होतच; पण तरीही रशियानं घेतलेल्या बहिष्काराच्या निर्णयाच समर्थन होऊ शकत नाही एवढ निश्चित

या निर्णयाने रेगनसेह अनेक अमेरिकन नेते हादरून गेले. आतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीचे अध्यक्ष समराच यानाही जबर धक्का बसला. समराच यानी रशियाचं मन वळवण्याचाही प्रयत्न केला पण त्याना यश आल नाही.

अमेरिकन नेत्यानी मात्र रशिया व कम्युनिस्ट देशाच्या ( चीन व रुमानियाचा अपवाद ) अनुपस्थितीत ऑलिंपिक यशस्वी करण हा आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न बनवला आहे. ऑलिंपिक दिमाखात पार पाडणं त्याना जमेलही; पण दोन्ही बाजूचे खेळाडू मात्र या निर्णयाने खूपच निराश झाले आहेत. *ऑलिंपिक गाजवणार अशी ज्याच्याबद्दल* खात्री आहे तो कार्ल लुईस म्हणतो, 'मी भाग घेत असलेल्या प्रकारात ( १०० मी, २०० मी, लाब उडी, रीले ) रशियनाची मला स्पर्धा होती अस नाही; पण तरीही मी जिंकलो तरी रशियन्स नव्हते म्हणून मी जिंकलो असंच लोक म्हणणार ! लुईसची बहीण कॅरॉल तर रशियनाच्या अनुपस्थितीत ऑलिंपिकला खर ऑलिंपिक मानायला तयारच नाही. मागच्या वर्षीच्या जागतिक क्रीडास्पर्धा याच खऱ्या ऑलिंपिकस्पर्धा होत्या. हे ऑलिंपिक म्हणजे नुसती एखादी मोठी स्पर्धा म्हणता येईल' अस ती म्हणते. आपण इतकी वर्षं कसून मेहनत केली; पण आपल्याला खरे स्पर्धक लाभणार नाहीत आणि त्यामुळे विजेतेपदाचा निर्भेळ आनद मिळणार नाही याचं हे दुःख आहे.

रशियन गोटातील मनःस्थितीही फारशी वेगळी नाही. बहिष्काराचा निर्णय पहिल्यादा ऐकल्यावर रशियाचा मॉस्को ऑलिंपिकमधील सुवर्णपदकविजेता जिमनॅस्ट अलेक्झान्डर दित्यानिन तर स्तंभितच झाला. 'हे खरं नसेल अशी मी आशा करतो. नाही तर आम्ही इतकी वर्षं केलेल्या तयारीचा उपयोग काय ?' ही त्याची प्रतिक्रिया होती. हेलसिंकी जागतिक स्पर्धा गाजवलेल्या झेकोस्लोव्हाकियाच्या ३२ वर्षीय जर्मिला कार्तोचव्हिलोकोवा या धावपटूची सुवर्णपदक मिळवायची कदाचित ही अखेरची सधी होती, ती हिरावली गेली. आमच्या पाठीत खजीर खुपसला गेला आहे, ही तिहेरी उडीतील हॉपमन या खेळाडूची प्रतिक्रिया खूपच बोलकी आहे.

अर्थात राजकीय नेते खेळाडूंच्या भावनाकडे लक्ष द्यायच्या मनःस्थितीत नाहीत. खेळाडू देशाला बहुमान मिळवून देतात वगैरे ठीक आहे; पण राजकीय हितसबंध जेव्हा महत्त्वाचे ठरतात तेव्हा या खेळाडूना कोण विचारतो ? राजकीय नेत्यांच्या आदेशाचे निमूट पालन करून आपली इतक्या वर्षांची मेहनत पाण्यात गेलेली पहायचंच त्याच्या नशिबी येतं !

— सीमा कुलकर्णी


**उसानंतरची नवी लाट .... निलगिरी लाट**

अनिश्चित पाण्यावरही हमखास उत्पन्न देणारे
दणकट पीक .... निलगिरी !

या पिकाची सविस्तर माहिती देणारे मराठीतील पहिले पुस्तक

**निलगिरीची शेती**

किमत : रुपये पंधरा

**लेखक : विनायक पाटील**

पुस्तक मिळण्याची ठिकाणे—

**( १ ) नाशिक जिल्हा निलगिरी उत्पादक सहकारी संस्था, लि.**
सदीप अपार्टमेंटस्, त्रिबक रोड, नाशिक ४२२ ००२

**( २ ) राजहंस प्रकाशन, नागनाथपाराजवळ,**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

□

१५ रुपये म. ऑ. ने पाठवल्यास ट. ख. माफ.
पुस्तक रजि. पोस्टाने पाठवले जाईल.

चित्रपट

## सळसळत्या चैतन्याचा प्रत्यय

# बबलिंग स्प्रिंग

छोट्याशा इमीला तिच्या वडिलांनी गणित घातलं. दोन + तीन = किती ? बऱ्याच वेळा विचारूनही तिला आल नाही. तिच्या वडिलांनी तिला काळोख्या खोलीत डाबून ठेवलं दोन-तीन वेळा असच घडलं. नंतर एकदा शाळेत बाईंनीही अशीच एक बेरीज विचारल्यावर इमीनं आपणहून सांगितलं, 'मला येत नाही. मला काळोख्या खोलीत कोंडा. !'

हा प्रसग अनेक मुलांनी आपल्या लहानपणात अनुभवला असेल. या मुलीलाही अगदी लहान वयातच शिक्षेचा तडाखा बसलाय्. या शिक्षामुळे आपण कुणाला आवडत नाही, आपण कुणालाच नको आहोत, अशी भावना मुलाच्यात निर्माण होते आणि ती घुमी बनतात

काही मुलं विलक्षण हट्टी असतात तर काहीना इतराना त्रास देण्यातच मजा वाटते. काही जणं आपली चार-चौघासारखी असतात; पण मुलांच्या स्वभावाप्रमाणे त्यांना हिडिस-फिडिस न करता माया लावली, नि.स्वार्थीपणे प्रेम केलं तर तीही तितक्याच उत्कटपणे प्रेम करू शकतात. लहान मुलं प्रेमाला प्रेमानच उत्तर देतात, हे सत्य बऱ्याच कथा-कादंबऱ्यात, चित्रपटात हाताळल गेलंय्. 'बबलिंग स्प्रिग' हा चिनी सिनेमा अशाच निःस्वार्थी, निष्पाप प्रेमाचं दर्शन घडवणारा.

दूरदर्शनच्या राष्ट्रीय कार्यक्रमात पंधरा दिवसापूर्वी हा चित्रपट दाखवला गेला. बऱ्याच जणाना त्याची माहिती नव्हती तर काहींनी चिनी 'फिल्म' म्हणजे काही तरी डॉक्युमेंटरी असणार, अस वाटून जाणून-बुजून पाहिला नाही; पण त्यानी एक उत्कृष्ट चित्रपट गमावला अस वाटत.

आँट ताऊ ही सेवानिवृत्त शिक्षिका, तिची भाची आणि आसपासची १०-१५ लहानशी (३-४ वर्षाची) मुलं याचा हा चित्रपट. उपशीर्षके विशेष चांगली नसल्यानं दिग्दर्शक-अभिनेते याची नावं कळली नाहीत; पण त्यामुळं चित्रपटाच्या आस्वादात काहीच फरक पडला नाही चित्रपट पाहिल्यावर, ज्यानी हा पाहिला नाही त्यांना शब्दातून तरी याविषयी सांगावं असं प्रकर्षानं वाटलं.

हा चित्रपट विशेष आवडतो याचं एक कारण म्हणजे चेहरे फक्त चिनी. कथा आपल्या शेजारीच घडत असल्यासारखी वाटते. आई-वडील दोघही नोकरीला गेल्यावर, मुलाच काय? हा प्रश्न आपल्याला अपरिचित नाही. थोडी मोठी मुलं शाळेत जातात; पण ३-४ वर्षांच्या मुलासाठी या चीनमधल्या शहरातल्या एका नवीन वसाहतीत अजून बालवाडी सुरू झालेली नाही

मग काही मुलाना आई-बाप घरात *कोंडून ठेवून कामाला जातात तर काहीजण* बाहेरच दगामस्ती करत राहतात. आपल्या भाचीबरोबर राहणारी आंट ताऊ ही हाडाची शिक्षिका. शिवाय मुलावर हिचं विलक्षण प्रेम. ती या मुलांसाठी बालवाडी सुरू करते. बालवाडीसाठी जागा म्हणजे स्वतःचच घर. मुलाना घरात सर्वत्र मुक्त प्रवेश. मुलंच ती. ती भरपूर दंगा करतात, नासधूस करतात. ताऊच्या भाचीच्या अभ्यासात विघ्नं आणतात ही खर तर ताऊच्या सोबतीला म्हणून आई-वडिलांना सोडून ताऊकडे आलेली असते.

ताऊ मुलाच्यात इतकी रमते की, भाचीच्या संगीताच्या शिक्षणात तिला तितकासा रस राहात नाही. त्यामुळे भाची दुखावून घर सोडून निघून जाते. ताऊची अवस्था मोठी विचित्र होते. भाची तिला प्रिय असतेच; *पण मुलाची मायाही तिला सोडवत नाही.* ती आजारी पडते, म्हणून भाची घरी परत येते मुलाचं ते निर्व्याज प्रेम पाहून, तिलाही भरून येतं. मुलाच हे सळसळतं चैतन्य पाहून ती आपल्या संगीतपरीक्षेसाठी मुलाचा उत्साह 'बबलिंग स्प्रिंग' या 'सोनाटा' च्या रूपानं सुरात गुफते.

या चित्रपटात एक वाक्य आहे- 'ही मुलं त्याच्या पहिल्यावहिल्या शिक्षकावर जीव तोडून प्रेम करतात.' खरं आहे. पहिलं वहिल सगळच प्यार तसा शिक्षकही प्यारा. लहान मुलाच्या शिक्षकाला त्याचा मित्र, आई, बहीण, सगळं व्हाव लागतं. ताऊ या मुलासाठी सर्व काही आहे आणि ती हे सगळ आहे ते प्रयत्नपूर्वक, जाणीवपूर्वक नव्हे, तर तिचा तो सहजस्वभाव आहे. तिनं बालमानसशास्त्राची पुस्तके वाचली नसतील; पण मुलाची नाडी तिला बरोबर पकडता येते. आईवेगळ्या इमीबरोबर ती संपूर्ण दिवस घालवून तिला बोलत करते तर दुसऱ्या एखाद्या हट्टी मुलाला समजुतीने वळणावर आणते.

चित्रपटात उपशीर्षक नसती तरी तो व्यवस्थित समजला असता. कारण शब्दाचे अर्थ माहीत असणे म्हणजे समजण नव्हे, तर मनावर त्याचा ठसा उमटण म्हणजे खरोखरी उमगणं. हा चित्रपट असा थेट आपल्या मनापर्यंत जाऊन पोचतो.

मला एक प्रसग विशेष आवडला. मुलं इमारतीच्या भितीवर चित्रकलेचे प्रयोग करतात. एक गंगंशा आई ताऊला सगळा दोष देते आणि तुझ्याकडे येणारी मुल हे करतात. माझा मुलगा असलं काही करणार नाही असे ठामपणे सागते वर पुरावा म्हणून मुलाला विचारते. (त्यानही चित्र काढलेल असतं) मुलगा सांगतो- हे चित्र इमीने काढल, ते तिच्या भावाने, अस म्हणून थाबतो आपल्याला वाटते- हा मुलगा निरागस नाही. पक्का डाबरट आहे. खोटं बोलायचे फायदे याला कळू लागलेले दिसतात; पण क्षणभराने उरलेल्या सगळ्या चित्राकडे बोट दाखवून तो अगदी विलक्षण अभिमानाने सागतो- आणि ही सगळी चित्र मी काढली.

आवर्जून सागावे असे अनेक बारीक बारीक प्रसग यात आहेत; पण सगळ्यातून एकच जाणवते हा चित्रपट असूनही यातली मुलं 'मुलं'च आहेत. त्याना त्याच पोरपण गमवाव लागलेले नाहीये. खरे तर मुलाना चित्रपटातही 'मूल' म्हणूनच दाखवणं अवघड नाही; पण आपल्याकडे मुलाच्या तोंडी न शोभणारे शब्द आणि कृती असतात. मुलाचे स्वाभाविक अडाणीपण, (हे अडाणीपण त्यांच्या वयाला साजेसेच) ते ताऊला पत्रे, भेटी पाठवतात तेव्हा दिसत. ताऊ विश्रांतीला समुद्रकिनारी गेलेली असते. या मुलांना तिला काही तरी पाठवायचं असत; पण मोठ्या कुणाची मदत न घेता ते स्वतः

चेच डोक लढवतात. एका मोठ्या खोक्यात या सगळ्या वस्तू घेऊन आपल्या घरी आलेल्या पत्रांवरची तिकिटे फाडून २०–२५ तिकिटे त्या खोक्यावर लावतात. पोस्टाने एखादी वस्तू पाठवण्यासाठी तिकिटे लागतात हे माहीत असण हेही त्याच्या दृष्टीने फारच झाले; पण पोस्टातली माणसे मात्र त्याची भरपूर टिंगल करतात. त्या वेळेला त्या मुलाच्या चेहऱ्यावर जो एक नाराजीचा, क्रोधाचा भाव दिसतो तो खरच बघण्यासारखा.

सर्व मुलांच्या या अभिनयामुळे त्याला अभिनय म्हणणसुद्धा खरे तर योग्य होणार नाही, इतकं ते सर्व वास्तव वाटते; पण ही सगळी बारीक डोळ्यांची, गोबऱ्या गालाची गुड. वस्ताद, लाजरी, लबाड मुलं, ताऊ आणि तिची भाची या सर्वांनी हा चित्रपट प्रत्यक्ष जगला आहे असेच वाटते.

लहान मूल कसही असल तरी छानच मुलांमुळे नकळत सगळ्या वातावरणात एक चैतन्य निर्माण होते आणि त्यामुळे कुठल्यांही ऋतूत सळसळता वसत फुललाय अस वाटल तरी त्यात नवल नाही. कर्णमधुर सगीत योग्य छायाचित्रण या सर्वांमुळे मनाला प्रसन्न करणारा असा हा 'बर्वलिंग स्प्रिंग'

□

# अगदी सुमार

## कमांडोज इन द ॲलर्ट रिजन

आपल्याकडे इंग्रजी चित्रपटाना एक हमखास असा प्रेक्षकवर्ग असतो. अशा प्रेक्षकाना इंग्रजी चित्रपटातली दणकेबाज मारामारी, 'जॉज' सारखी थ्रीलिंग दृश्य, उत्कृष्ट चित्रण या सगळ्याचं आकर्षण असतं. पाश्चात्य देशांत युद्धपटही बरेच निघाले. 'कमांडोज इन द ॲलर्ट रिजन' चित्रपट पहायला आलेल्याचा मात्र त्या बाबतीत बराच अपेक्षाभग होतो.

'कमांडोज' हा चित्रपट पाश्चात्यच असला तरी रशियन आहे. साहजिकच हॉलीवुडचे 'हमखास यशस्वी फॉर्म्युलाचे' चित्रपट आणि हा यात बराच फरक आहे. चित्रपटाचा विषय सैन्य आणि सैनिक याच्याशी संबंधित असला तरीही यात 'दणकेबाज' अस काहीही नाही. प्रत्यक्ष युद्धही नसल्यामुळे रणगाडे, विमानं याची धुमश्चक्रीही आपल्याला पहायला मिळत नाही. तर चार कमाडरांच्या शत्रूची रहस्य मिळवण्यासाठी, त्याच्या ठाण्याचा छुवा उडविण्यासाठी केलेल्या करामती पहायला मिळतात.

जाहिरातीच्या शब्दात सागायच म्हटलं तर, शत्रूच्या गोटाची तंतोतंत माहिती काढण्यासाठी असलेली 'इंटेलिजंट' अधिकाऱ्याची तुकडी शत्रूच किती सामर्थ्य आहे हे जाणून घेऊन ते खच्ची करण्याचं काम करणारी अशी ही तुकडी.

व्हिक्टर कॅसॅरोव आणि त्यांच्या हाताखालचे तिघे जण यांनी आपल्यावर सोपवलेली कामगिरी कशी पार पाडली याच चित्रण या दहा रिळाच्या चित्रपटात केलं आहे. चित्र रशियन असल्याने मूळ संवादही रशियनच असणार; पण इथं मात्र इंग्रजीत 'डब' केलेले असावेत. बहुतेक सगळे सवाद इतके घाईघाईनं आणि तोडावल्या तोडात म्हटले आहेत की, आपल्याला त्यातला एक शब्दही कळत नाही. (आधीच 'त्याचं' इंग्लिश आपल्याला शब्द न् शब्द कळणं कठीणच असतं.)

शिवाय, प्रसगही भराभर घडत नसल्यानं प्रसगातून अर्थ समजावून घेण तस कठीण जात. या चित्रपटाच आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, चित्रपटात एक–दोन गाणीदेखील आहेत. एरवी इंग्रजी चित्रपटातून गाणी आणि तीदेखील युद्धपटात अभावानच आढळतात अर्थात गाण्याचा आस्वाद आपण घेऊ शकत नाही. कारण गाणी रशियन भाषेत आहेत.

या चित्रपटात आणखी एक गोष्ट प्रकर्षानं जाणवली ती अशी की, इथला सघर्ष तुल्यबल नाही. हे चारही कमाडर अत्यत हुशार 'इंटेलिजट' असतीलही; पण त्याचा अर्थ असा नाही की, शत्रूकडचे लोक अगदीच बावळट आहेत. हा सामना सैनिकी अधिकारी आणि सामान्य नागरिक असा नसून सैनिकी अधिकारी विरुद्ध तितकेच हुशार, प्रशिक्षित सैनिकी अधिकारी असा आहे अस कुठ वाटतच नाही.

एक प्रसग वानगीदाखल- शत्रूच्या 'सपर्क कक्षात' एक अधिकारी फोनवर बोलत असतो. या कमाडरपैकी एक जण खिडकीतून हात घालून संपर्क तोडतो, कोपऱ्यात लपतो, दुसरा एक जण तिथं येऊन उभा राहिल्यावर त्याच्या पाठीमागून हळूच पसार होतो. आता ही चार्ली चॅप्लिन किंवा लॉरेल-हार्डी धर्तीची 'ट्रिक' वाटते. एखाद्या माणसावर किंवा फार–फार तर हवालदारावर याचा उपयोग करता येईल; पण शत्रूच्या ठाण्यातल्या एका जबाबदार अधिकाऱ्याच्या बाबतीत हे शक्य आहे काय ?

म्हणजे चित्रपटाचा सूर आमचे अधिकारी कसे हुशार आणि शत्रूचे कसे बावळट हेच सिद्ध करण्याचा आहे. आपल्या नायकाचं सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी दुसऱ्याला बलहीन ठरवणं हा एक अयशस्वी 'शॉर्टकट' आहे.

उलट शत्रूला आपण जितका जास्त बलवान दाखवू तितकं त्याच्यावरच्या विजयान आपलं सामर्थ्य अधिक प्रकर्षानं प्रकट होतं. अर्थात हा चित्रपट रशियन आहे हे लक्षात घेऊनच या गोष्टीकडे पहायला हवं

तर या अशा प्रकारच्या घटनामुळे चित्रपटातला रस कमी होतो. काही मारामाऱ्या तर अगदी अमिताभ–जितेंद्र धर्तीच्या आहेत. शिवाय छायाचित्रणाचाही विशेष कौशल्याने वापर करून घेतलेला दिसत नाही. बऱ्याचं विदेशी चित्रपटात, कॅमेरा हे हे एक प्रमुख पात्रच असत असं म्हणायला हरकत नाही; पण इथं मात्र घटना जशा घडतील तशा नुसत्या चित्रित करण्यात आल्या आहेत. कॅमेऱ्याचा कौशल्यपूर्ण उपयोग झाला असता तर कदाचित प्रसंग अधिक उठावदार झाले असते.

नाही म्हणायला, शेवटी गाण्याच्या जोडीला, अनेक छत्रीधारी सैनिक विमानातून भराभर खाली उड्या मारताना दिसतात, ते दृश्य उचावरून बघायला विशेष छान वाटतं; पण यापलीकडे, उत्कृष्ट वनराई, सुदर रस्ते इत्यादीच कथेच्या ओघातही कुठे दर्शन होत नाही.

त्यामुळेच 'गन्स ऑफ नॅव्हेरॉन' 'मॅकेनाज गोल्ड' 'ग्रेट एस्केप' अशासारख्या चित्रपटांची गोडी असलेल्या शौकिनाना हा चित्रपट कटाळवाणा वाटेल. या प्रमुख चार कमाडराची कामं चागली झाली असली तरी ते सर्व अभिनेते आपल्याला अपरिचित. असल्यानं अमक्याचा नवीन चित्रपट पाहिला हेही समाधान मिळत नाही.

— उज्ज्वला लेले

# राज्यसभा आणि विधान परिषदा पाहिजेतच कशाला ? : पृष्ठ ९ वरून

सध्या लोकसभेत इंदिरा काँग्रेस पक्षाचे दोनतृतीयांश सभासद आहेत; पण राज्यसभेत मात्र दोनतृतीयांशाला १० कमी पडत आहेत. तेव्हा नियुक्त्या करून घेण्याच्या प्रकारात सत्ताधारी पक्ष आपल्याकडे तोंडे असलेल्या वा असणाऱ्या व्यक्तींची वर्णी लावीत असल्याचा बराच बोभाटा झाला आहे. दोन्ही सभागृहात स्वपक्षाचे दोनतृतीयांश मताधिक्य झाले म्हणजे आपणास पाहिजे असतील त्या घटनादुरुस्त्याही करून घेता येतात.

तेव्हा चांगल्या उद्देशाने ठेवण्यात आलेल्या एखाद्या सुविधेचा असा दुरुपयोग केला जात असल्यास ती सुविधा नसली तरी चालेल असे वाटू लागणे स्वाभाविक म्हटले पाहिजे. तथापि अशा प्रकारातील खेद वाटण्यासारखी एक गोष्ट म्हणजे राष्ट्रपती वा राज्यपाल अशा गोष्टींना तयार होतात तरी कसे ? आणि अशामुळे राजकीय टीकाकार त्याना मग 'रबरी शिक्के' म्हणवू–हिणवू लागतात. त्यामुळे ह्या पदाच्या प्रतिष्ठेचे अलीकडे अवमूल्यन होऊन त्याच्याबद्दलचा आदरभावही कमी होऊ लागला आहे.

## दर दोन वर्षांनी होणारा खर्च

विधानपरिषदांचा जो सभासदवर्ग आहे त्याची निवडणूक चार प्रकारच्या मतदारसंघातून होते. त्या प्रांतातले विधानसभा–सभासद तेथील स्थानिक स्वराज्यसंस्था, प्रांतातील रजिस्टर्ड पदवीधरमंडळी आणि शिक्षकवर्ग हे ते चार प्रकार होत आणि नियुक्त केले जाणारे सभासद हा पाचवा प्रकार.

तेव्हा विधानसभेवरच नियुक्त आमदारांची संख्या वाढवून स्थानिक स्वराज्यसंस्था, रजि. पदवीधरमंडळी व शिक्षकवर्ग ह्यांचे प्रतिनिधी ( आधीच निवडून आलेले नसल्यास ) विधानसभेवरच नियुक्त करता येणे शक्य आहे शिवाय दुसरे असे की, ह्याच तिन्ही–चारी मतदारसंघांतल्या व्यक्तींना नागरिक म्हणून प्राथमिक मत असते व त्यांनी आपल्या मतदानाच्या हक्काने, आपणांस पाहिजे त्या उमेदवाराला उभे करून व मते देऊन विधानसभेवरच निवडून आणणेही शक्य आहे. एखाद्या शिक्षकाला, रजि. पदवीधराला किंवा स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या सभासदाला उमेदवार म्हणून विधानसभेसाठी उभे राहायला तत्त्वतः कोणती हरकत आहे ? म्हणजे शेवटी विधानपरिषदा चालू ठेवण्याचा व त्याच्या दर दोन वर्षांनी येणाऱ्या निवडणुकांचा खर्च तरी कायमचा टळेल.

घटनेच्या ३३३ ह्या कलमाने, राज्यपालांना, त्यांच्या प्रांतातील विधानसभांवर, अँग्लो–इंडियनांना प्रतिनिधित्व मिळालेले नसल्यास, त्यांचा प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार दिलेला आहेच. म्हणजे विधानसभा किंवा लोकसभा ह्या सभागृहांवरही, ह्या प्रकारे प्रतिनिधींची नियुक्ती ही काही एखादी नवी ठरणारी गोष्ट नाही. केंद्रीय पातळीवरही लोकसभेत अशी नियुक्ती राष्ट्रपती करू शकतात.

विधानसभा व विधानपरिषदा किंवा लोकसभा व राज्यसभा ह्यांच्या एकूण सभासदांची संख्या व त्या दोहोंतील फरक लक्षात घेता ह्या तथाकथित ज्येष्ठांकडून (Elders) व उच्च सभागृहांकडून (Upper Houses) राज्यशकट बरोबरीच्या जबाबदारीने चालविता येण्याची गरज व अपेक्षा मुळातच त्याच्याबाबत घटनेने बाळगलेली नाही हे कळून येऊ शकते. कारण–

लोकसभेच्या सभासदसंख्येच्या तुलनेने राज्यसभेची सभासदसंख्या साधारणपणे अर्धी (किंवा त्याहून थोडी कमीच) आहे, असते. त्याचप्रमाणे एखाद्या राज्याच्या विधानपरिषदेच्या सभासदांची संख्याही घटनेने मुळात त्यांच्या विधानसभेच्या एकचतुर्थांश इतकीच ठरविलेली होती. (कलम १७१). पुढे १९५६ मध्ये ह्या कलमाची दुरुस्ती (क्र. ७) करण्यात येऊन ती एकतृतीयांश, म्हणजे ज़रा जास्त करण्यात आली. तसेच–

जी गोष्ट सभासदसंख्येची तीच सभागृहाच्या कामाच्या दिवसांची. वर्षाकाठी लोकसभेचे अथवा कोणत्याही विधानसभेचे अधिवेशन तीन–चार वेळा मिळून जर १५० ते १७० दिवस चालू राहिले तर राज्यसभा व विधानपरिषदा यांचे कामकाज फक्त १२५ ते १४० दिवस चालू राहते. ही गोष्ट आकडेवारीने प्रत्यक्षातच सिद्ध होत आलेली आहे असे पहा की–

वर्षाकाठी सभागृहाच्या होणाऱ्या बैठकात अंदाजपत्रकी अधिवेशनाच्या वेळची बैठक जशी सर्वांत महत्त्वाची, तशीच सर्वांत जास्त दिवस कामकाज करणारी असते. केंद्रिय अंदाजपत्रक नेहमी फेब्रुवारीच्या २८ तारखेला सादर करण्यात येते. त्या आधी ८-१० दिवस रेल्वेचे अंदाजपत्रकही सादर केले जात असते अलीकडे त्यापूर्वी एक आर्थिक आढावाही घेण्यात येत असतो म्हणून केंद्रिय सभागृहाच्या बैठका जानेवारीअखेरीस किंवा फेब्रुवारीच्या प्रारंभी सुरू होतात व त्या मे महिन्याच्या मध्यापर्यंत चालू राहतात. याप्रमाणे लोकसभा या वेळी सुमारे तीन महिने काम करते; पण राज्यसभा मधेच मार्च-एप्रिलमध्ये सुमारे महिन्याभराची सुट्टी घेते. ही काय वरिष्ठांच्या कामकाजाची रीत ? हेच प्रमाण प्रांतिक पातळीवरही तेथील दोन्ही सभागृहांच्या बाबतीत पडते.

अशी दोन सभागृहे असल्यामुळे एक व्यावहारिक अडचणही अधूनमधून उत्पन्न होत असते. मंत्रिमंडळ हे सभागृहातील सत्ताधारी पक्षाच्या निवडक खासदार-आमदारातून बनविले जाते. त्यांच्यापैकी प्रत्येकजण ज्या सभागृहासाठी निवडून आलेला असतो त्या सभागृहात तो सामान्यतः बसतो; परंतु सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्याची गरज किंवा विधेयकवाचन, चर्चा इ दुसऱ्या गृहात निर्माण झाली की, त्याला तडक तिकडे धावावे लागते परिणामी त्याच्या खात्याच्या संबंधीचा प्रश्न चर्चेस निघताना संबंधित मंत्री जागेवर नसल्याचे प्रकार अनेकदा घडून येतात कारण मंत्री त्या वेळी (कामासाठीच) दुसऱ्या सभागृहात गेलेला असतो.

अशा परिस्थितीमुळे निर्माण होणारा व्यत्यय व विलंब लक्षात घेऊन, अनेकदा सभापतींना त्यावर ताशेरे झाडावे लागले आहेत. विरोधी आमदार–खासदारांनीही अशा परिस्थितीवर अनेकदा टीका केलेली आहे. अर्थात असे अडचणीचे प्रसंग उद्भवतात ते ह्या द्विदल

राज्यपद्धतीमुळेच. म्हणजे प्रांताला अथवा केंद्राला दोन कायदा सभागृहे असल्यामुळेच. कारण एकच सभागृह असणाऱ्या प्रांतांमध्ये ( अथवा केंद्रातही ) अशी अडचण निर्माण होऊ शकत नाही.

दिल्लीस राज्यसभा व प्रांतात सध्या ७ विधानपरिषदा आहेत. त्यांच्या सभासदांची एकूण संख्या ७७८ ( अनुक्रमे २४४+५३४ ) भरते. ह्या काही शेकडा व्यक्तींचे मासिक वेतन, त्यांचे दैनिक भत्ते व त्याशिवाय त्यांचे प्रवास व इतर सुखसोयींचा खर्च आणि ती सभागृहे चालविण्या–सांभाळण्यासाठी लागणाऱ्या विविध कर्मचारी-वर्गावरील खर्च इ. सारे टळल्यास ती बचत राष्ट्रहिताची ठरेल. ( आणि आता तेवढ्या सभासदांना तर निवृत्तिवेतनही असते ! )

राज्यसभा व विधानपरिषदा यांना मुळातच घटनेने इतके कमी आणि मर्यादित अधिकार दिलेले आहेत की, त्यामुळे ह्या उभय सभागृहांचा प्रत्यक्ष व सक्रिय उपयोग राज्यशकटाला फारसा होऊ शकत नाही व जनतेला होणारा उपयोग म्हणजे तिच्या अडचणी–अन्यायांबद्दल राज्यसभेचे व विधानपरिषदेचे खासदार, आमदार सभागृहात प्रश्न विचारू शकतात व चर्चाही करतात इतकाच. ही वरिष्ठ सभागृहे बरीच नामधारी वाटतात व त्यांचे कार्य वरपांगी व बाह्यात्कारी वाटते.

## अर्थविषयक विधेयके

ह्याची प्रत्ययकारी साक्ष घटनेच्याच काही संबंधित कलमांवरून पटते. विधानपरिषदांना लागू पडत असलेले बहुतेक सर्व नियम राज्यसभेबाबतच्या नियमांसारखेच आहेत. फरक फक्त बारीक–सारीक तपशिलाचा इतकेच. प्रथम आपण अर्थविषयक विधेयकांच्या ( Money Bills ) बाबतीत बघू या

घटना कलम १०९ स्पष्टपणे सांगते की, कोणतेही अर्थविषयक विधेयक प्रथम व मुळात राज्यसभा मांडूच शकत नाही ! तो अधिकार आहे फक्त लोकसभेला. तिने मांडलेले अर्थविषयक विधेयक नंतर ती राज्यसभेकडे तिच्या शिफारसीसाठी पाठवील व ते पोहोचल्यापासून केवळ १४ दिवसांच्या आत राज्यसभा स्वतःच्या शिफारसी लोकसभेला कळवील. लोकसभा, राज्यसभेच्या शिफारसी व (असल्यास) दुरुस्त्या एक तर स्वीकारील अथवा ती त्या संपूर्णपणे नाकारीलसुद्धा ! (म्हणजे ज्येष्ठाचा मान कितीसा राहिला? त्याहीपेक्षा विशेष म्हणजे त्यांचा सल्ला किती किंमतीचा व महत्त्वाचा ठरला ?) आणि राज्यसभेच्या शिफारसी–दुरुस्त्या लोकसभेने नाकारल्या तरी, तिने मुळात सदर विधेयक ज्या स्वरूपात संमत केले असेल, तसेच ते दोन्हीही सभागृहांनी संमत (पास) केले आहे असे ती समजू शकेल !

त्याचप्रमाणे राज्यसभेस दिलेल्या त्या १४ दिवसांच्या मुदतीत तिच्याकडून शिफारसी इ. न पोहोचल्यास ते विधेयक लोकसभा, त्याच्या पहिल्या अवस्थेप्रमाणेच दोन्ही सभागृहांनी संमत केले आहे असे मानील ( व मग ते राष्ट्रपतींच्याकडे पाठविण्यास मोकळीही होईल ! ) शिवाय अर्थविषयक विधेयकांच्या बाबतीत कोणत्याही स्थितीत दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक, विचारविनिमय आवश्यक वाटला तरी होऊ शकत नाही ! ( कलम १०८ ).

इतर विधेयकांच्या बाबीतही बराचसा असाच सापत्नभाव दिसून येतो. अर्थविषयक विधेयकांखेरीज इतर विधेयकांबाबत घटनेच्या कलम १०७ मध्ये असे म्हटले आहे की, एखादे विधेयक राज्यसभेत पडून असेल; पण ते लोकसभेने संमत केलेले नसेल तर ते लोकसभा बरखास्त ( desolve ) झाली तरी बारगळत ( Lapse ) नाही; पण याच्या उलट एखादे विधेयक लोकसभेत पडून असेल किंवा तिने ते संमतही केलेले असेल; पण ते राज्यसभेत मात्र पडून राहिल्यास लोकसभेच्या बरखास्तीबरोबर बारगळते ! आणि ह्या सर्व गोष्टी प्रांतिक पातळीवर विधानसभा व विधानपरिषदा यांच्या बाबतीतही कलमे १९६ ते १९८ अनुसार तशाच लागू पडतात. ( फक्त मुदती कमी-जास्त आहेत एवढाच फरक. )

म्हणजे असे की, विधानपरिषदेने एखादे विधेयक ( अर्थात अर्थविषयक नव्हे ) नामंजूर केले किंवा ते तिच्याकडे आल्यापासून तीन महिने झाले तरी तिने ते संमत केले नाही अथवा विधानसभेने न सुचविलेल्या नव्या दुरुस्त्या तिने सुचविल्या तर विधानपरिषदेच्या तशा कारवाईवर सरळ बोळा फिरवून ( अथवा जास्त न थांबता ) विधानसभा पुढे जाऊ शकते ! आणि आपण आपल्या अधिकारात घेतलेला निर्णय नंतर विधानपरिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवू शकते व तसे केल्यावर विधानपरिषदेने वरीलप्रमाणे काही केले तरी विधानसभा ते विधेयक, विधानपरिषदेस बाजूस सारून स्वतः सरळ संमत करून टाकू शकते ! तेव्हा जर अशी घटनात्मक स्थिती आहे तर मग ज्यांच्या कार्याला परिणामकारकता नाही अशा विधानपरिषदा ( व राज्यसभाही ) दिखाऊ म्हणून पाहिजेतच कशाला ?

अर्थविषयक विधेयकाबाबतही बव्हंशी अशीच स्थिती आहे. ती विधेयके प्रथमतः मांडण्याचा अधिकार राज्यसभेप्रमाणे विधानपरिषदांनाही नाही. विधानपरिषदा १४ दिवसांत त्यावर शिफारसी करू शकतात. अर्थविषयक विधेयक विधानपरिषदांना फेटाळून लावण्याचा अधिकारही नाही. त्यांनी केलेल्या शिफारसी पूर्णतः वा अंशतः स्वीकारणे विधानसभांवर बंधनकारक नाही. उलट अशा कोणत्याही शिफारसी वा दुरुस्त्या (असल्यास) त्या डावलून विधानसभा ते विधेयक संमत करू शकतात.

हे तपशीलवार विवेचन करण्याचा उद्देश इतकाच की, देशाविषयीच्या आर्थिक-व्यवहारात ह्या ' उच्च सभागृहाला ' खुद्द घटनेने व घटनाकारांनीच कोणतेही अधिकार दिलेले नाहीत (प्रांताच्या आर्थिक व्यवहारांत विधानपरिषदांना ). तेव्हा ती सभागृहे–अशी कुचकामी, तकलुपी व नुसती शोभेची हवीतच कशाला ? नष्टच केली तर केवढा व्याप व खर्च वाचेल, ह्याचा सखोल विचार वाचक–नागरिकांनी करावा. प्रांताला अथवा केंद्राला एकच कायदेमंडळ असले तरीही चालू शकते हेही आपण पाहिले एकच कायदेमंडळ असल्यास राज्यशकटाच्या कारभाराला सुटसुटीतपणा, सुसूत्रता व एकसंधपणाही येईल. मात्र ह्या कामी राजकीय डावपेच, सत्ता हाती ठेवण्याची सुप्त आकांक्षा आणि व्यक्तिपक्षाचे स्वार्थ अशा गोष्टींचा खेळ आजच्याप्रमाणे मुळीच खेळला जाऊ नये.

□

# बंडखोर आणि वसंतदादा

पृष्ठ ७ वरून

झाली; परंतु ती वरवरची होती. वसंतदादांना सपवण्यासाठी मग त्यांना खासदारकीचे तिकिट देऊन त्यांचा राज्यातील सपर्क तोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांना सरचिटणीसपदाचे (कांग्रेसपक्षाच्या) मधाचे बोट लावून दिल्लीत जास्तीत जास्त अडकवण्याचा. प्रयत्न करण्यात आला. अंतुले व त्यांच्या शागीर्दाकरवी वसंतदादांचे सांगली परिसरातील साम्राज्य खिळखिळे करण्याचा प्रयत्न झाला. अंतुल्यांना त्यांच्या करणीमुळे मुख्यमंत्रीपदावरून जावे लागल्यावर मग वसंतदादांना मुख्यमंत्री न करता कार्यक्षमतेचा अभाव असणाऱ्या व अनभिज्ञ अशा बाबासाहेब भोसल्यांना मुख्यमंत्री करण्यात आले. त्यांच्या राज्यात सावळागोंधळ माजल्यावर मग नाइलाजास्तव वसंतदादांना मुख्यमंत्रीपदी आणण्यात आले; परंतु त्यांना निर्धोकपणे राज्य करता येऊ नये व त्यांचा वरचष्मा प्रस्थापित होऊ नये म्हणून मग आदिक व असीर ही दोन खोडे त्यांच्या पायात अडकवण्यात आली. तेव्हापासून अंतुले, काळे, आदिक, भोसले यांच्या मुख्यमंत्रीविरोधी कारवायात आजतागायत खंड पडलेला नाही. वरून आशीर्वाद असल्यावर त्यांना कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नाही. कारण वसंतदादांपेक्षा हायकमांडचा काळे, भोसले, अंतुले, आदिक या चौकडीवर जास्त विश्वास आहे. या चौकडीस जनमानसात फारसे स्थान नसले तरी ते निष्ठावतांपैकी आहेत इंदिरा गांधींच्या प्रतिकूल काळात ही चौकडी त्यांच्याशी एकनिष्ठ राहिल्याने ते त्यांची किंमत मागणारच. याउलट वसंतदादा व त्यांचे साथीदार १९७८ मध्ये इंदिरा गांधींना सोडून गेल्याने हायकमांड त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास तयार नाही. केवळ एक तडजोड म्हणून त्यांना (वसंतदादांना) मुख्यमंत्रीपद देण्यात आले. तेव्हा त्यांना सुखासुखी राज्य करू देण्यात येणार नाही. रामराव आदिक हवाईप्रकरणानंतर ज्या चौदा मंत्र्यांनी त्यांच्या अश्लाघ्य वर्तनास पाठिंबा देणारे पत्रक काढले त्यांच्या विरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल, वेळप्रसंगी मंत्रिमंडळातून काढले जाईल असे वाटत होते. परंतु त्यातील बहुतेक मंत्री चंद्रकांत त्रिपाठी वगैरे निष्ठावतांपैकी निघाल्याने त्यांच्याविरुद्ध काहीच कारवाई झाली नाही व एक प्रकारे त्यांना उत्तेजनच देण्यात आले. खरे पहाता रामराव आदिक यांच्या बेताल वर्तनाबद्दल त्यांना मंत्रिमंडळातूनच नव्हे तर पक्षातूनही हाकलून द्यावयास हवे होते; परंतु निष्ठावंताने काहीही केले तरी खपवून घेतले जाते. आदिक, भोसले यांचे जनमानसातील स्थान पहाता त्यांना उपमुख्यमंत्री-मुख्यमंत्रीपदासारखे महत्त्वाचे स्थान देणे कितपत उचित होते, हाच वादाचा मुद्दा होऊ शकतो. आदिक कधीही कोणत्याही निवडणुकीत निवडून आलेले नाहीत. एक वंडेल उमेदवार म्हणून त्यांची ख्याती आहे तर बाबासाहेब भोसल्यांचा 'विनोदी बाणा' आता लोकांना माहीत झाल्याने ते पुढील निवडणुकीत निवडून येण्याची शक्यता फार कमी आहे. बाबुराव काळयांची तीच परिस्थिती आहे. इंदिरालाटेतही त्यांचा माणिकराव पालोस्करांनी पाडाव केला होता आणि अंतुलेमहाशयांबद्दल काय सांगावे? प्रतिभा प्रतिष्ठानसंबंधीचा खटला त्यांच्यावर चाललेला असतानाही, वेळात वेळ काढून ते मुख्यमंत्री विरोधी कारवायांत भाग घेऊ शकतात या माणसाच्या कार्यक्षमतेचे मला नेहमीच कौतुक वाटत राहिलेले आहे. अंतुल्यांना जरी ते काहीही दावा करत असले तरी श्रीवर्धन मतदारसंघाबाहेर कोणी वाली नाही; परंतु काळे, आदिक, भोसले यांच्या तुलनेत ते नक्कीच लोकप्रिय आहेत, अंतुल्यांनी आपल्या महत्त्वाकांक्षेस मुरड घालून जर थोडा संयम दाखवला असता तर ते अजूनही मुख्यमंत्रीपदी राहिले असते व साखरकारखानदारांच्या वर्चस्वास लगाम घालण्यात नक्कीच यशस्वी आले असते.

महाराष्ट्रातील बंडखोरांचा गुंता वसंतदादांनी सोडवायचा आहे. शंकरराव चव्हाणांना नियोजन-मंत्रिपदातून मुक्त करून काही काळ जो धाक वसंतदादा व त्यांच्या साथीदारांना दाखवण्यात आला आहे त्यात काही तथ्य नाही. कारण निवडणुका तोंडावर आल्या असताना वसंतदादांना हलवणे म्हणजे स्वतःच्या पायावर आपणच धोंडा पाडून घेण्यासारखे आहे हे हायकमांडला चांगलेच माहीत आहे शंकरराव शिस्तप्रिय असतील; परंतु कांग्रेस पक्षातील बंडखोरी व अस्थिरता (महाराष्ट्रात) त्यांच्याच कारकीर्दीपासून जोमात आली असे गतेतिहास सांगतो. त्यांच्यापूर्वी वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना एवढी अस्थिरता व बंडखोरी कधीच पहावयास मिळाली नाही तेव्हा अशी पार्श्वभूमी असणाऱ्या शंकररावांना मुख्यमंत्री म्हणून अशा क्रायसिसमध्ये आणण्याची अदूरदर्शी खेळी श्रेष्ठी खेळतील असे वाटत नाही. मात्र वसंतदादा हे शरद पवारांना मिळतील अशी भीती श्रेष्ठींना वाटत असेल तर मग शंकररावांना आणावे लागेल; पण त्यामुळे नाइलाजाने वसंतदादांना पवारांच्या कँपमध्ये जावे लागेल व त्याला हायकमांडच जबाबदार राहील! शिवाय राज्यातील मुख्यमंत्री वारंवार बदलल्याने काय दुष्परिणाम होतात त्याचा योग्य धडा कांग्रेसला आंध्रातील जनतेने शिकवला आहे तेलगू-देसमच्या प्रचंड विजयास कांग्रेसची ही आगळीकच प्रामुख्याने जबाबदार होती. महाराष्ट्रातही कांग्रेसच्या या धोरणास धडा शिकवण्याच्या पोझिशनमध्ये शरद पवार आहेत. त्यांना वसंतदादा जाऊन मिळाल्यास ते इंदिरा कांग्रेसला नेस्तनाबूत करू शकतील. शरद पवार हे एन टी. रामाराव इतके प्रभावी नसले तरी इतर विरोधी पक्षांशी, विशेषत: भाजपशी ते यशस्वी समझोता करू शकले तर महाराष्ट्रात ते कांग्रेसच्या नाकी नऊ आणू शकतील, याची जाण इंदिराजींना असल्यानेच वसंतदादांना हात लावताना त्यांना दहा वेळा विचार करावा लागेल!

अर्थात महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, इंदिराजींचा कँप सोडण्याचे धैर्य वसंतदादा दाखवतील का? याचे उत्तर सध्या तरी नाही असेच द्यावे लागेल. १९७८ सालची गोष्ट वेगळी होती. आणीबाणीच्या पार्श्वभूमीमुळे इंदिराजी व त्यांचा पक्ष बदनाम झाला होता आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे इंदिराजींचा पक्ष सत्तेवर नव्हता. वसंतदादा मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांना अपमानित करण्याची एकही संधी हायकमांडने सोडली नाही! दर वेळेस बंडखोरांनी शिस्तभंग केल्यावर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल अशी डरकाळी वसंतदादांनी फोडली; परंतु दिल्लीश्वरांनी कडक कारवाईस अनुमती नाकारल्यावर, ते आपला अपमान समजून, मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याचे धैर्य त्यांनी दाखवले नाही! अंतुले, काळे, आदिक, भोसले यांच्या या कारवाया अशाच चालणार, त्यांना अंत नाही! कारण हायकमांडची त्यांना भीती वाटत नाही. एक वेळ वसंतदादांना जावे लागेल; परंतु या चौकडीवर कारवाई होणार नाही! कारण ते निष्ठावंत आहेत शिवाय ते पक्षातून फुटून निघण्याचीही भीती नाही. कारण जनमानसातील त्यांची प्रतिमा पहाता त्यांना कोण जवळ करणार आहे? प्रश्न आहे तो वसंतदादांचा! ते किती वेळ असे अपमानित जिणे सहन करणार आहेत त्या सहनशक्तीचा. यदाकदाचित पुढील निवडणुकीत इंदिरा कांग्रेस पक्ष महाराष्ट्रात विजयी झाला तर पुढील मुख्यमंत्री वसंतदादा नसणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे, हे वसंतदादा व त्यांच्या साथीदारांनी नीट लक्षात ठेवलेले बरे! ☐

# नाट्यपंढरी



## □ नाटकी मरण

जीवन आणि मरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या तत्त्वज्ञानाचा उलगडा नाटकात चटकन् होतो. कारण नाटकात मेलेला माणूस जीवंतही असतो. बेबंदशाही नाटकात हालहाल करून मारलेला संभाजी दुसऱ्या दिवशीच्या प्रयोगात दिसतोच. इतकेच काय, लागोपाठ दोन खेळ असले, तर संध्याकाळी मेलेला संभाजी रात्रीच्या प्रयोगात वाक्या–वाक्याला टाळ्या घेत असतो. कालच्या 'एकच प्याला'तला सिंधू-सुधाकराचा मृत्यू प्रेक्षकांना आसवं गाळायला लावतो हे खरे! पण तीच सिंधू दुसऱ्या दिवशी स्वयंवरात रुक्मिणी म्हणून 'दादा ते आले ना?' या चार शब्दांनी प्रेक्षकांना मोहवून टाकीत असते.

गडकऱ्यांना मृत्यूचे भयंकर आकर्षण. (म्हणूनच तर मृत्यूने त्यांना अवचित गाठले नाही ना?) त्यांच्या प्रत्येक नाटकात दोन-तीन तरी मृत्यू आहेतच. भावबंधनातच फक्त स्मशानावर भागले आहे. मरण सोपे नाही असे आपण सर्वच म्हणतो; पण नाटकात मरणं ही फार कठीण गोष्ट आहे अहो, एक पात्र मरून पडल्यावर, दुसऱ्या पात्रांची भाषणे चालू असतात. कधी गाणंही असते. (म्हणजे मरून पडलेल्या पात्राचे मरणच!) प्रदीर्घ स्वगत असते. इतका सारा वेळ गुपचूप पडून राहायचं म्हणजे साक्षात मरणच नाही का? अशात चुकून खोकला आला, तर मरणाचं हसं व्हायला कितीसा वेळ लागणार? आणि नाटकात काम करताना खरे मरण आलं तर? अहो, ते सुद्धा या मराठी रंगभूमीवर घडले आहे!

'राजापूरकर नाटक मंडळी'चे तुकाराम हे पेटन्ट नाटक. हातखंडा खेळ. त्यांच्यासारखे तुकाराम कुणालाच जमले नाही. या नाटकाची अपूर्वाई अशी की, या नाटकाच्या उत्पन्नावर कंपनीचे मालक बाबाजीराव राणे यांनी कल्याणला तुकाराम नावाचे थिएटर बांधले; पण योग पहा कसा विचित्र-बाबाजीरावांचा मृत्यू त्याच नाटकात झाला! प्रसंग असा की, शिवाजीराजांकडून तुकाराम महाराजांकडे नजराणा येतो. त्यात दाग–दागिने, उंची वस्त्रे असतात. बाबाजीराव त्या नाटकात तुकारामांच्या पत्नीचे–जिजाऊचे काम करीत असत. ती भेट पाहून जिजाऊ हर्षभरीत होते. बाबाजीराव तो प्रसंग फारच सुरेख रंगवीत असत. एक दिवस, ते त्या प्रसंगात रंगले असता–हसता हसताच त्यांना मृत्यूने गाठले नि ते क्षणात स्टेजवरच कोलमडले. (१९१३)


नागेश जोशी, ज्याला जोड नाही असा गुणी नट. सहजता (Ease) हा त्यांच्या अभिनयाचा प्राण! 'बालमोहन' तर त्यांनी गाजविलीच; पण 'अवधूत' (लग्नाची बेडी) ते बरोबरच घेऊन गेले. धुमाळ–गोकर्ण नि नागेश–अवधूत, दृष्ट लागावी, अशी विनोदी जोडी! नागेश गेल्यावर धुमाळांनी 'गोकर्ण' कायमचा सोडून दिला. जणु नागेशबरोबरच 'गोकर्णाला' तिलांजलि दिली! व्यंकटेश माडगूळकरांच्या 'कुणाचा कुणाला मेळ नाही' मधला त्यांनी उभा केलेला 'नामा परीट' लाजवाबच! नागेश जोशी गेले नि 'मेळ' पुन्हा जमला नाही. त्यांची विशेषत्वाने आठवण उरली आहे ती 'देवमाणूस'चे कर्ते म्हणून. 'आता छोटा गंधर्व गात आहेत, नागेश जोशी लिखित, देवमाणूस या नाटकातले गाणे– 'चांद माझा हा हासरा' असे रेडिओवरचे निवेदन ऐकले की, त्या गाण्याबरोबर 'कलाविकास'चे देवमाणूस डोळ्यांपुढे दिसू लागते. ते नागेश जोशी गेले तेही असेच नाटकात काम करीत असताना या पुण्यात! आचार्य अत्रे यांच्या 'पाणिग्रहण' मध्ये 'घोडके'च्या भूमिकेत, लोकांना हसविता, हसविता डोळ्यात कायमचे अश्रू ठेवून गेले. (१९५८)

## □ शास्त्रीबुवांची समई!

'शिवसंभव' कर्ते वासुदेवशास्त्री खरे हे उत्तम शिक्षक, इतिहाससंशोधक नि व्युत्पन्न विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. 'महाराष्ट्र नाटक मंडळीने' रंगभूमीवर आणलेले त्यांचे शिवसंभव नाटक खूपच गाजले. बलवंत संगीत मंडळीसाठी ते 'उग्रमंगल' नाटक लिहित होते. त्या काळात चिंतामणराव कोल्हटकर नि मा. दीनानाथ यांच्यावर त्यांचा लोभ जडला. या दोघांनाही शास्त्रीबुवांविषयी अत्यंत आदर होता. शास्त्रीबुवा कंपनीतून घरी मिरजेस जायला निघाले, तेव्हा 'बलवंत'च्या सर्व कलाकारांनी त्यांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार केला. शास्त्रीबुवा जसे विद्वान होते, मायाळू होते तसे थोडे विक्षिप्तही होते.

शास्त्रीबुवांची मंडळी (कुटुंब) माहेरी जाणार होती. शास्त्रीबुवांचे सर्व हवे–नको पाहून त्या गेल्या. जाताना, आपल्या यजमानांना लागतात, म्हणून समईच्या वाती सुद्धा भरपूर करून ठेवल्या होत्या त्यांनी. शास्त्रीबुवा लेखन–वाचन समईच्या प्रकाशात करीत असत. काही कारणामुळे त्यांच्या कुटुंबाचे येणे लांबले. वाती संपल्या. शास्त्रीबुवा रोज म्हणत, 'वाती आणायला हव्यात' पण मग विसरून जात. रात्र झाली की, त्यांना आठवण येई. त्यांना लेखन–वाचनाशिवाय चैनच पडत नसे. मग ते बैठकीच्या सतरंजीचे दोरे काढून समईत वाती म्हणून वापरीत. काही दिवसांनी त्यांचे कुटुंब परत आले. त्यांनी पाहिले तर, सतरंजीच्या दशा काढून, तिची दशा करून टाकलं होती! ती पाहून त्या म्हणाल्या, 'हे काय?' त्यावर शास्त्रीबुवा नुसते हसले नि म्हणाले, 'तुम्हाला काय वाटलं, फावल्या वेळात मी वाती वळीत बसावे? होती सतरंजी हाताशी, भागलं!'

त्यांच्या कुटुंबाला त्यांचा छांदिष्टपणा पाठ होता. कारण ते लिहा– वाचायला बसले की, त्यांना कशाचेच भान राहात नसे. फाटक्या सतरंजीची घडी करीत त्याही 'बरं' म्हणून नुसत्या हसल्या!



## योजनेतील पुस्तकांची सूची

**एक झाड आणि दोन पक्षी**
पॉप्युलर प्रकाशन / रु. १००
' रणांगण 'कार श्री. विश्राम बेडेकर यांचे आत्मकथन.

**टॉलस्टॉय–एक माणूस**
सुमती देवस्थळे / रु. ५५
टॉलस्टॉयच्या गुंतागुंतीच्या व्यक्तिमत्त्वाचा लेखिकेने घेतलेला शोध.

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**
चौथी दिमाखदार आवृत्ती
वि. ग. कानिटकर / रु. १४०

**योद्धा शेतकरी**
विजय परुळकर / रु. ३६
शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे अतिशय जिव्हाळ्याने केलेले चित्रण.

**श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर / रु. २५
जीवनाची चाकोरी सोडून, पायपीट करून, ग्रामीण प्रश्नाचे वेगवेगळे पैलू जवळून पाहण्याचा एक आगळा प्रयत्न.

**बलसागर**
श्री. ग. माजगावकर / रु. ३०
राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजांचा घेतलेला शोध.

**डॉ. आयडा स्कडर**
सौ. वीणा गवाणकर / रु. २२
ग्रामीण भागात डॉक्टरी सेवा नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडानी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

**एक होता कार्व्हर**
सौ. वीणा गवाणकर / रु. ३०
वैराण मुलुखाचे सुजलाम् सुफलाम् भूमीत रूपांतर करणारा थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी चरित्र.

**आंबेडकर भारत**
बाबुराव बागुल / रु. २०
गोष्टीरूप आंबेडकर चरित्र

**पूर्णिया**
अनिल अवचट / रु. १२
अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरूण साधू / रु. २२
जुलमी राजवटीच्या टाचांखाली दडपल्या गेलेल्या लॅटिन अमेरिकन समाजाला नवी स्वप्ने देऊ पाहणाऱ्या क्रांतीचा इतिहास.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुदरंगी / रु. २२
लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण–मराठीत प्रथमच.

**विज्ञानेश्वरी**
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / रु. २०
किचकट गणितांच्या आणि अवघड प्रमेयांच्या, दाट जंगलातून मूलभूत शास्त्रीय सिद्धांताच्या पाऊलवाटा शोधणारे- खास ललितशैलीतील पुस्तक.

**तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय....**
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / रु. २०
विज्ञानयुगातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी, नवे प्रयोग तुम्हाला सोप्या भाषेत समजून–उलगडून दाखविणारे पुस्तक.

**आपली मुलं**
शोभा भागवत / रु. २०
आपली मुलं मोठी होत असताना त्यांच्याकडं पाहण्याचा, त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व देण्याचा दृष्टिकोन देणारं पुस्तक.

**मला निसटलंच पाहिजे**
अनु. श्रीकांत लागू / रु. २०
इतिहासाच्या त्या धामधुमीच्या काळात, एका हुकुमशहाच्या मगरमिठीतून, जिवावर उदार होऊन ते निसटले व भारताच्या भूमीत उतरले. त्यांच्या साहसाची कथा.

**सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर / रु. १४
रसिकांची, व सर्वसामान्य वाचकाची मान्यता लाभलेले खळबळजनक, मोकळे, अनोखे आत्मवृत्त

**शतपावली**
रवींद्र पिंगे / रु. १६
रवींद्र पिंगे यांच्या सहजसुंदर लेखणीतून उतरलेली बारा उत्कृष्ट व्यक्तिचित्रे.

**सबला**
माधव शिरवळकर / रु. १२
स्त्री–बुवाबाजीवर झोत टाकणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी.

**रूपवती भार्या शत्रुः !**
ॲड. माधव कानिटकर / रु. २५
ॲड. कानिटकर यांच्या समर्थ लेखणीतून उतरलेले, काही गाजलेले खून खटले.

**हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा**
अशोक परळीकर / रु. १२
निझामी राजवटीतील अमानुष अन्यायाचे आणि हैद्राबाद मुक्तीसाठी प्राणपणाने दिल्या गेलेल्या लढ्याचे दर्शन घडविणाऱ्या कथा.

**लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी**
पु. ल. इनामदार / रु. २०
ग्वाल्हेरचे गांधीवादी वकील श्री. पु. ल. इनामदार यांनी महात्मा गांधी खून–खटल्यातील सहावे प्रमुख आरोपी डॉ. परचुरे यांचे वकीलपत्र घेऊन या खटल्यातून निर्दोष मुक्तता केली. त्या खटल्याची कथा.

**तीर्थरूप आक्का**
शारदाबाई आपटे /रु. ५
जुन्या कुटुंबातील कर्मयोगी सेविकेची कथा.

**डच**
अशोक प्रभाकर डांगे / रु. १०
काही विदेशी चित्रपट कथांचा संग्रह.

**काही दिवस श्यामचे– काही राधाचे**
फिरोझ रानडे / रु. २५
मध्यमवर्गीय श्यामच्या संसारकथा.

**आर डॉक्युमेंट**
लेखक : आयर्व्हिंग वॉलेस
अनुवाद : अशोक जैन / रु. १०
राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या जगप्रसिद्ध लेखकाच्या कादंबरीचा परिचय.

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28


लोकांनी, लोकांचें, लोकांसाठी चालवलेले राज्य हे ज्याचे राजकीय वचन होते
परंतु अतिरेक्यांनी केवळ स्वार्थासाठी केलेले लोकांचे आणि देशाचे विच्छेदन ज्याला पाप वाटत होते
अशा एका लोकशाही नेतृत्वाची कहाणी.

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष

वि. ग. कानिटकर



भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली पहिली डीलक्स आवृत्ती. मोठा काऊन आकार. पृष्ठे ४००

दीडशे रुपये किंमतीचा दर्जेदार चरित्रग्रंथ आपल्या संग्रही असण्यासाठी

## ऑगस्ट ८४ योजना

### ५०० रुपये + ५ वर्षे = ४०० रुपये + ५०० रुपये

आपण ५०० रुपये ५ वर्षांसाठी राजहंस प्रकाशनाकडे ठेव म्हणून ठेवल्यास ४०० रुपये किंमतीची पुस्तके आपणास व्याजाच्या मोबदल्यात मिळू शकतील आणि ५ वर्षांनंतर ठेवही परत मिळेल.

## शिवाय

योजनेतील सभासदांना आज उपलब्ध असलेली व पुढील ५ वर्षांत प्रकाशित होणारी सर्व राजहंस प्रकाशने २५% सवलतीत मिळू शकतील. ( पोस्ट खर्च सभासदांचा राहील. )

**सूचना :**
१. योजनेतील सभासदाला ४०० रुपये किंमतीची पुस्तके मिळणार आहेत. ज्या सभासदांकडे '**फाळणी टाळणारा महापुरुष**' हा ग्रंथ असेल वा नको असेल त्यांना त्या किंमतीची इतर पुस्तके मिळू शकतील.
२. चेक वा ड्राफ्ट 'राजहंस प्रकाशन' या नावाने काढावा.

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : ४४ ३४ ५९
वेळ : सकाळी ११ ते ५

**श्री. वा. र. गोडे**
४१ भवानी शंकर रोड
चितळे पथ कॉर्नर, जोशी वाडी
दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८
वेळ : दुपारी २ ते ७

**योजनेतील पुस्तकांची सूची मलपृष्ठ १ वर**